# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४५ ] आकोला—सोमवार तारीख ११ माहे दिसेंबर सन १९११ ई० [ अंक ४७

## वर्गणीचें दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्यात्र आठवड्यांत घेतल्या जातील यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल


### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजार.वरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट
नं १

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती कारितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६$\frac{2}{3}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } G. A. PHILLIPS. एजंट.
नो० नं० २

### चांदीचीं भांडीं.

**खरें सचोटीचें दुकान.**

आमचें दुकानीं शुद्ध चिनई चांदीचीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं ग्रीक्रीस तयार असतात. माल काळजीपूर्वक वक्तशीर व्ही. पी. नें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल जोखिमदार राहूं. एकवार अनुभव घ्यावा.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन.
३३१ आदितवारपेठ, नासिक

श्री राधावल्लभाजयाति

### वर्षफल।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि, जीवन, मरण, रोग, सन्तान तरेक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल व्ही० पी० द्वारा २। रुपये में भेज देंगे. हमारे यहां जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते हे अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ०॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मंगा लीजीये.

मिलने का पत्ताः—
गोस्वामी राधामोहन शर्म्मा
चित्तीखाना आगरा.

### मेहेरबान स्लाय साहेब कामिशनर, वऱ्हाड

आकोला येथें ता० ९-१० नोव्हेंबर रोजीं भरलेल्या शेतकी विषयक सभे मध्यें सदर्हू कमिशनर साहेब असें ह्मणाले कीं सुधारलेली नांगरटी केली तर जमीन जास्त पीक देते व चांगले **लोखंडी नांगर** जास्त प्रचारांत येत आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. या नांगराच्या योगानें जमीन लांकडी नांगरा पेक्षां **खोल** व **चांगली** नांगरली जाते येवढेंच नव्हे तर ती **लवकर** व **सहज** नांगरली जाते ”

आह्मीं स्वतः सुधारलेलीं शेतकीचीं आउतें ह्मणजे **लोखंडी मोठे व धाकटे नांगर, कडबा कापण्याचीं यंत्रें, मोटेचीं लोखंडी चाकें** वगैरे आमचे कारखान्यांत तयार करितों, इतकेंच नव्हे तर आमचीं आउतें तुह्मां शेतकरी लोकांस प्रिय झालेली असून आज ५००० पांच हजारावर उपयोगांत आहेत. ह्मणून आमचेच नांगर मागवा.

तुमच्या सोयी कारितां यंदा मुद्दाम किंमती कमीकेल्या आहेत.

किर्लोस्कर बंधु
पोष्ट किर्लोस्कर वाडी
( सं. औंध जिल्हा सातारा )


### नोटीस

बेशमी सकवारी मर्द धनसिंग कुणबी पाटील राहणार मानकी तालुके बाळापूर जि० आकोला इसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येतें कीं तूं माझ्या धाकट्या भावाची बायको आहेस आमची वडिलोपार्जित शेतें व जागा ह्याचें खातें माझा धाकटा भाऊ धनसिंग वल्दद बाबूराव ह्याचें नांवें होतें परंतू आज दोन महिनें झाले तो वारला असल्यामुळें त्या वडिलोपार्जित इस्टेटीचा मालक मी आहे तूं फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहेस कारितां तुला कळविण्यांत येतें कीं तूं फक्त आमच्या जवळून अन्नवस्त्राचा खर्च घेऊन स्वस्थ आमचे येथें राहावें. आमच्या इस्टेटीपैकीं शेतें किंवा जागा कोणास खरेदी अगर गहाण अथवा दुसरा कोणत्याही प्रकारचा व्यवहार करून इस्टेटीची अफरातफर करूं नये कळावें. तारीख ९-१२-१२ इसवी. सही

तुळसिंग वल्दद बाबुराव कुणबी पाटील रा० मानकी ता० बाळापूर जि० आकोला पात्रे बाळापूर. निशाणी हातचा आंगठा.

नो० नं० ५३०

### नोटीस.

नोटीस बेशमी मारुती वल्दद जानु न्हावी राहणार वाडेगांव तालुके बाळापूर यांसः —

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुमची नोटीस पोंचली. त्या नोटीसींत लिहिलेला मजकूर अगदीं खोटा आहे. माझी बहीण तुळशी इच्याशीं तुमचें गंधर्व ठरलें नाहीं व त्या बद्दलचा १ रुपयाही आह्मी घेतला नाहीं. व नगदी १०० रुपये कपडालत्ता १०० रुपयाचा ह्यापैकीं कांहीं एक आह्मास तुमचे कडून पावलें नाहीं. तुह्मी विनाकारण वाटेल तें लिहून आमच्यावर तुफान करीत आहां हें तुमचे करणें अगदीं लबाडीचे आहे. याउपर तुह्मी आमच्यावर फिर्याद कराल तर कोर्ट खर्चाचें आह्मी जबाबदार नाहीं कळावें. तारीख २।१२।१२ इसवी.

सही

नारायण वल्दद सखाराम न्हावी राहणार बाभूळगांवजहागीर ता० आकोला निशाणी हातचा आंगठा.

नो० नं० ५३१

### नोटीस.

बेशमी विश्वनाथ बापुजी विदुर मास्तर राहणार सिरसोली तालुके आकोट जि० आकोला यांसः—

खालीं सही करणार अशी नोटीस देतो कीं तुमचें लग्न झाल्यास आज सुमारें १० वर्षें झालीं त्या अवधींत तुमच्या बायकोचें पालन पोशन तुह्मी २।३ वर्षें केलें व बाकी ती आमचे येथें होती त्या बद्दल तीचा पोटगी खर्च दरसाल ६० रुपये प्रमाणें रुपये ४२० त्याप्रमाणें ... सालीं तुमचे पासून तीला गर्भ ... असून आमची ईजत घेण्याकरित... करी तरकारी ... माझे पासून गर्भ राहिला नाह... हातून उलट ह्मणता तरी या गोष्टीचा निकाल तूह्मी ही नोटीस पोंहोचल्या पासून ८ दिवसाचे आंत करावा व तीचा पोटगी खर्च द्यावा या प्रमाणें आठ दिवसाचे आंत न केल्यास हीच नोटीस फारकत समजून तीचा गंधर्व लावून देऊं कळावें तारिख २ माहे दिसेंबर सन १९११

सही

गोविंद खंडुजी बारपांडे राहणार जळगांव दस्तुर खुद्द

नो० नं० ५३२

### जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं कजबे सोनाळ ता० जळगांव येथील शेत सर्वे नं० ६९ व मौजे पिंगळी जाहगीर येथील शेत सर्वे नं० २९ आणि सोनाळें येथलि घर कोणी अ० शेखरजा पा० करणार आई शाबेगम याचे अगर शाबेगमचे नांवें कोणतेच लेखानीं लिहून घेऊं नये कोणी लिहून घेतल्यास त्याची जोखीम इस्टेटीवर न राहतां त्यांचे जातीवर राहील याकरितां आगाऊ कळविलें आहे. ता० २९-११-११ इ.

द० गोविंद बापुजी पी० रा० आकोला.

सही

शेखकादर वा। शेकयासीन मुसलमान राहणार सोनाळे द० खु०

नो० नं० ५३३

### जाहिर नोटीस

नोटीस बेशमी नारायणराव माधवराव गु॥ रा० हिरपूर यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तुह्मास कोर्टाचें कामाकरितां मुखत्यारपत्र दिलें होतें तें मी आज तारखेपासून रद्द केलें आहे या उपर पुढें तुह्मी कोणतेही काम पाहूं नये पाहिल्यास तुह्मी गुन्हेगार ठराल ता० ८-१२-११ इसवी दस्तुर.

सही

जनार्दन रामकृष्ण आ० पा० आई बायजाबाई जवजे रामकृष्ण नाईक तर्फे कृष्णाजी दिवाकर जोशी राहणार हिरपूर.

नो० नं० ५३४

## कृषिविद्या.

( रा० रा० बळवंत रामचंद्र लांडगे इनामदार, यवतमाळ यांचा अनुभव )

**नांगर–** शेतकीच्या वर्षाच्या कामाला आरंभ आपण जमीन नांगरण्या पासून करितो. त्या संबंधानें मी इतकेंच सांगतों कीं हल्लीं प्रचारांत असलेल्या नांगरांत टर्नरेस्ट् ( Turnwrest ) हा सर्वांत उत्तम काम करणारा आहे ह्याचा प्रचार व्हावा तितक्या जलदीनें जरी होत नाहीं, तरी पण होत चालला आहे हें सांगण्यास मला फार आनंद वाटतो.

तथापि एका मित्राकडून एका नांगराबद्दल मजला जी माहिती मिळाली आहे ती थोडक्यांत येथें सांगतों ह्या नांगराचें नांव ... हा बेळगांवाकडे हल्लीं एके ठिकाणीं उपयोगांत आणिला आहे. त्या नांगराला बैलाच्या दोन जोड्या बस आहेत. बैलांना नांगरलेल्या ढेकळाच्या जमिनींतून चालावें लागत नाहीं. दोन टोंकावर दोन यंत्रें ठेविलीं असतात; त्या प्रत्येकाला एक बैलाची जोडी लाविलेली असते. त्या जोड्या जागच्या जागीं वर्तुळाकार हिंडत असतात, व मध्यें तारेच्या सोलाला एक नांगर अडकविलेला असतो त्यावर एक मनुष्य बसून काम करीत असतो.

ह्या नांगरानें रोज तीन एकर जमीन नांगरली जाते.

**शेण व मुत्राचें खत--** जमिन नांगरल्यावर दुसरें काम खत घालणें हें होय कोणी नांगरण्याच्या पूर्वीं सुद्धां घालतात. तथापि तें दुसरें काम समजून त्या विषयीं आपल्या पुढें मी आपला अनुभव सांगतो. आपल्या हिंदुस्थान देशांत मुख्य उपजीविकेचें साधन शेती आहे. अमेरिका वगैरे सुधारलेल्या देशांत इतर उद्योगाबरोबर शेती हें सुद्धां एक साधन आहे. तथापि लोक तिच्या संबंधानें इतकी कांहीं काळजी घेतात कीं एवढीशी काडीसुद्धां वाया जाऊं देत नाहींत. तिचा खताकडे उपयोग करितात व आपल्यापेक्षां किती तरी ज्यास्त पिकें काढितात. अशा देशाशीं टक्कर मारावयास ह्मणजे आपल्यालाही फायदेशीर जितकीं साधनें असतील तितक्या साऱ्यांचा उपयोग केला पाहिजे आजपर्यंत आपल्याला एकाच प्रकारचें खत देण्याचें माहीत होतें. तें कोणतें ह्मणाल तर गुरांचें शेण त्यांच्या मूत्राचा आपण कांहीं एक उपयोग न करितां तें वायां जाऊं देतो. एवढ्या त्या साऱ्या शेताला नुसत्या शेणाच्याच खताचा जर उपयोग केला तर शेंकडा पांच शेतेंसुद्धां बरोबर खतविली जात नाहींत हें मी एकंदर माझ्या गांवांतल्या अनुभवावरून सांगतों ह्या शेणाच्या जोडीला मूत्राचाही उपयोग केला तर एकंदर खताची समृद्धि होऊन फार फायदा होईल. गाईच्या अगर बैलाच्या गोठ्यांत काळी माती थोडी थोडी आणून टाकावी. ह्मणजे तिच्यांत शेणाचें व मूत्राचें मिश्रण होतें. असें मिश्रण सात आठ दिवसांनीं एकदां आणून जमा करून ठेवावें पुन्हां तशीच काळी माती व बारीकसारीक काडी कचरा गोठ्यांत आणून टाकावा. ह्याप्रमाणें केल्यास खताचा पुरवठा फार मोठा होईल. अशा तऱ्हेनें जमा केलेलें खत शेतांत नेऊन टाकून तें पसरावें व नंतर शेत वखरून त्यांत पेरणें धरावें.

हें खत देण्याचा आणखी एक, पण फार काटकसरीचा असा मार्ग आहे. तो असा कीं वर सांगितलेल्या प्रकारानें जमा केलेलें खत कोरडें असतानांच रेती प्रमाणें बाजेवरून गाळून टाकावें. बारीक भुकटी राहिलेली पेरण्याचे वेळीं उत्तम प्रकारें कामीं पडते. हल्लीं आपण सरकी सरत्यानें पेरतो त्या एका सरत्याचे ऐवजीं अरगड्याला अगर वखराला दोनसरतीं एका मागून २।३ हाताच्या अंतरावर बांधावीं पहिलें ह्मणजे अरगड्याजवळील सरतें खास सरकीच्या सरत्यापेक्षां तिप्पट चौपट मोठें असावें. पेरण्याच्या वेळीं त्या मोठ्या सरत्यांतून खत पुष्कळसें उतारावें व त्याच्या मागून सरकीच्या सरत्यानें सरकी उतारावी. मलमूत्र एके ठिकाणीं केलेलें खताचा वर सांगितलेल्या रितीनें उपयोग केला तर त्याचा पिकावर परिणाम फारच चांगला होतो. रोपें दुप्पट जोरानें जमिनीच्यावर येतात. व त्यांची वाढ चांगल्या रितीनें होत असते. मी आज दोन वर्षें अशा रितीनें अनुभव घेत आहे. व आपणही अशा रितीनें उपयोग करावा अशी शिफारस करितों. आपल्या जवळ चार गुरें असल्यास अशा रीतीनें जमा केलेलें खताचा जर उपयोग केला तर दोन बैलानें वाहतां येणाऱ्या जमिनीला तें पुरे होईल. ज्या कापसाच्या शेतांना गतवर्षीं मलमूत्रांचें खत दिलें होतें. त्या ठिकाणीं यंदा ज्वारीचें पीकही फारच चांगलें आलें आहे.

**पेरणें—** खत घालून शेत वखरल्या नंतरचें काम पेरणी करणें. माझे येथें सरकारी शेती पांच सात वर्षापासून आहे. तेव्हांपासून अरगड्यानें पेरण्याची पद्धत सुरूं झाली व ती मला पसंत पडली आहे व माझी सारी कापसाची पेरणी त्या प्रमाणेंच मी करीत असतो. इतर लोकांनाही ती पसंत होत चालली आहे व ते लोक अरगडे प्रचारांत आणूं लागले आहेत. अरगड्या संबंधाची माहिती येथील सरकारी शेतींतच मिळेल.

**बुरीपासून फायदे—** कापूस मी तीन प्रकारचा पेरीत असतो. बूरी मालवेन्सीस [ पिवळ्या फुलाची जडी ] व रोझिया ( पांढऱ्या फुलाची जडी ) बुरी कापूस हा सर्वांत जास्त नरम आहे. व ह्याचा तागा लांब आहे. ह्याचें एकंदरींत पीक रोझिया पेक्षां थोडें कमी येतें. परंतु हिच्या आंगीं गूण चांगले असल्या कारणानें किंमत जास्त येते. कमी पीक व जास्त किंमत हीं जर एकें ठिकाणीं केली तर ही एकंदरीच्या मानानें रोझियाच्या जवळ जवळ येऊन बसते. हिचें पिकाचें मान आमचेकडे फारच थोडें असल्या कारणानें, परस्थ लोकांची बुरीची खरेदी आमचेकडे नाहीं. ती जर सुरूं झाली तर रोझियाच्या उत्पन्नाशीं बुरीला टक्कर मारतां येईल इतकेंच नाहीं तर तिला मागें सुद्धां हटवील असा आज अंदाज करतां येतो. तथापि खरेदी नाहीं ह्मणून आह्मी स्वस्थ बसतां कामा नये. कारण खरेदीदारही असेंच ह्मणतात कीं ज्या दिवशीं बुरी हिंदुस्थानांत पुष्कळ उत्पन्न होईल त्या दिवशीं आह्मी खरेदी सुरूं करूं तेव्हां जर आपल्याला आपल्या देशाचें हित पाहणें आहे तर आपल्या देशांतच नरम लांब धाग्याचा कापूस उत्पन्न करून परस्थ लोकांजवळून जास्त पैसे घेण्याची इच्छा करणें आहे, तर आपणाला प्रथम थोडीशी झीज सोसावी लागली तरी हरकत नाहीं, असें समजून तो कापूस दिवसानुदिवस जास्त पेरण्यास सुरवात केली पाहिजे. बुरीचा कापूस, अलग दुसऱ्या कापसाचें मिश्रण न होऊं देतां पेरला पाहिजे. दुसऱ्या मालाबरोबर जर हा पेरला तर उत्पन्न कमी असूनही दुसऱ्या मालाबरोबर त्याला भाव कमी ह्मणजे एकंदरींत दुसऱ्या मालाबरोबर हा कापूस पेरला असतां दुहेरी नुकसान होतें शिवाय आपण एक जातीचा कापूस न पेरतां मिश्रणाचा पेरितो सबब परस्थ व्यापाऱ्यांजवळील आपली पत नाहींशी होत चालली आहे. बुरी कापसापासून आणखी एक फायदा आहे.

कापसा पासून पैशाचा फायदा होऊं लागल्या पासून आपली दूर दृष्टी नाहींशीं होऊन पिकांच्या फिरवडाचें तत्त्व आपण अगदीं टाकून दिलें आहे. कापूस चार पांच वर्षांनीं एका शेतात पेरावयाच्या ऐवजीं एक वर्षा आड पेरूं लागलो. आतां तर तेंही सोडून दिलें. व त्याच त्या शेतांत दोन दोन चार चार वर्षें एकसारखा कापूसच पेरण्याला सुरवात केली तेंच तें पीक एकसारखें एका शेतांत पेरलें तर तें चांगलें येत नाहीं. तरी पण खत वगैरे घालून जमिनीची ताकत संभाळून ठेवतां येईल व पीकही चांगलें येईल. पण उइल्ट ह्या रोगा पासून बचाव करतां येत नाहीं.

रोझिया [ पांढऱ्या फुलाची काटेल ] हिचें पीक जास्त येतें खरें पण उइल्ट हा रोग हिला इतका पीछाडतो कीं यंदा कांहीं शेतांत चौथाई नुकसान झालें आहे. पण बुरीला ह्या रोगाचा स्पर्श आल्याचें अद्याप माझे पाहण्यांत आलें नाहीं. आमचे येथील सुपरिन्टेंडेन्ट् मे. भय्यालाल साहेब यांच्याशीं माझें पुष्कळ ह्या बाबतींत बोलणें झालें आहे. व त्यांचेही मत असेंच आहे. यंदा तर माझे नजरेस असें आलें आहे कीं बुरीला उइल्ट मुळींच नाहीं मालवेन्सीस मध्यें कमी व रोझियामध्यें विशेष आहे. ह्यावरून पुढें मागें रोझिया आपल्याला टाकून द्यावी लागणार आहे तर हळूं हळूं आतांपासून तिला रामराम ठोकीत तिचे जागीं बुरीची स्थापना करण्याचे मनांत आणल्यास बरेंच फायदेशीर होणार आहे.

**डवरणें–** यंदा पाऊस थोडा झाला, प्रथम तर दुष्काळ पडतो कीं काय असें भासूं लागलें होतें. तथापि कसाबसा पिकांनीं जीव धरून ठेविला व अगदीं निकराचे वेळेवर पाऊस मदत करीत गेला. मोटेचें पाणी दिल्यासारखीच बहुतेक स्थिति होती. फरक इतकाच कीं मोटेचें पाणी भरपूर मिळतें व पावसाचें अपुरें मिळत गेलें. तथापि जेवढा जेवढा ह्मणून यंदा पाऊस पडत गेला तितक्याचाच फायदा मी करून घेत गेलो. थोड्या ह्मणजे अगदीं अपुऱ्या पावसानें सुद्धां पिकें चांगली येतात असें एका अलीकडील पद्धतीवर शेती करणार गृहस्थाबरोबर वादविवाद करतां करतां माझ्या ध्यानांत आलें.

त्या गृहस्थाचें ह्मणणें असें कीं चांगल्या इंटर कल्चर ऑपरेशन्सनें ह्मणजे चांगल्या रितीनें पिकांच्या ओळींमधून डवरल्यानें अगर नांगरल्यानें थोडा पाऊस जरी पडला तरी पिकें चांगलीं येतात. मुख्य तत्त्व असें आहे कीं ज्या जमिनीवर झाडांचीं रोपें अगर गवत जास्त आहे तेथें बाष्पीभवन ह्मणजे पाण्याची वाफ होण्याची क्रिया जास्त असते. ह्या तत्त्वाला अनुसरून मी रोपें जरा जास्त अंतरावर ठेविलीं ... मध्यें डवरण्याचा सपाटा चालविला. आमचे जुन्या पद्धतीनें शेती करणारे लोकांचे असें ह्मणणें आहे कीं डवऱ्याचे तास मोडल्या शिवाय पुनः डवरूं नये.

असें करणें पुष्कळ पावसांत कदाचित् सफल होत असेल पण कमी पावसाच्या काळांत तर अगदीं उपयोगीं पडत नाहीं. कारण जो कांहीं थोडासा पाऊस पडेल त्याची वाफ होऊन जाते व त्याचेपासून आपल्याला जो फायदा मिळावयाचा तो मिळत नाहीं. सबब पाऊस पडो अगर न पडो डवरे सुरूं ठेवावेत. व ह्याप्रमाणेंच यंदा मी करीत गेलों. प्रथम मीही इतर लोकांप्रमाणें आडव्या पाशीच्या हमेषाच्या डवऱ्यानें डवरीत गेलों पण ४।५ डवरण्यानंतर खालची जमीन थोडी निबर होत चालली असें तेव्हां दिसून आलें. तेव्हां येथून फळ्याच्या डवऱ्याची जोडी गत वर्षीं मी घेऊन गेलो होतो त्याप्रमाणें १० डवरे तयार करून पाशीच्या डवऱ्यानें निबर झालेली जमीन उकरून दिली व नंतर पुन्हां पाशीच्या डवऱ्यानें डवरलें असें आळीपाळीनें करून जमीन अगदीं ठेववेल तितकी पोकळ ठेविली त्यामुळें हा काळपर्यंत कापसाचीं रोपें हिरवी चार आहेत व शेवटपर्यंत आलेली पाती रोपांच्या आंगच्या रसानेंच बिनपावसानेंसुद्धां भरण्याची आशा वाटत आहे व थोडा थोडा तसा अनुभवही येत आहे. अशा डवऱ्यानें डवरले असतां एक अगदीं उघड दिसणारा फायदा आहे तो एवढाच कीं डवरे वारंवार दिल्यानें जमीन उलत नाहीं. तिच्यांत ओलावा कायम राहतो आणि त्याचा फायदा रोपांना मिळतो. कापसाच्या पिकाच्या संबंधानें मुख्य मुख्य जें आपल्या पुढें सादर करण्यासारखें मला वाटलें तें मी केलें आहे.

आतां ज्वारीच्या पिकासंबंधानें थोडे बहुत सांगावयाचे आहे तें सांगतों.

**ज्वारी-** ज्वारीचे पुष्कळ प्रकार आहेत त्यांत मी आपले येथें चार प्रकारच्या बियांचा उपयोग करतो ( १ ) नटुरा ( २ ) रामकेळ ( ३ ) सावनेर व ( ४ ) चपटी.

हे जे चार प्रकार नंबरवारीनें मी सांगितले तें अगदीं हलक्या जमीनीपासून तों उत्तम जमिनीपर्यंत पेरीत जाण्याचे आहेत आमच्या इकडे अगदीं हलक्या जमिनींत नटुरा पेरतात व तीहून जरा सरस जमिनींत

रामकेळ पेरितात. साधारण काळ्या जमिनींत सावनेर व अगदीं चांगल्या जमिनींत चपटी पेरितों.

त्या सर्व ज्वाऱ्यांना कान्हीची बाधा होऊं नये ह्मणून पेरण्याचे वेळीं बियाला मोरचूत लावीत असतों. माझे गांवांत सर्व किरसानांना मोरचुतापासून काय फायदा आहे हें इतकें समजलें आहे कीं, एकही किरसान मोरचुताचा उपयोग केल्यावांचून रहात नाहीं. व ह्या गोष्टीचा प्रसार थोडाबहुत आसपासच्या गांवांतही होत चालला आहे. हे चार प्रकार सांजीळाही एकाहून एक चढ आहेत. चपटी ज्वार खाण्याला गोड असून तिचा धांडाही गोड असतो व ह्या ज्वारीच्या प्रकारापासून जास्त उत्पन्न होतें हें माझ्या अनुभवास आलें आहे.

**भुईमूग–** भुइमुगाचा बऱ्याच वर्षांपासून दक्षिणेकडे पेरा फार आहे. त्याचा प्रसार आपल्याकडे ही थोडाबहुत होत चालला आहे हीं भुइमुगाचें आपले कडील पुरातन काळचें बीं नाहींसें होऊन परकीय देशांतील प्रकार आपलेकडे आले आहेत. त्यांनही दोन प्रकार आमचेकडे विशेष प्रचारांत आहेत. एक जपानी बीं आहे त्याची शेंग मोठी असतें पण त्याला पुरे चार पांच महिनें लागतात. ह्याचे वेल जमिनिवर पसरतात व ज्या ज्या ठिकाणीं, त्यांचें कांडें जमिनींत लागतें त्या त्या ठिकाणीं त्याला शेंगा लागतात. दुसऱ्या प्रकाराला आमचेकडे ह्मापऱ्या भुइमूग ह्मणतात त्याचे वेल जमिनीवर पसरत नाहींत पण एक लहानसें झुडुप उभें असतें व याचीं मुळें शेंगानें भरलेलीं असतात हा प्रकार मी जास्त पसंत करितों. त्याचें पीक २॥ महिन्यांत तयार होतें. दक्षिणेकडे तर लोक हेंच बीं जास्त प्रचारांत आणूं लागले आहेत. साधारण माळ वगैरेच्या जमिनींतसुद्धां हें बीं पेरितात. आपणाकडेही जर आपण थोडे बहुत भुइमुगाचें पीक पेरूं लागलों तर आपलाही फायदा होत जाईल. हें पीक उत्पन्नाला साधारण कापसाचें बरोबरीचें असून ह्याचा बिवड पुढील पिकांस फारच फायदेशीर होतो.

बळवंत रामचंद्र लांडगे यवतमाळ

---

॥ श्रीः ॥

( शार्दूलविक्रीडित )

——:-:0:-;——

...रीकांतिसुशोभिजार्जविधु हा पूर्वार्यभूमीवरी ॥
॥ येवोनी जनते प्रमोदकर ती वृत्ती शुभा आचरी ॥
॥ होई दुःखसुतापनाश अवघा तद्दर्शनें हर्षले ॥
॥ ग्रीष्मांतीं सलिलेच्छु चातक जसे मेघावलोकें भले ॥१॥
॥ जाई मोदभरें सुशीघ्र जनता भेटावया त्याजला ॥
॥ घेवोनी उपदा जशी अचलजा उत्कंठिता अब्धिला ॥
...मा निजशिरीं, हस्तद्वया जोडुनी ॥
नि. एन.
॥ बोले नम्रपण पहा अवनि ही प्रेमें तशी वाहिनी ॥२॥
॥ श्रीमज्जार्ज पती मिळो ह्मणुनि ही लक्ष्मीवरप्रार्थिनी ॥
॥ आहे तिष्ठत मेदिनी प्रणयिनी माला करीं घेऊनी ॥
॥ तो हेतू पुरवावया समय हा आला असे संप्रती ॥
॥ रक्षावें इज अंगिकारुनि हिच्या वामान्य हस्ताप्रती ॥३॥
॥ ही पर्युत्सुक होउनी तुजवरी आहे त्वदाकांक्षिणी ॥
॥ कीजे पालन बैसुनी ह्मणुनि तूं साम्राज्यासिंहासनीं ॥
॥ हस्ताब्जप्रातीबिंबवासिनि तुझ्या ही भू अनन्यायना ॥
॥ जैसा मीन कदा न सोडुनि वसे अन्यत्र त्या जीवना ॥ ४ ॥
॥ राज्या वृद्धि, असो सदा रिपुजनां निस्तेजता स्थायिनी ॥
॥ मंत्री प्रज्ञ अमोघयुक्ति, जनता सुप्रीत सद्वर्तिनी ॥
॥ व्हाव अन्यनृपाल नम्र, नृपती दीर्घायु पत्नीसह ॥
॥ ही नारायण लालसा पुरवि तूं देवेश दुःखापह ॥५॥

नारायण शास्त्री गोरे अकोला ॥

---

१ चंद्र २ नजराणा ३ नदी ४ कमल ५ सेना ६ दाक्षिण ७ हस्तरूपीछायेखालीं राहणारी ८ नाहीं आहे दुसरीगती जीला ९ उदक १० सफल

---

वऱ्हाडसमाचार

मार्गशिर्ष शुद्ध १३ शके १८३२ दुंदुभिनाम संवत्सरे

## क्षीरोदधि

इंडियन व इंग्लिश हे भेदभाव अस्तास नेणारी जर एखादी प्रेमग्रंथी असेल तर ती उद्यांचा राज्याभिषेक होय. ग्रेट ब्रिटन व इंडिया यांच्याच इतिहासांत काय पण सर्व जगाच्या इतिहासांतील एका अपूर्व रहस्याचा उद्यां विजय होईल. पाश्चात्य व पौर्वात्य या दोन राष्ट्रांचा एकजीव करणाऱ्या प्रेमरसाच्या क्षीरोदधीचें उद्यां चक्रवर्ती पंचम जार्ज हे आपल्या पत्नीच्या करस्पर्शानें मंथन करूं लागतील. इतिहासांत हा सोन्याचा दिवस खरा! या मंगल मुहूर्तावर निराळ्याच भावी श्रीचें पुण्य सद्म उभारण्यांत येणार आहे. राज्याभिषेक ही लौकिकी गोष्ट झाली पण तिच्या बरोबर जीं महारत्नें दोन्ही राष्ट्रास लाभणार आहेत त्याचें मोलच करितां येण्यासारखें नाहीं. भुगोलदृष्ट्या इंग्लिश व इंडियन हीं नांवें नामशेष राहिलीं तरी त्यांचीं श्री, विजय व भूती हीं यापुढें एकाच प्रवाहानें वाहूं लागतील, तो कल्याणाचा प्रवाह वाढत जाऊन त्याची नदी महानद, सागर किंबहुना महासागर होत जाईल. राज्याभिषेक ही एवढी अद्भुत कामधेनु आहे.

---

## राजभक्ति

राजभक्तीचें अव्याज, सुंदर व मनोहर रूप पहावयाचें असेल तर तें यावेळीं आमच्या देशांत मूर्तिमान नांदत आहे. कै० व्हिक्टोरिआ यांच्या चांगूलपणानें जें राजभक्तीचें बीज पेरलें कै. एडवर्ड यांच्या शांततेनें व सौम्यतेनें तें बीज वृक्षपदास पावलें आणि त्याच वृक्षास श्री पंचम जार्ज आपल्या प्रेमानें अमृत फळें आणीत आहेत. बांबच्या धुमश्चक्रीला भिक न घालणारें प्रेमाच्या अंतःस्फूर्तीनें सर्व साम्राज्याकडे पाहणारें आणि इतक्या पूर्वीचें राजवैभव असलेलें साधे व प्रेमळ दंपत्य आपल्या दारीं आलेलें पाहुन कोणत्या इंडियनाचें हृदय पाझरणार नाहीं बरें ! आमच्या सर्व शिराणी पुऱ्या करणाऱ्या या देवमूर्तींकडे पाहून सर्व राष्ट्राचें अंतःकरण अप्रातिम व अश्रुतपूर्व राजभक्तीचा अनुभव सहस्रावधि वर्षांनीं घेत आहे. ही गोष्ट सांगासांगीची नाहीं. प्रत्यक्ष अनुभवाची आहे आणि हाच गोड हृदयवर्ती अनुभव उद्यांचा नृपसंदेश ऐकण्याकडे आह्मास पुढें पुढें आपापल्या नगरीच्या दरबाराच्या स्थळाला न कळत ओढूं लागला आहे.

—— : 0 : ——

## आनंदोत्सव.

राज्याभिषेका निमित्त जी आल्हादकारक कार्यमाला संकल्पित झालेली आहे तिचा प्रारंभ गेल्या गुरुवार पासून झाला.

किंबहुना गेल्या २ ऱ्या तारखेला मुंबई बंदरीं श्रीमंत चक्रवर्ती जार्ज व त्यांच्या पत्नी मेरी हें दंपत्य उतरल्यापासून आनंदाच्या गर्जनांनीं सर्व आकाश गर्जून राहिलें आहे. मुंबई नगरी त्यावेळीं इतकी सुंदर दिसत होती कीं प्रत्यक्ष पाहणारे लोक ह्मणतात कीं असा इतका उत्कृष्ठ मनोहर देखावा स्वप्नांत देखील कल्पनेला दृश्य नाहीं.

स्थलभेदानें निरनिराळ्या गोष्टी करण्यांत येत आहेत. तिकडे दिल्लीला नगरप्रवेश समारंभ अपूर्व असा होत आहे तर कोठें ईश्वर प्रार्थना, विद्यार्थ्यांचे खेळ व गोरगरीबांस अन्न संतर्पण, आतषबाजी, दीपोत्सव इत्यादि मंगल गोष्टींनीं एवढा अवाढव्य देश सर्वत्र परिप्लुत आहे. समुद्राला भरती आणणाऱ्या लाटा जशा एकमेकींवर उंच उंच वाढतात आणि सर्व महासमुद्र किनाऱ्याकडे ओतप्रोत व महान संवेगानें धावत सुटला आहे असा भास होतो तद्वत् आनंदोत्सवांचे सहस्रावधि प्रकार एकावर एक ताण करून आनंदसागरच सर्व इंडियाभर उचंबळून आणीत आहेत कीं काय असा भास होतो. या नेत्रांना सर्व स्थळींचे रमणीय देखावे दृश्य नाहींत पण वर्तमानपत्रांच्या प्रकाश किरणांनीं जीं शद्बचित्रें डोळ्यापुढें उभीं राहतात तीं सर्व एकत्र केलीं किंवा सर्व हिंदुस्थानचा एकीभूत देखावा एकदम दिसेल अशा हिमालयाच्या गगनचुंबी शिखरावरून जर आनंदोत्सव एकदम पाहण्यांत येईल तर कांहींशीं खरी कल्पना येईल जगाच्या इतिहासांत इतका अपूर्व व आनंदकारक महोत्सव कधींच ऐकण्यांत व वाचण्यांत आलेला नाहीं.

---

## शेतकी कालेज

——:-:0:-:——

नागपुरास शेतकीचें कालेज आहे. त्याची अभिवृद्धी वर्णन करितांना ओघा ओघानें अलिशान नामदार चीफ कमिशनर ह्मणतात कीं या कालेजांत अभ्यास करण्यासाठीं विद्यार्थी जितके जमावेत तितके जमविण्यासाठीं प्रयत्न केले पाहिजेत. येथें कृषिविद्या शिकावयाची असते. ती शिकतांना शेतीच्या प्रयोगालयांत फार मेहनत व परिश्रम करावे लागतात. पांढरपेशा लोकांचीं मुलें सरकारी चाकरीच्या नादानें येतात पण त्यांच्या हातून पुढें चांगलासा टिकाव धरवत नाहीं. पिढीजाद जे शेतकरी आहेत त्यांचीं मुलें शेतीच्या प्रयोगालयांत काम करण्याइतकीं दांडगीं, मजबूत शरीरानें धट्टपुट्ट असतात. पण हीं मुलें कालेजांत येण्याइतकें इंग्रजी शिकलेलीं नसतात. म्याट्रीक्युलेशनची परिक्षा ही कालेजाची सध्यां प्रवेश परिक्षा आहे ती कायम ठेऊन शेतकरी वर्गामधील विद्यार्थ्यांस या कॉलेजाकडे येण्याची गोडी लावण्यासाठीं कांहीं सवलती हायस्कुलांतून ठेवाव्या असा स्थानिक सरकारचा विचार आहे.

म्याट्रिकेशन परीक्षा ही प्रवेशपरीक्षाच नको असें आह्मांस वाटतें या परीक्षेचा अभ्यास पुरा होण्यापूर्वीच विद्यार्थी शेतीवाडींतल्या कामाला लायक रहात नाहींत असा अनुभव आहे. शेतीच्या कॉलेजांतील शिक्षण देशीभाषेमधून देण्यांत येईल तर बहुतेक नडी दूर होतील. इंग्रजी पाहिजेच असेल तर शेतीच्या कॉलेजांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं हायस्कुलांत पुष्कळशा विषयांची छाटाछाट करण्यांत येईल तर पुष्कळ बरें होईल. म्याट्रिक्युलेशनचे अभ्यास बरेच वाङ्मयात्मक असतात तेव्हां त्यांची मोठीशी गरज या कॉलेजांत येणाऱ्या विद्यार्थ्यांस ठेवूं नये ह्मणजे अनेक अडचणी दूर होतील.

वऱ्हाडच्या विद्यार्थ्यांसाठीं आकोल्यासच शेतीचें कॉलेज असावें आणि तें स्थापित करण्यासाठीं एडवर्डस्मारक फंड पुष्कळ हातभार लावील अशा संबंधानें आह्मी थोड्या दिवसापूर्वीं इकडील लोकमत प्रकाशित केलें होतें. वऱ्हाडच्या शेतकरी वर्गांतील विद्यार्थी आकोल्याच्या कॉलेजांत जितक्या तत्परतेनें जातील तितक्या तांतडीनें ते नागपुरास जातील असा आह्मांस भरंवसा नाहीं.

---

## हायकोर्ट

वऱ्हाडाला हायकोर्ट नागपूरचें आहे. या प्रांताच्या कामाला एक न्यायाधीश पुऱ्या संपूर्ण वेळाचा लागतो आणि तेवढ्यानें देखील वऱ्हाडच्या कामाची पूर्ण निरवानिरव लागत नाहीं असा अनुभव येत चाललेला आहे. सध्यां नागपुरास तीन जुडिशिअल कमिशनर आहेत. त्यांच्याकडे मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून जें काम असतें तें तीन न्यायमूर्तींना देखील फार जड

जातें आणि चारचार सहासहा महिन्यांच्या तारखा दिवाणी अपिलांस लागतात. न्याय फार दिरंगाईनें मिळतो आणि त्यामुळें त्याची किंमत पुष्कळ कमी होते. अलिकडे चौथा जुडिशिअल कमिशनर नेमण्याविषयीं स्थानिक सरकारचा विचार चालू आहे. नागपूरच्या वकील मंडळीकडून अशी विनंती करण्यांत येत आहे कीं ही ४ थी जागा नेटिवांसाठीं राखून ठेवण्यांत यावी आणि त्यावर १०।१९ वर्षें काम करीत असलेला अनुभवी वकील नेमण्यांत यावा. ही सूचना चांगली नाहीं असें कोण ह्मणेल!

पण आमचा प्रश्न अगदींच निराळा आहे. वऱ्हाडचें हायकोर्ट नागपूरास बदलण्यापासून प्रांताचें फार नुकसान झालें आहे. न्यायासाठीं वऱ्हाडच्या बाहेर दूरवर जावें लागतें. हीच गोष्ट आमच्या हक्काला बाधक आहे. हैद्राबादला रेसिडेन्सी हायकोर्ट होतें तें मुद्दाम वऱ्हाडांत आणिलें. त्याचा अनुभव आह्मी घेतला आणि तो आमच्या प्रांताला विशेष हितकर झाला. आमच्या प्रांतानिमित्त जर एक न्यायमूर्ती निराळी लागते तर ती आमच्याच प्रांतांत कां बसूं नये हें गूढ आह्मांस उकलत नाहीं. मध्यप्रांताच्या अधिकाऱ्यांची ऐट व बडेजाव हेंच एक उत्तर वरच्यावर दृष्टीस पडतें. आमची स्थानिक सरकाराला प्रार्थना आहे कीं त्यांनीं आमचें हायकोर्ट आह्मास परत द्यावें ह्मणजे लोकांवर मोठे उपकार होतील. फक्त हायकोर्ट आडबाजूच्या रेलवे स्टेशनाला ह्मणजे उमरावतीला न नेतां त्याची संस्थापना सर्व प्रांताच्या मध्यभागीं ह्मणजे आकोल्यास करण्यांत यावी. पूर्वीं आकोल्यासच सर्व वरिष्ठ कोर्टें होतीं एक आकास्मिक कारणामुळें उमरावतीला आकोल्याचा श्रेष्ठपणा देण्यांत आला होता. हायकोर्ट जर पुनः वऱ्हाडास स्वतंत्र मिळेल तर तें आकोल्यासच होईल असें देशस्थितीकडे नजर पुरविणारे सहज कबूल करितील.

---

## स्थानिक राज्याभिषेक

आकोल्यास या महोत्सवाची तयारी फार मोठी आहे. एवढा विस्तृत व सार्वजनिक आनंदोत्सव पूर्वीं कधींच लोकांत पाहण्यांत आलेला नाहीं. सर्व शहरभर रोषनाईची उभारणी झालेली आहे. मुख्य दरबारचा भव्य मंडप येथील एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर राजश्री डूबे यांनीं उत्कृष्ट बनविला आहे. माफक खर्चांत ही छोटीशीं चार दालनी चौफेर वर्तुलाकृती कुबेरपुरी पाहण्या सारखी रमणीय बनली आहे. गेल्या गुरुवारीं अन्नसंतर्पणाचा समारंभ झाला. सुमारें तीन हजारावर गोरगरीब कॉटन मार्केटाच्या कंपौंडांत गोळा झाले होते. त्यांना साखरभाताची मेजवानी झाली. आतृप्त अशा त्यांच्या प्रसन्न चेहऱ्याकडे पाहून कोण सहृदय त्यांच्या आनंदाश्रूंनीं व्यक्त होत असलेले मूक आशिर्वाद नृपासिंहासना सभोंवार गर्जत असतांना ऐकणार नाहीं बरें! आमचे डिपुटी कमिशनर मेजर फ्रेडन हे दिवसा ११॥ वाजल्या पासून १॥ वाजे पर्यंत आपल्या परिवारासह समक्ष देखरेख करीत होते आणि त्यांची हास्य मुद्रा पाहून सर्व लोक मोठ्या प्रेमभरानें गोरगरीबांस अन्न, वस्त्रप्रावर्ण देण्यांत अगदीं गुंग होते. हा समारंभ चांगला चिरस्मरणीय झाला. काल रोजीं देवालयें, मशिदी, प्रार्थनागृहें इत्यादि निरनिराळ्या धर्मांच्या लोकांनीं अगदीं तुडूंब भरलीं होतीं आणि श्रीमंत जार्ज व सौभाग्यवती मेरी या दंपत्यांस दीर्घायु व चिरसौख्य चिंतून परमेश्वरानें त्यांच्या छत्राखालीं हें ब्रिटिश राज्य सुखानें नांदावें ह्मणून ईश्वराची प्रार्थना करण्यांत आली आणि राज्याभिषेकाच्या मुहूर्तावर सर्वांनीं आकाशांत फुलें व सौभाग्य द्रव्यें उधळलीं.

आज सकाळीं विद्यार्थिवर्गाची गर्दी व तारंबळ उडून राहणार आहे. सभामंडपांत तीं बालमुखें प्रसन्नश्रीनें विकसलेलीं व फुललेलीं पाहतांच श्रीमंत पंचम जार्ज व सौभाग्यवती मेरी यांच्या भाग्यश्री विषयीं मनोमय आनंदगर्जना निघूं लागतील; आणि परमेश्वरकृपेनें या तरुण पिढीच्या आशा, महत्वाकांक्षा व ध्येयें बादशहाच्या प्रेमामृतानें सर्वत्र मंगलकारक होतील असा मनाचा पूर्ण ग्रह होईल.

आजच्या व उद्यांच्या कार्यक्रमाचा तपशील येणें प्रमाणें:—

सोमवार ता० ११ दिसेंबर १९११

शाळांतील समारंभाचा दिवस

सकाळीं ७॥ वाजतां—सर्व शाळांतील विद्यार्थी व स्कूल कमिटीचे मेंबर्स एकत्र जमणें.

भाषणें व पदकें वाटणें.

सायंकाळीं ४ वाजतां—खेळ सुरू (ज्युबिली पार्क)

मंगळवार ता० १२ दिसेंबर १९११

सकाळीं ८ वाजता—कैद्यांची मुक्तता.

" १० —मिरवणूकीसाठीं टाऊनहालांत जमणें.

" १०-३० —मिरवणूक निघणें.

" ११-३० —दरबारच्या मंडपांत दाखल होणें.

" १२ —दरबारच्या कामांस सुरवात.

### दरबारचीं कामें.

१. दयाळू बादशहा व महाराणी ह्यांच्या तसबिरीस हार घालणें.

२. जाहिरनामा वाचणें.

मे० डेप्युटी कमिशनर—इंग्रजीत.

मे० डिस्ट्रिक्ट आणि सेशन जज—उर्दूत.

मे० सबडिव्हिजनल आफिसर आकोला मराठींत.

३. दयाळू बादशहा व महाराणी ह्यांस राजनिष्ठेचा संदेश तारेनें पाठविण्याचा ठराव.

रा. रा. वि. महाजनी व्हाईस चेअरमन आकोला म्यु. कमिटी सूचना आणतील.

रा. अ. वि. खरे व्हाईस चेअरमन आकोला ता० बोर्ड अनुमोदन देतील.

मे. डेप्युटी कमिशनर दरबारा पुढें पसंतीसाठीं ठेवतील.

४. दरबारानिमित्त दिलेल्या पदव्या इत्यादि जाहिर करणें सर्टिफिकीटें देणें.

५ पानसुपारी.

६. राष्ट्रगीत.

इंग्रजींत.

मराठींत.

उर्दूत.

### दरबार बरखास्त

सायंकाळीं ६ वाजतां—कोतवालीजवळ नदीतीरावर दारूकाम. रात्रौ ७.३० ते मध्यरात्रपर्यंत—दीपोत्सव.

---

## देशी कसरत

हल्लीं शाळागृहांतून जी देशी कसरत शिकविण्यांत येते ती फार चतुरस्रतेनें व योजकपणानें कल्पिलेली आहे तिचा खरा उपयोग जर कळला आणि तिचीं तंत्रें नीट धोरणानें संभाळलीं तर आह्मास वाटतें कीं या कसरतीच्या योगानें विद्यार्थ्यांचीं शरीरें तेजस्वी, वीर्यवान व बलवान बनतील इतकेंच नाहीं तर रोगट मुलांचे रोगदुखणींबाणीं देखील बरीं होतील. युरोपांत काय किंवा इंडियांत काय, शरीर शास्त्रवेत्ते असें सांगतात कीं शरीर हें अमूल्य चिंतामणी आहे आणि या यंत्राची रचना व वाढ हीं फार विलक्षण आहेत व याच्या हातून योगबलानें वाटेल ती करामत करून घेतां येते. कसरत हा योगाभ्यासच आहे आणि तिचा उपयोग त्या दृष्टीनें करण्याची पूर्व परंपरा आमच्या देशांत फार जुनी आहे. आमच्या पाहण्यांत १८९६ सालचें एक इंग्रजी पुस्तक आलें त्याचा तर मथळा 'वैद्यकी कसरत' असा आहे. त्या पुस्तकाचा विषय ह्मणजे वैद्याच्या दृष्टीनें कसरतीचें निरीक्षण हें होय. औषध ह्मणजे कसरत. कसरतीच्या भिन्न भिन्न योजनांनीं शरीराचे सर्व रोग बरे होतात असा अनुभव आहे. एसक्युलेपिअस नांवाचा प्रसिद्ध ग्रीक तत्ववेत्ता होऊन गेला त्यानें तर या विषयाचा पूर्ण शोध केला आहे. या वैद्यकी कसरतीचे मूल सिद्धान्त फार थोडे आहेत. मनुष्याची शरीर रचना सर्वत्र एकाच पद्धतीवर आहे. मन व शरीर यांचा एक लय आणि शरीराच्या निरनिराळ्या अवयवांचा एक लय हे दोन्ही लय वैद्यकी कसरतीच्या मूळाशीं आहेत. या एक लयाची कल्पना सतारीवरून चांगली येईल. सर्व तारा चांगल्या शुद्ध धातूच्या व सप्रमाण वजनाच्या असून त्यांस असें घट्ट धरून ठेविलें असतें का एका झणत्कारा बरोबर सर्व तारा एक संयुक्त मधुर सारीगमादिध्वनि उत्पन्न करितात. हीच स्थिती मनुष्याच्या शरीराची आहे. सर्वच अवयव एकमेकांस परिपोषक व शोभा आणणारे आहेत. त्या सर्वांच्या गाभाऱ्यांत वसणारें मन आहे. आणि मनाच्या प्रसन्नतेवर शरीराची इमारत आनंदानें डुलत असते. शरीराला कच्चा बंगला ह्मणतात पण त्याच्या हातून काम करून घेणारी अधिष्टात्री मनोदेवी ही प्रसन्न राहील तरच शरीराची सर्वच शोभा व उपयोग आहे. जे मोठे योगी होऊन गेले ते मनोवृत्ती प्रसन्न ठेऊन शरीराला विजेप्रमाणें खेळतें ठेवितात आणि याच योगाच्या दृष्टीनें देशी कसरतीचा उपयोग मोठा आहे. तो उपयोग विद्यार्थ्यांस कळावा किंबहुना कसरती सारखा रामबाण दुसरी रोगप्रतिहारक, आरोग्यदायक व शक्तिवर्धक औषधीच नाहीं असें आह्मी ह्मणतो हा विचार विद्यार्थ्यांच्या मनावर जसा बिम्बेल त्या मानानें कसरती शिक्षकाची कामगिरी यथाशास्त्र होत आहे असें आह्मी समजतों.

---

## वऱ्हाडवृत्त.

हवामानः— गारठा, कडकडून, ढगांची फेरी, थंडीचो झांक इत्यादिकांनीं हवामान घटकोघटकीं बदलत असतें. तथापि सार्वजनिक आरोग्य चांगलें असून काल परवा पासून अहोरात्री राज्यभिषेका निमित्त जणूं काय आपले रमणीय रूप धारण करीत आहेत असा सुयोग दिसतो.

रा० रा० नथुसा यासूसा इछिचपूर यांस आनररी बेंच मॉजिस्ट्रेट नेमण्यांत आलें.

रा० रा० शहामहमद अबदूर रहिमान तहशिलदार यांस मोर्शीस बदलून जळगांवास रा० रा० अबदूर रहिमखान तहशिलदार यांस मोर्शीहून बदलले.

रा० रा० रघुनाथराव धारपुरे सिनिअर मुनसफ यांची बदली मेहेकरास न होतां खांडव्यास झाली आहे या न्यायाधिशांस पक्षकार व वकील मंडळी फारच फार चहातात. हे न्यायमनसबींत चोख असून मनानें थोर, आनंदी व प्रेमळ आहेत. हे गोडीगुलाबीनें सर्व कामें चालवितात.

'वन्देजिनवरम्' —— वऱ्हाडांतील जैन मंडळींनीं हें मासिक पुस्तक ३ वर्षें चालविलें असून आतां त्याचा ४ थ्या वर्षाचा १ अंक आला आहे. याचे प्रकाशक रा० रा० बोबडे हे असून यांत जैन क्षेत्र, सत्पुरुष इत्यादिकांची माहिती असून कांहीं स्फूट लेखही असतात. गेल्या अंकांत सिद्ध क्षेत्र श्री समेद शिखरजी यांचें छोटें चित्र फार सुरम्य आहे. उत्तरोत्तर याची अभिवृद्धी होत असून चालू प्रगतीला जोर आणणारीं मतें या मासिकाची आहेत.

---

## वर्तमानसार.

मानग पोष्ट पत्रास तेहरान येथून आलेल्या तारेवरून असें समजतें कीं, सोमवारीं पर्शीयानें राशियास असा निकराचा खलिता पाठविला आहे कीं, कॅझव्हीनच्या अलिकडे राशियन सैन्य येतां कामा नये व नवीन सैन्य पाठविण्याचें तावडतोब बंद करण्यांत यावें. या अटी जर राशिया मोडील तर त्यास पर्शियन सरकाराकडून प्रतिबंध करण्यांत येईल.

हांकौ येथें ब्रिटिश कौन्सलाच्या मध्यस्थीनें त्या ठिकाणीं बादशाही सैन्य व बंडवाले यांच्यामध्यें तूर्त लढाई तहकूब राहिली असून तडजोडीच्या प्रश्नाचा विचार होणार आहे. युवानशिकाई यांना असें विश्वासपूर्वक वाटत आहे कीं परिस्थिती पालटत चालली आहे. इकडे आपण हांकौ शहराचे द्वारें शांततेचा प्रयत्न करित आहों, तोंपर्यंत उत्तर चायनांत टंगशान-ई हे शांततासंस्थापनेचे प्रयत्न चालवितील असें ते ह्मणत आहेत. तडजोडीच्या मार्गांत एक मोठा प्रतिबंधच असलेले चीनचे रीजंट राजीनामा देण्यास तयार [illegible] आहे.

## सुधासिंधु

सुख संचारक कंपनी मथुरा यांची तयार केलेलीं व सरकारांतून रजिस्टर झालेलीं औषधें, जीं वीस वर्षांपासून लोकांत अनुभविलीं आहेत.

## सुधासिंधु

हें कफ, खोकला, दमा, थंडीचा ताप, पटकी, शूळ, संग्रहणी, अतिसार, पोटांत दुखणें, वांत्या, मळमळणें, हात पाय व कंबर दुखणें, मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, डांग्या खोकला, दूध ओकून टाकणें इत्यादीवर स्वादिष्ट व सुवासिक औषध आहे. किंमत प्रत्येक बाटलीस ०८ आणे.

## दद्रुगज केसरी

गजकरणास समूळ नाहींसें करणारें हेंच फक्त एक पवित्र औषध आहे. कांहीं सुद्धां जळण अथवा आग होत नाहीं. यासच जर दारू अथवा लिंबाचे अर्कांत मिळविलें तर २ बाटल्या अर्क तयार होतो. किंमत प्रत्येक बाटलीस ०४ आणे १२ बाटल्या एकदम मागविल्यानें त्यांस एजंट समजून नोटिशी, हँडबिलें वगैरे फुकट पाठविलें जातात, व कमिशनही दिलें जातें. चालू सालचें पंचांगही फुकट मिळतें

मागविण्याचा पत्ता:—
पंडित क्षेत्रपाल शर्मामालक,
१९९ संचारक कंपनी, मथुरा

## विलक्षण नयन रुक्कुठार.

**विलक्षण नयन रुक्कुठार** – ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार– **खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूरी, फुल** इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशाविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणांनीं डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेंच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालण्या करितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ०६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालोपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल विशेष माहिती खालील पत्त्यावर,

नि. एन. घारपुरे. पोष्ट- अलिबाग

### विहार आनन्दका सागर रंगीन तसवीरे सहित चारो भाग तथा पांचो अंग सचित्र कोख शास्त्र.

असली हमसे मंगावो धोकेसे बचो स्त्री पुरुषोंके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पातिव्रता, व्यभिचारणी आदिको 'पहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार मय सहवास स्थान क्रया, शैय्यातिथ, कामस्थान सालासगरि, वतीसोआमूशण, वस्त्रतअदिवमधान पुत्रस्टीकर्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोंकी चिकित्सा औषधि, पशु भाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण सुद्धां विद्या अदि अमुल्य विषयका भेड'र किंमत रु०

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडा

नो० नं० ७७ अलीगड

### जाहिरात

वर्षफल—प्रत्येक महिन्याचें फलासह लाभालाभ सुखदुःख कळवूं. फी. ३ रुपये वर्ग २ चे २ रुपये. खर्च ०= जन्मकाल, जन्म अथवा चालू नांव कळवावें.

पत्ता— भा० गो० पंडित,
रा० व पो० लोणखेड जि ०प. खानदेश

### नोटीस

नोटीस बेशमी कान्हू वा नानू भोई राहणार जळगांव जिल्हा बुलढाणें यांस—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तुमची लग्नाची बायको असून लग्न झाल्यास सुमोर ७।८ वर्षें झालीं आहेत तेव्हांपासून तुम्ही मजला घरीं नेलें नाहीं व माझेकडून तुमचेकडे फारकतीकारितां पंच पाठविले असतां फारकती देत नाहीं तरी आता कळविनें कीं ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत फारकती देण्याची तजवीज करावी न दिल्यास हिच फारकती समजून मी आपला संसार सुधरेन. मी असीलाची मुलगी असल्यामुळें तुमचे ऐच काढूं शकत नाहीं. तुम्ही मला फारकतीच देऊन मोकळें करावें. तसें न केल्यास तुम्हास माझे बापाचा आठ वर्षांचा माझे अन्नवस्त्राचा खर्च अजमास ६०० रुपये भरून द्यावा लागेल व नोटीशीचा खर्चही तुम्हावर पडेल कळावें

सही

सखी मर्द कान्हू भोई निशाणी हातची बांगडी

नो० नं० ५३५

### नोटीस.

नोटीस बेशमी रामभाऊ गोपाळ ठोकळ भट राहणार ऋणमोचन ता० मुर्तिजापूर जि० आकोला यांस–

मी खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे पिंगळ येथील माझीं शेतें दोन स. नं० २० पैकीं व स. नं० १० चे तुम्हास लागवणीनें लाऊन काढण्यास सांगितलें व मी अज्ञान असल्यामुळें लागवण लाऊन त्याचे पैसे मजकडेस पाठवित जावें. व तुम्ही पाठविण्याचे कबूल केलें असून लागवणीचा व माझें एक घर विकलें त्याचा पैसा आम्हास तुम्ही पाठविला नाहीं. त्याचप्रमाणें आमची जनावरें गाय, गोऱ्हे, घोडी, सिंगरे वगैरे तुम्ही आमचे चुलते आहांत या विश्वासावर तुमचे जिम्मेस दिलीं होतीं. तेव्हां हल्लीं आमचे ऐकण्यांत आलें कीं जनावरें तुम्ही विकून टाकलीं व शेतीचा ही पैसा खाऊन बसले आहांत याबद्दल मी तुमचेवर विश्वासघात केल्याची फिर्याद करणार आहे. याकरितां तुम्हास या नोटिशीनें कळवितों कीं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत आमचे शेतीचे घराचे पैसे व जनावरें आमचे आम्हास द्यावें व पुढच्या सालाकरितां शेती कोणास लागवणीनें देऊं नये. असें न केल्यास रीतीप्रमाणें तजवीज करण्यांत येईल. कळावें तारीख ६-१२-१९११ इसवी.

सही

सखाराम पांडुरंग जोशी आश्रेकावेसकर अज्ञान पालन करणार आई रंगु जवजे पांडुरंग जोशी हल्लीं राहणार आकोट नि० तुळशीची माळ द० रामचंद्र महादेव वते

नो० नं० ५३६

### जाहिर नोटीस.

शेट सावकार व इतर सर्वत्र लोक यांस:–

कळविण्यांत येतें कीं माझा धाकटा भाऊ धनसिंग वल्द बाबूसिंग हा वारल्यामुळें आमच्या वडिलोपार्जित इस्टेटीचा मी मालक आहे. त्याची बायको नामें सकवारी मर्द धनसिंग ही फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहे. तिचा विचार आमची वडिलोपार्जित असलेली इस्टेट शेतें वगैरे विकून अफरातफर करावयाची आहे. ती फक्त अन्नवस्त्राची मालकीण असल्यामुळें तिला शेतें वगैरे विकण्याचा अगर अन्य कोणत्याही प्रकारचा व्यवहार करण्यास हक्क पोंचत नाहीं. करितां जर कोणी तिच्या जवळून शेतें अगर जागा गहाण अगर खरेदी घेतल्यास अगर इस्टेटी संबंधानें माझ्या सल्ल्याशिवाय इतर व्यवहार केल्यास तें बातल समजलें जाईल कळावें.

तारीख ३।१२।११ इ० सही

तुळसिंग वल्द बाबुराव कुणबी पाटील रा० मानकी ता० बाळापूर जि० आकोला निशाणी हातचा आंगठा.

नो० नं० ५३७

### नोटीस

नोटीस बेशमी सेखमेहबुब वा। सेख ईस्माईल रा० तेल्हारा ता० आकोट

यांस

मी खालीं सही करणार ईजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही माझे कडून मुकत्यार पत्रानें काम करित होतें तें मी ता० २८-८-८ ई० रोजीं वऱ्हाड समाचारातुन नोटीस देऊन मुकत्यार पत्र रद्दकेलें असुन त्यास ३ वर्षें झालीं असुन ता० १-७-११ ई० रोजीं माझे नांवाचा स्टँप तुम्ही घेऊन वरील तारखेस व्यंकटराव मल्हारराव यानें आपलें घरीं रात्री ८ वाजतां लिहून स्टँपावर मजला बोलाऊन घेऊन माझी नीशानी घेतली नंतर मी वलीआमद वा। महमदहुसेन सेखमेहबूब वा। सेखरहीम यांस बोलाऊन नेऊन त्यांचे समोर स्टँप वाचुन घेतला तर तो ३०० रुपये कर्ज दिल्याबद्दल लिहीला होता त्यावेळीं रुपये मागीतले असतां आठ दिवसांनीं देईन असें सांगून तुम्ही आपले गांवाकडेस निघून गेला परंतु तुम्ही रुपये आज पावेतों दिले नसून पाठविलेही नाहींत करितां तुम्हास नोटिशीनें कळविण्यांत येते कीं नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत ३०० रुपये पाठऊन देऊन किंवा तुम्ही स्वःत रुपये देऊन पावती घेऊन जावी तसें न केल्यास स्टँप आणून द्यावा न. आणून दिल्यास रद्द समजावा व दगलबाजी करुन स्टँपावर सही घेतली सबब तुम्हावर फौजदारींत रितीप्रमाणें फीर्याद करणें भाग पडेल व अज्ञान माझा चुलतभाऊ नामें सेखदुला वा। वजीरमहमद पूरवीत आहे वरील नोटिशीप्रमाणें व्यवस्था न केल्यास रितीप्रमाणें व्यवस्था करुन कोर्टखर्च व नोटिशीचा खर्च तुम्हांपासून घेतला जाईल कळावें ता० ३-१२-११ ई०

सही

सहीची नीशानी बनुबी मर्द गुलाबखां

नो० नं० ५३८ मलकापूर नवा मोंढा

## नोटीस

रा० रा० गोविंदा वल्दद बाळकृष्ण सईतवाळ रा० धानोर हल्लीं मुक्काम बेलेर ता० पुसद जि० यवतमाळ

यांसः—

खालीं सही करणार ईजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको आहे तुमच्याशी माझें लग्न लागुन आज ७।८ वर्षें होऊन गेलीं आहे। तुह्मी आपल्या घरीं मला घेऊन जात नाहीं व मला नीट रितीनें वागवीतही नाहीं यामुळें मी २ दोन वर्षापासून आपल्या मायच्या घरीं राहात आहे. मला घेऊन जाण्याकरितां माझा मामा आणि चुलता हे दोघे मागें आपल्या घरी आले होते त्यावेळीं आपण त्यांना ह्मणाला कीं तुमची भाची जरी सोन्याची असली तरी तिची आह्मास जरूरी नाहीं. तरी त्या दिवसापासुन तुह्मी आज घेऊन जाल उद्या घेऊन जाल त्या भरंवशावर मी बसलें व पोटखर्चा करितां आजपर्यंत माझे मायनें सावकाराचे येथुन रुपये दीडशे आणून माझा सांभाळ केला आतां कोणी सावकार पैसे देत नाहींत करितां तुह्मास ह्या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुह्मा प्रथम सावकाराचें रुपये दीडशे देऊन मजला आपले घरीं घेऊन जावें मी येण्यास तयार आहें तरी तुह्मास ही नोटीस मिळाल्या पासून १५ दिवसाचे आंत मला घेण्यास येऊन घेऊन जावें तसें न झाल्यास तुमचा माझेवर नवेरपणाचा हक्क मुळीच राहणार नाहीं करितां ह्या नोटिशीनें मुदाम आपणास कळविलें आहे. कळावें तारीख ४-१२-११ ई०

सही

सारजी मर्द गोविंदा सइतवाळ रा० खेडे ता० मुर्तिजापूर इहीची निशानी आंगठा

ते तारिख १८।१२।११

नो. नं. ९३९

## नोटीस

बेशमी— चुनी मर्द गेंदुसींग रजपुत राहणार गाडेगांव खुर्द ता० जळगांव जि० बुलडाणा यांसः—

खालीं सही करणार अशी नोटीस देते कीं, तुझेवर खामगांव स्माल काज मुकद्दमा नंबर १३६४ सन १९१० चा फैसल झालेला आहे त्याची फेड तूं स्वतः आपले जातीवर करावी कारण माझी इस्टेट जी आहे ती सर्व मनी मर्द रामसींग हिचे ताब्यांत आहे अशा बद्दल जी सावकारानें नोटीस दिलेली आहे ती खोटी आहे व तें सर्व सामान माझे ताब्यांत आहे. त्या सामानावर तुझा कोणतेही प्रकारचा हक्क नाहीं कारण तुझा नवरा मेल्यापासून तूं आमचें घरीं नाहींस व जातीबाहेर आहेस आणि कर्ज आकाराम वल्दद मोहनसींग याचे पासून काढिलें परंतु तो इसम दरमहा ५ रु० पगारावर बालु गेंदु याचेकडे नोकरी करितो तर त्यानें कर्ज कोठलें दिलें! तरी हा दस्तैवज तूं खोटा केलेला आहेस तर तुला या सामानावर कर्जाचा बोजा टाकितां येणार नाहीं कारण तूं घर निघालेली आहेस. तेव्हां तूं कर्ज आपले करितां काढिलें आहेस त्याची फेड तुझी तूंच करावी तसेंच गेंदुसींगचा मुलगा मनुसींग वल्दद गेंदुसींग रजपूत अज्ञान आहे तो तुझेपाशीं आहे तो मुलगा व तुझे आंगावर जे दागिने होते ते.

तोड्याचा जोड चांदीचा तोळे १००
दंडवळ्याचा जोड चांदीचा तोळे ६०
नथ सोन्याची एक तोळ्याची.
कडीं हातांतील चांदीचा तोळे २० ची
सोन्याच्या बाळ्या १ तोळ्याच्या
पैठणी किंमत रुपये ३५ ची

येणें प्रमाणें दागिनें नोटीस पावल्यापासून आठ दिवसांच्या आंत आणून आमचे ताब्यात द्यावें या प्रमाणें न केल्यास कायद्याप्रमाणें तजवीज केली जाईल व या नोटीशाचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें. ता० ३०-११-११ इ०

सही

भीमो मर्द गुलाबसींग जात रजपूत
राहणार अनुराबाद झोडगे ता.
मलकापर पोष्ट मलकापूर
निशाणी आंगठा

नो. नं. ९४०

---

मिस मांउट स्टीफन या नांवाच्या एका युरोपियन स्त्रीस मिस गार्नेट आरम नांवाच्या स्त्रीच्या मृत्यूसंबंधांत सोमवारीं झांशी येथें पकडण्यांत आलं होतें. तीस पोलिसच्या अटकेंत डेराडून येथें नेण्यांत आले आहे. गेल्या सप्टेंबर महिन्यांत मिस गार्नेट आरम या नांवाची स्त्री मसुरी येथें आपल्या बिछान्यांत मृत होऊन पडलेली सांपडली होती तिच्या मृत्यूसंबंधानें मॅजिस्ट्रेटकडून रीतसर चौकशी करण्यांत आली. व तिच्या आंतड्यांचा कांहीं भाग केमिकल अनालायझरकडे तपासण्यासाठीं पाठविण्यांत आला होता. आंतडी तपासून पाहतां त्यांत प्रूसिक ॲसिड असल्याचें दिसून आले. नंतर मसुरी येथील पोलिसनें या प्रकरणाची चौकशी चालविली व त्यावरून मिस मांउट स्टीफन हीस पकडण्यांत आलें मिस मांउट स्टीफन ही मयत स्त्रीची मैत्रीण होती.

दर्भंग्याच्या महाराजांच्या प्रामुख्याखालीं हिंदु–युनिव्हर्सिटीचें डेप्युटेशन सोमवारीं दिल्ली येथील टाउनहॉलमध्यें ना० बटलर यांच्या मुलाखतीस गेलें होतें. त्यावेळीं हिंदु–युनिव्हर्सिटीच्या मसुद्यांतील तपशीलवार गोष्टी ना० बटलर यांजपुढें मांडण्यांत येऊन त्यासंबंधानें वाटाघाट करण्यांत आली. ना० बटलर साहेबांनीं प्रत्येक बाबतीसंबंधानें सहानुभूति प्रदर्शित केली व ना० व्हाइसराय लॉर्ड हार्डिंज व हिंदुस्थान सरकार यांजपुढें हा सर्व प्रश्न शक्य तितक्या लवकर मांडण्यांत येईल असें त्यांनीं डेप्युटेशनास कळविलें.

मांगोलियाचें स्वातंत्र उर्गा येथें पुकारण्यांत येऊन चिनी अंमलदारांना बडतर्फ करण्यांत आलें आहे. अधिकाऱ्यांच्या परवानगीनें तार्तर शहर—नांकिन—लुटून जाळण्यांत आलें !!! हांगकांगहून आलेल्या बातमीवरून समजतें कीं यॉर्कशायर रेजिमेंटच्या दोनशें लोकांना जहाजांतून हांको येथें जाण्याचा हुकम झाला आहे.

## नोटीस

विद्यमान सबजज्ज साहेब आकोला यांचे कोर्टांत

सक्सेशन सर्टिफिकेट नंबर २७–११ — सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याचा अर्ज.

अर्जदार

बिबनी वा॥ अबिरखां अ. पा. आत मनसबबी मर्द अबदुल खालक २ मनस बी मर्द अबदूलखालक रा० नेर ता० आकोट सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, अर्जदार इनें सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्या बद्दल अर्ज आमचे कोर्टांत ता० १८-१२-११ रोजीं नेमिली आहे त्या तारखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यांनें सकाळीं १० वजतां आमचें कोर्टांत हजर व्हावें तसें न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें तारीख ६-१२-११ आकोला.

Janki Prsad.
Subjudge Akola

नो० नं ९४१

---

ठिक ठिकाणी एजंटस् पाहिजेत.

# सन लाइफ अशुअरन्स कंपनी ऑफ कानडा

[ १८६५ ]

इंग्लिश सरकारची सक्त देखरेख सरकारी हुकुमाशिवाय भांडवल गुंतवता येत नाहीं.

**भांडवल तेरा कोटी रुपये.**

पॉलिसीचे नमूने फारच सुधारलेले आहेत.

पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन अटीच्या.
पॉलिसी .... .... .... .. .... .... बिन तक्रारी.
पॉलसी .... .... ... .... .... .... बिन बुडणारी.

हिंदुस्थानचे मुख्य ऑफिस, हार्नबी रोड मुंबई. } न्य. श्री मुधोळकर मध्यप्रांताचे वऱ्हाडचे जनरल एजंट अकोला ' प्रांत वऱ्हाड

---

# Oriental Govrnment security LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

## FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act in treating the clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No mān can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner a man make up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For term please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on ap

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं तारकाराम आश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Registered No. 854

# वऱ्हाडसमाचार.

११ ई० ३

Berar Samachar.

वर्ष ४५ ] आकोला—सोमवार तारीख १८ माहे दिसेंबर सन १९११ ई० [ अं

## वर्गणीचें दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिलक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजार वरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ } एजंट
नं १

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती कारितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६३ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } G. A. PHILLIPS.
आकोला २१-९-१० } एजंट.
नो० नं० २

## चांदीचीं भांडीं.

### खरें सचोटीचें दुकान.

"आमचे दुकानीं शुद्ध चिनई चांदीचीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं गिऱ्हाईकांस तयार असतात. माल काळजीपूर्वक वजनशीर व्ही. पी. नें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल जोखिमदार राहूं. एकवार अनुभव घ्यावा.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन.
३३१ आदितवारपेठ, नासिक

श्री राधावल्लभाजयति

## वर्षफल।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि, जीवन, मरण, रोग, सन्तान तरक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल व्ही० पी० द्वारा २। रुपये में भेज देंगे. हमारे यहां जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते है अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ८॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मंगा लीजीये.

मिलने का पत्ताः—
गोस्वामी राधामोहन शर्मा
चित्ताखाना आगरा.

## मेहरबान स्लाय साहेब कमिशनर, वऱ्हाड

आकोला येथें ता० ९-१० नोव्हेंबर रोजीं भरलेल्या शेतकी विषयक सभे मध्यें सदर्हू कमिशनर साहेब असें म्हणाले कीं सुधारलेली नांगरटी केली तर जमीन जास्त पीक देते व चांगले लोखंडी नांगर जास्त प्रचारांत येत आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. या नांगराच्या योगानें जमीन लांकडी नांगरा पेक्षां खोल व चांगली नांगरली जाते येवढेंच नव्हे तर ती लवकर व सहज नांगरली जाते "

आह्मीं स्वतः सुधारलेलीं शेतकीचीं आउतें म्हणजे लोखंडी मोठे व धाकटे नांगर, कडबा कापण्याचीं यंत्रें, मोटेचीं लोखंडी चाकें वगैरे आमचे कारखान्यांत तयार कारितों, इतकेंच नव्हे तर आमचीं आउतें तुह्मां शेतकरी लोकांस प्रिय झालेली असून आज ५००० पांच हजारावर उपयोगांत आहेत. ह्मणून आमचेच नांगर मागवा.

तुमच्या सोयी कारितां यंदा मुद्दाम किंमती कमी केल्या आहेत.

किर्लोस्कर बंधु
पोष्ट किर्लोस्कर वाडी
( सं. औंध जिल्हा सातारा )

## राजे पांचवे जॉर्ज, हिंदुस्थानचे बादशहा यांचें आगमन.

### स्वागतपर कविता

॥ पदें ॥

॥येती येथें भूप, प्रजेला होई हर्ष अमूप॥
॥ ध्रु ॥
॥ रानांतून ये धेनु गृहाला ॥
॥ वत्सा येइ हुरूप ॥१॥ प्रजेला०
॥ चिंतामणि ये निर्धन हाता ॥
॥ कुब्ज होय सुरूप! ॥२॥ प्रजेला०
॥ गुरु प्रसादें विद्यालाभ ॥
॥ उघडे मौन कुलूप ॥३॥ प्रजेला०
॥ निदाघ शुष्का क्षेत्रांवरती ॥
॥ वर्षे इंद्र अमूप ॥४॥ प्रजेला०
॥ महस्थळींच्या पथिका मार्गीं ॥
॥ स्वच्छ जळाचा कूप ॥५॥ प्रजेला०
॥ सतीस पति कीं, माते भेटे ॥
॥ प्रेषित सुत सुखरूप ॥६॥ प्रजेला०
॥ कवि कविचीं, ईशभक्ति कीं ॥
॥ येई दृश्य स्वरूप ॥७॥ प्रजेला०

॥ सत्कारा नृपती । राणी बेडानिया येती ॥ध्रु॥
॥ पुण्यश्लोका विजया राणी । सकल जनांची होय शिराणी ॥
॥ वात्सल्याची गमली खाणी । करुणा पूर्णा वदली वाणी ॥
॥ त्यांचे नातू धीर प्रकृति । वैभवशाली, प्रबुद्धमती ॥१॥ सत्कारा नृपती०
॥ सुत विजयेचा एडवर्ड नामा । सूनृतवाणी ॥ योजुनि कामा ॥
॥ राष्ट्रा राष्ट्रा मधिं करि सामा । मिळवुनि नामा जाय विरामा ॥
॥ पुत्र तयाचे नाविक नृपती । पंचम जॉर्ज अशी ज्या ख्याती ॥२॥ सत्कारा नृपती०
॥ बाल्यापासुनि नाविक दीक्षा । घेति रहस्य सारी शिक्षा ॥
॥ अति काठिण्या ही देति परीक्षा । अग्रिरथांची कारिती रक्षा ॥
॥ पावुनि विमला उन्नत महती । सपादीती स्वजन प्रीती ॥३॥ सत्कारा नृपती
॥ उच्च कुलाची सारुनि महती । रात्रंदिन उद्योगी रमती ॥
॥ नाविक भोळे यांसह वसती । क्रीडा सात्विक सुजना परि ती ॥
॥ राया रंका भेटी देती । विसरति नच निज दानत रीती ॥४॥ सत्कारा नृपती
॥ दैवें नेता प्रम निधान । ज्येष्ठ भ्राता, त्याचा मान ॥
॥ ओघें आला; गर्व मनीं न । एकच रीती, हो न नवीन ॥
॥ मार्गे जैसें तैसें पुढती । साधु जनांची संतत रीती ॥५॥ सत्कारा०

तो इतर राजपुत्रांमध्यें दुर्मिळ तर परंतु साधारण लोकांमध्यें सुद्धां . तो गुण ह्यः ते अतिशय मेहनती आहेत. ते आपल्या त्या वर्षीच आरमारामध्यें शिरले व तेथें आपल्या ळपणानें ते आरमाराच्या ह्या पावेतों चढले.

॥ त्यारीती सगुणा प्रेमळ वर्षें त्यांनीं आरमारामधीमध्यें त्यांजपुढें
॥ होनां दीनां लक्ष्मी आर्या म्हणून तेथें त्यांनीं हि प्रमाणें काम
॥ प्रमळ जैशी विजया गातांमनंदानें केलें दाक्षिण्या घेती ॥६॥ मध्यें गेलें
॥ सिंहासनीं जैं तात विराजे त्यां बं
॥ दाक्षिणकर कीं सुत त्या साजे ॥
॥ साम्राज्याचा डंका गाजे ॥
॥ राजीं त्यांतिल समस्त राज्यें ॥
॥ फिरुनी सारे देश पहाती ॥
॥ अंतर जाणुनि साराचि घेती ॥ ७ सत्कारा नृपती
॥ पंचाधिक ती वर्षे झालीं ॥
॥ आले प्रथमाचे पंचम सालीं ॥
॥ हिंद जनाचे पंचम वालीं ॥
॥ दर्शन द्याया स्वारी आली ॥
॥ प्रेमुदित जनमन-उदधि स्वातीं ॥
॥ राजाविधू हा पुरविल आर्ति ॥ ८ सत्कारा नृपती०
॥ हिंद जनाची कार्ले अनुरक्ति ॥
॥ संकट समयीं सोशिक वृत्ति ॥
॥ राजावरतीं अतुला भक्ति ॥
॥ देवाचि गणिते हृदयासक्ति ॥
॥ ठावी पहिल्या भेटी अंतीं ॥
॥ सकलां लोकां विश्रुत कारितीं ॥ ९ सत्कारा नृपती
॥ गड्यांनो, कल्पद्रुम फळला ॥
॥ होई इष्ट लाभ सकला ॥ ध्रृ० ॥
॥ शांतानींना केवळ घोतर ॥
॥ दिनां भोजन गोड ॥ मिळाले दीन
॥ बाळां पदकें बर्फी पेढे ॥
॥ मिळती, पुरले कोड ॥ सरें पुरले
॥ रोग्या औषध हलूंच ! नाणों ॥
॥ तळहातांचा फोड ॥ तळहातीचा०
॥ कैद्या सुटका ! फिरुनि उगवें
॥ नीतिस सुंदर मोड ॥ नवल नीतिस
॥ जनहितकारी पदव्या लाभती ॥
॥ स्तुति पत्रांची झोड ॥ किति तरी झा
॥ सन्मानानें पुष्ट होति ते ॥
॥ असती पूर्वीं गेड ॥ होते पूर्वी रोड
॥ गिनी साव्हरिन रुपये झडती ॥
॥ बेरंग पुसे ती मोड ॥ रुपयाचे ती मोड०
( चाल ) कद्रुची ही पिशवी खुलली
॥ सशय मति ती मनीं विरली ॥
॥ उदार वृत्ती झणीं विकसली ॥
॥ उत्साहाला भरती आली ॥
( चाल ) ॥ प्रेम वाढलें, ओघ मिळा सागर एकचि बनला ॥ गड्यांनो०
॥ अमुचे भाग्य उदेलें । नृप इतुके विदु आले ॥ ध्र
॥ पट्टारोहण निमित्त उत्सव ! किति तरी गौरव केले ॥१

…… मैत्रक
काय हे …लें ॥२॥
एकच गा मुरास सूर
लोकप्रि मिळाले ॥३॥
हे …। आनंदें जग
पं… डोलें ॥ ४ ॥
… द्यावें ॥ ध्रु ॥
…रपतिला । दिधलें तें
राखावें ॥ १ ॥
…यांचें आयू । दीर्घ निरामय
व्हावें ॥ २ ॥
…चें सार असें जें । प्रेम सदा
जागावें ॥ ३ ॥
…ध्यें शांति राहुनी । वैभव वाढत
जावें ॥ ४ ॥
…प्रेम नयाच्या छत्राखालीं । विभक्त एक
वटावें ॥ ५ ॥
॥ उद्धत रिपुचें कंदन होउनि । साम जगीं
नांदावें ॥ ६ ॥
॥ आर्तऋणीं कास बांधुनीं । उद्योगा
लागावें ॥ ७ ॥
॥ साराया अज्ञान तमाला । ज्ञान दीप
लागावे ॥ ८ ॥
॥ दृढतम नयविश्वास जडोनी । भलते
भेद नुरावे ॥ ९ ॥
॥ जनांत पुष्टी तुष्टी व्हावी । मंगल सदा
असावें ॥ १० ॥

---

# वऱ्हाडसमाचार

मार्गशिर्ष वद्य १३ शके १८३२ दुंदुभिनाम संवत्सरे

---

## जाहिरनामा.

### ( चक्रवर्ती बादशहांचा संदेश )

जॉर्ज, मलिक—मा—आझम—कैसरे—हिंद,

ज्या अर्थी आमच्या बादशाही राज्यारोहणाचा महोत्सव सर्व शक्तिमान् परमेश्वराच्या अनुग्रहानें व कृपेनें इ. स. १९११ या वर्षाच्या जून महिन्याच्या बाविसाव्या तारखेस करावा असा इरादा आमच्या कारकीर्दीच्या पहिल्या वर्षी आह्मी इ. स. १९१० या वर्षाच्या जुलै महिन्याच्या एकोणिसाव्या तारखेच्या आणि नोव्हेंबर महिन्याच्या सातव्या तारखेच्या आमच्या बादशाही जाहिरनाम्यामध्यें प्रदर्शित व जाहीर केला होता;

आणि ज्या अर्थी सर्व शक्तिमान परमेश्वराच्या अनुग्रहानें व कृपेनें तो महोत्सव गेल्या जून महिन्याची तारीख बावीस गुरुवार या दिवशीं आह्मांस सिद्धीस नेतां आला;

आणि ज्या अर्थी आमच्या कारकीर्दीच्या पहिल्या वर्षी आह्मीं इ. स. १९११ या वर्षाच्या मार्च महिन्याच्या बावीसाव्या तारखेच्या आमच्या बादशाही जाहिरनाम्यामध्यें सदर्हू महोत्सव अशा रीतीनें झाल्याचें आमच्या हिंदी साम्राज्यांतील आमच्या सर्व प्रीतियुक्त प्रजाजनांस आह्मीं स्वतः जाहीर रीतीनें कळवावें आणि आमच्या गव्हर्नरांनीं, लेफ्टनंट गव्हर्नरांनीं व आमच्या इतर अमलदारांनीं आणि आमच्या संरक्षणाखालीं असलेल्या देशी संस्थानांच्या राजेरजवाड्यांनीं व अमीरउमरावांनीं आणि आमच्या हिंदी साम्राज्यांतील सर्व प्रांतांच्या प्रतिनिधींनीं आमच्या हुजूर हजर रहावें अशी आमची इच्छा व मनीषा आहे असें जाहिर केलें होतें;

त्या अर्थी आतां आह्मी या आमच्या बादशाही जाहिरनाम्याच्या द्वारें आमचें राज्यारोहण झाल्याचें जाहिर करतों; आणि प्रस्तुत प्रसंगीं दिल्ली येथें एकत्र झालेल्या आमच्या सर्व अंमलदारांचें आणि सर्व राजेरजवाड्यांचें व लोकांचें आह्मी बादशहा व मलिक—मा—आझम या नात्यानें अभिवादन करून आमच्या हिंदी साम्राज्याच्या संबंधानें आमच्या मनांत उत्कट प्रेम वसत असल्याबद्दल आह्मी आश्वासन देतों. या साम्राज्याच्या कल्याणाबद्दल व उत्कर्षाबद्दल आह्मी नेहमीं कळकळ बाळगीत आलों आहों आणि यापुढें तशी सदोदित बाळगीत जाऊं.

आमच्या कारकीर्दीच्या दुसऱ्या वर्षी तारीख १२ माहे दिसेंबर सन १९११ रोजीं दिल्ली येथील आमच्या दरबारातून जाहीर केला.

ईश्वर मलिक—मा—आझम—कैसरे—हिंद यांचे संरक्षण करो ?

---

## लाभक्रांती.

### ( श्रीमंत बादशहांचें नवें धोरण )

आह्मास प्रसिद्ध करण्यास आनंद वाटतो कीं, आमच्या प्रधान मंडळानें आमचे गव्हर्नर—जनरल इन—कौन्सिल यांचें मत घेऊन आह्मांस जी सल्ला दिली आहे, ती मान्य करून आह्मी असें ठरवितों कीं, कलकत्ता येथील हिंदुस्थान सरकारचें ठाणें हिंदुस्थानची प्राचीन राजधानी दिल्ली येथें आणावें आणि त्याजबरोबरच बंगाल इलाख्या पुरता एक गव्हर्नर, बिहार, छोटा नागपूर आणि ओरिसा या प्रांतांचें एकीकरण करून त्याजवर कौन्सिलसह एक लेफ्टनंट गव्हर्नर आणि आसाम प्रांतावर एक चिफ कमीशनर असे अधिकारी शक्य तितक्या लवकर नेमण्यांत यावे व या कामासाठीं राज्यव्यवस्थेंत जे फेरफार करावे लागतील व ज्या मर्यादा ठरवाव्या लागतील, ते फेरफार व त्या मर्यादा आमचे गव्हर्नर जनरल—इन—कौन्सिल यांनीं आमचे सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया इन कौन्सिल यांच्या पसंतीनें योग्य वेळीं कराव्रे. आमची अशी मनापासून इच्छा आहे कीं ह्या फेरफारांमुळें हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेंत चांगली सुधारणा होऊन आमच्या प्रजाजनांचें सुख आणि भरभराट यांची वृद्धि व्हावी.

---

## संदेश

### ( श्रीमंत बादशहांचें भाषण )

आज तुह्मांसमोर बोलण्यास उभे राहण्याचें मला मनापासून समाधान वाटत असून त्याबद्दल मी तुमचा आभारी आहे. या सालीं महाराणी साहेब व मी यांच्या आयुष्यांतील महत्वाचे समारंभ झाले असून त्यामुळें आह्मास विशेष दगदग झाली असली तरी तीनें आह्मांस सुखच होत आहे. पूर्वी आह्मी या देशांत आलों तेव्हांच आह्माला त्याबद्दल प्रेम वाटूं लागलें; आणि आमचा देश इतका दूर असतांना सुद्धां आह्मी पुनः इकडे आलों तेही प्रेमामळेंच आलों. ता० २२ जून रोजीं वेस्टमिनिस्टर अॅबेमध्यें आह्मांस विधिपूर्वक परंपरागत पद्धतीनें राज्याभिषेक झाला, तेव्हा तो राज्याभिषेक तुह्मा सर्वांना येथें प्रत्यक्ष येऊन जाहीर करण्याबद्दल मी आपल्या संदेशांत इच्छा व्यक्त केली होती ती ही माझ्या येथें येण्यानें सिद्धीस गेली. राजनिष्ठ एतद्देशीय राजेरजवाडे व हिंदुस्थानांतील इमानी लोक यांच्याबद्दल आह्मांस प्रेम वाटत असून साम्राज्याच्या हिता बद्दलची आस्था आमच्या हृदयांत वसत आहे, हें आमच्या आगमनानें आपल्या लक्षांत यावें हाही येथें येण्यांत आमचा उद्देश आहे. राज्यारोहण समारंभ प्रत्यक्ष पाहण्याची ज्यांना संधि मिळाली नाहीं त्यांना दिल्ली येथें समारंभात वाटा घेतां यावा हाही आमचा हेतू आहे. हा आजचा मोठा जनसमुदाय व त्यांत आमचे गव्हर्नर, अधिकारी, राजेरजवाडे, लोकांचे प्रतिनिधी, व लष्करांतील पलटणी पाहून मला व महाराणी साहेबांना अत्यानंद होत आहे, त्यांनीं आमच्याबद्दल जी राजनिष्ठा व्यक्त केली तीमुळें ही आह्मांस परमावधीचें समाधान झालें आहे. सहानुभूति व राजनिष्ठा या दोन मनोवृत्तींनीं राजरजवाडे व लोक यांचें या ऐतिहासिक महत्वाच्या प्रसंगीं एकीकरण झालेलें पाहून माझ्या मनावर विशेष परिणाम झाला. या महत्वाच्या प्रसंगाच्या संस्मरणार्थ माझ्या विशेष अनुग्रहाचें कांहीं चिन्ह मी कांहीं देणग्या आणि सवलती माझ्या गव्हर्नर जनरलच्यामार्फत जाहीर करणार आहे. तुमच्या हक्काच्या संरक्षणाबद्दल माझ्या पूर्वजांनीं तुह्मांस दिलेलीं आश्वासनें पुनः देण्याची मी ही संधि घेतों.

---

## देणग्या व सवलती.

### लोकशिक्षणास मदत.

बादशहांच्या हुकूमावरून सवलती जाहीर करतांना गव्हर्नरजनरल लॉर्ड हार्डिंज ह्मणाले.—स्टेट सेक्रेटरीच्या संमतीनें हिंदुस्थान सरकारनें हिंदुस्थानच्या वसुलावर शिक्षणाच्या प्रगतीचा श्रेष्ठ हक्क असल्याचें कबूल करण्यांत ठरविलें आहे; व शिक्षणासंबंधांत लोकांकडून जी अत्यंत प्रशंसनीय अशी मागणी करण्यांत येत आहे ती लक्षांत घेऊन शिक्षणाचा लाभ शक्य तितक्या जास्त प्रमाणांत लोकांना मिळावा अशी तजवीज करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे, वरील हेतु तडीस नेण्यासाठीं बहुजनसमाजाच्या खऱ्या शिक्षणासाठीं तातडतोब ५० लाख रुपये खर्च करण्याचा सरकारचा संकल्प आहे. आतां जाहीर केलेल्या ५० लाखाच्या ग्रँटमध्यें या पुढें सढळ हातानें जास्त ग्रँटसची भर घालण्याचा सरकारचा दृढ संकल्प आहे.

### लष्करी कामगारांस सवलत.

नॉनकमिशन्ड ऑफिसर व ज्यांचा पगार महिना ५० रुपयाहून कमी आहे असे सैन्यांतील आणि आरमारांतील शिपाई यांना अर्ध्या महिन्याचा पगार देण्याचें ठरविलें आहे.

हिंदी सैन्यांतील अधिकारी व रिझर्व्हिस्टस हे व्हिक्टोरिया क्रॉसच्या देणगीस पात्र समजले जातील. आर्डर ऑफ ब्रिटिश इंडियामध्यें पढच्या दहा वर्षांत आणखी ५२ नेमणूका अधिक होतील. सरहद्दीवरील मलिशिया कोअरमधील हिंदी अधिकारी व लष्करी पोलिस यांचा सदर ऑडरमध्यें समावेश करण्यात येईल. लष्करांतील कांहीं हिंदी अधिकाऱ्यांना त्यांच्या उत्कृष्ट नोकरीबद्दल जमिनी बक्षिस देण्यात येतील. इंडियन आर्डर ऑफ मेरिटमधील सैनिकांच्या विधवांना तीन वर्षेपर्यंतच हल्लीं अलावन्स मिळत असतो तो तहहयात केला जाईल.

### बिन-लष्करी खातें.

दरमहा ५० रु० हून अधिक पगार नाहीं अशा बिनलष्करी खात्यांतील सर्व नोकरांना अर्ध्या महिन्याचा पगार बक्षिस देण्यात येईल. रावसाहेबापासून दिवाण बहादुरापर्यंतच्या पदवीधरांना विशिष्ट प्रकारचे बिल्ले देण्यांत येतील. महामहोपाध्याय व शम्सुल उल्म ह्या पदव्या असलेल्या व यापुढें मिळणाऱ्या लोकांना कांहीं वार्षिक तनखा देण्यांत येईल.

### नजरणा घेण्यांत येणार नाहीं.

नवीन वारस गादीवर बसतेवेळीं एतद्देशीय संस्थानाकडून घ्यावयाचा नजराणा यापुढें घेण्यांत येणार नाहीं. गुजराथ, काठेवाड व मेवाड येथील लहान लहान संस्थानिकांना सरकारचें किरकोळ कर्ज असेल तें माफ करण्यांत येईल.

### कैद्यांची मुक्तता.

गुन्ह्याबद्दल व वाईट वर्तणुकीबद्दल हल्लीं तुरुंगांत असलेल्या कांहीं कैद्यांची त्याच प्रमाणें केवळ दारिद्र्यामुळें ज्यांना सावकारांचें कर्ज देता आलें नाहीं ह्मणून दिवाणी तुरुंगात असणाऱ्या लोकांची मुक्तता करण्यांत येऊन त्यांचें कर्ज जाहीर होणाऱ्या अटींवर व शर्तींवर सरकाराकडून देण्यांत येईल.

---

## विद्यार्थ्यांचें राज्यारोहण.

आकोल्यांतील इंग्रजी व मराठी मिळून सर्व शाळांमधील सुमारें १ हजारावर विद्यार्थ्यांनीं येथील दरबारच्या भव्य, सुशोभित व रमणीय सभामंडपांत मंगळवारच्या राज्यारोहणाच्या समारंभाला आदले दिवशींच प्रारंभ केला. सूर्योदया पूर्वीच सर्व विद्यार्थी मंडपांत जमले. त्यांचें शिक्षक, इन्स्पेक्टर इत्यादि मंडळी विद्यार्थ्यांच्या रांगा लावण्यांत, त्यांच्या छानछुकीच्या पोषाखांत नीटनेटकेपणा आणण्यांत, त्यांच्या मधील व्हालंटीअर विद्यार्थ्यांकडून कवाईतीच्या गोष्टी बरोबर करून घेण्यांत अगदीं तल्लीन होती. असा अपूर्व देखावा पाहण्यास जनसमूह मंडपाकडे साडेसाताच्या सुमाराला लोटला. सूर्यप्रकाशांत विद्यार्थ्यांचे चित्रविचित्र रंगीत पोषाख चमकत होते, त्यांचें प्रसन्न हसतमुख चेहरे सर्वजणांस आकर्षून घेत असत आणि त्यांच्या आनंदाच्या गर्जना सर्व दिग्मंडल दणाणून देत असत. त्यांचा उत्साह, वीरश्री व आनंदी आनंद पाहून असा भास होई कीं मणू

काय हे विद्यार्थीच सिंहासनावर बसण्यासाठीं एकच गर्दी करून सोडीत आहेत. आमचे लोकप्रिय डिपुटी कमिशनर मेजर श्रीडन हे अध्यक्षस्थानीं विराजमान होतांच श्रीमंत् पंचम जाजे व सौभाग्यवती मेरी यांच्या नांवानें जयघोष व धन्यवाद सुरूं झाला आणि त्या नंतर येथील हायस्कुलांतील शिक्षक रा० रा० गणेश रामचंद्र दामले बी. ए. यांनीं उत्कृष्ट उपदेश केला. हा उपदेश तात्विक दृष्ट्या प्रगतीपर, विद्यार्थ्यांस उत्तेजक आणि सुशील बनविणारा असा असल्यामुळें आह्मी तो समग्र खालीं देत आहों:—

मुलांनों तुह्मा सर्वांस ठाऊकच आहे कीं आजचा दिवस आद्वितीय आनंदोत्सवाचा आहे. कारण आपले परमदयाळू व अतुल वैभवशाली बादशहा "जॉर्ज दि फिफ्थ" हे आपल्या परम भाग्यशाली पत्नी ज्या मेरी राणी साहेब ह्यांच्या सहवर्तमान आपल्या या हिंदुस्थान देशाचे सध्या पाहुणे आहेत व उद्यां ह्मणजे तारीख १२ डिसेंबर रोजीं, दिल्ली येथें त्यांचा बादशाही गादीवर बसण्याचा समारंभ मोठ्या थाटानें व्हावयाचा आहे. हे हिंदुस्थानामध्यें राज्याभिषेका कारितां आलेले बादशहा पहिलेच होत. ह्मणून आजचा हा दिवस फार अपूर्व आहे व तो या देशाच्या इतिहासांत सोनेरी अक्षरांनीं लिहून ठेवण्या सारखा आहे. हाच अपूर्व दिवस साजरा करण्या कारितां आपण सर्वजण येथें आलों आहोंत व ह्मणून आपले दयाळू बादशहा जे 'जॉर्ज दि फिफ्थ' त्याजबद्दल राजनिष्ठा या विषयावर तुह्मास चार शद्ब सांगण्याची अमोलिक संधी हीच आहे.

मी काय ह्मणतों हें तुह्मा सर्वांस स्पष्टपणें कळावें व त्याचा ठसा तुमच्या मनावर होईल तितका बळकट उमटावा ह्मणून माझें ह्मणणें तुह्मास समजेल इतक्या सोप्या भाषेंत मी तुह्मा पुढें मांडतों. तिकडे तुह्मी लक्ष द्याल अशी आशा आहे.

राजनिष्ठेविषयीं सांगावयाचे अगोदर राजनिष्ठा ह्मणजे काय हें तुह्मांस सांगितलें पाहिजे. ह्मणून आपण अगोदर तिकडे वळूं. तुह्मी येथें आलांत ते कोठून बरें आलांत! तुह्मा पैकीं प्रत्येकजण येथें आपल्या घरून आला. घर ह्मणजे काय? घर ह्मणजे कुटुंब. कुटुंब कसें नांदतें याचा आपण विचार करूं. कारण या कुटुंबामध्यें राजा आहे, प्रजा आहे, राजनिष्ठा आहे, कायदा आहे, शिस्त आहे, सर्व कांहीं आहे. ह्मणून घर किंवा कुटुंब हें कशावर अवलंबून असतें हें पाहूं या.

घरोघर आपणास काय बरें व्यवस्था आढळून येते? घरोघर बाप लेंक, नवरा बायको, मालक व चाकर हे संबंध आपल्या दृष्टीस पडतात. घरून तुह्मी येथें दरबारच्या ठिकाणीं आलांत. येथें तुह्मास आणखी काय बरें आढळून येतें? येथें तुह्मास हे आपले राजे साहेब व आपण सर्व त्यांच्या प्रजा व अम्मलदार व त्यांचे हाताखालचे कामगार असे आणखी दोन संबंध नवे दृष्टीस पडतात. जगाच्या पाठीवर आपण कोठेंही गेलों तरी हेच संबंध दृष्टीस पडतील. ह्मणून हे संबंध ह्मणजे संपूर्ण मनुष्य समाजाचा पाया आहे किंवा समाजाचे ते केवळ पंचप्राण आहेत.

आतां या पंचप्राणाचाही प्राण असा जो संबंध तो कोणता याचा शोध केल्यास तुह्मास असें आढळून येईल कीं 'कायदा व शिस्त' एवढेंच या सर्व संबंधाचें सार आहे. ह्मणून कायदा व कायदेशीर वर्तन हीं जेथपर्यंत कायम आहेत तेथपर्यंतच कुटुंबें सुखांत रहातील परंतु कायदा व कायदेशीर वर्तन हीं ज्या दिवशीं नाहींशीं होतील त्या दिवशीं आपणास आपलीं घरेंदारें नकोशीं होतील व हें संपूर्ण विश्वकुटुंब विस्कळीत होऊन जाईल.

ही स्थिती येऊं नये व सर्वत्र घरीं व बाहेर शांतता व सुख हीं नांदावीं ह्मणून सर्व जगांत घरीं आइबापांची, तशी सर्वत्र राजाची आज्ञा शिरसामान्य करण्यांत येते. राज्य ह्मणजे तरी लक्षावधि कुटुंबें मिळून झालेलें एक मोठें कुटुंबच आहे व त्या कुटुंबाचा मालक राजा आहे. ह्मणून ज्या प्रमाणें घरीं आपल्या आईबापाची आज्ञा पाळन करणें ह्मणजे आपण आपलें पवित्र कर्तव्यकर्म समजतों त्याप्रमाणें सर्वत्र व सर्व बाबतींत आपल्या दयाळू बादशहाची आज्ञा पाळणें हें आपलें कर्तव्य कर्मच आहे. कारण बादशहा तरी राज्यरूपी कुटुंबाचा मालक आहे व त्यास बापाप्रमाणेंच प्रजेचें संरक्षण करावें लागतें. व सर्व प्रकारें त्यांच्या सुख समाधानाची काळजी वहावी लागते. सारांश घराला जसा बाप तसा राष्ट्राला राजा आहे. ह्मणून राजनिष्ठा ह्मणजे बादशहा त्याचे कायदे व त्याचे प्रतिनिधी यांस शिरसावंद्य मानणें व त्यांच्या आज्ञे बरहुकूम आपलें वर्तन ठेवणें हेंच होय. मुलें जर बापाचें ऐकणार नाहींत तर बाप सुद्धां मुलांचें कल्याण करण्यास समर्थ होणार नाहीं. तद्वत् आपण जर बादशहाचे व त्यांच्या प्रतिनिधींचे हुकूम मानणार नाहीं तर ते सुद्धां आपल्या कल्याणाच्या गोष्टी करण्यास समर्थ होणार नाहींत.

मुलांनों "माबाप सरकार" अशी आपल्यामध्यें जी ह्मण आहे तिचा सारांश हाच आहे. ती ह्मण किती यथार्थ आहे हें तुह्मांस आतां स्पष्टपणें कळलेंच असेल. तें स्पष्ट करण्याकरितांच मी हा इतका विस्तार केला. या ह्मणीप्रमाणेंच आपले पूर्वज अनंत पिढ्या वागत आले. याच ह्मणीप्रमाणें आह्मीही वागत आलों. ह्मणूनच आजचा हा सोन्याचा दिवस आपले नजरेस पडला. ह्मणून या ह्मणी प्रमाणेंच पुढेंही तुह्मी आपलें वर्तन ठेवा व आपले परम दयाळु व अतुल वैभवशाली बादशहा जे "जॉर्ज दि फिफ्थ" यांस आपले "माबाप सरकार" या नात्यानें मान द्या, व सदा सर्वकाळ त्यांचे अंकित रहा, असें आमचें वडील पिढीचें, तुह्मा तरुण पिढीस, आग्रहाचें सांगणें आहे.

मुलांनों मला तुह्मांस हेंही सांगणें जरूर आहे कीं आपल्या बादशहास आपले 'माबाप सरकार' ह्मणून मान देण्याची ही जी आपली पद्धत आहे, ती हिंदुस्थानापुरतीच आहे व दुसरीकडे कोठें तिचा अंमल नाहीं असें तुह्मी समजूं नका. आपल्या इकडच्या या प्राचीन ह्मणीनें जो भावार्थ 'आपण व्यक्त करितो तोच भावार्थ खुद्द इंग्लेंड देशांत व युरोप खंडांत 'Hero worship' किंवा विभूति पूजा या शद्बांनीं व्यक्त केला जातो. व आपणा हिंदवासी लोकांचा आपल्या ह्मणीवर जितका विश्वास आहे तितकाच त्यांचाहि विभूति पूजेवर आहे.

आतां विभूति पूजेची त्यांची कल्पना काय आहे ती मी तुह्मांस थोडक्यांत सांगतो. ती कल्पना अशी:- आपल्या बांधवां पैकीं एका बांधवामध्यें कांहीं ईश्वरी अंश आहे असें समजून व त्यास ईश्वरानें आपला मार्गदर्शक ह्मणून पाठविला आहे असें मानून त्याजपुढें मान वांकविणें, त्याचे आज्ञेत वागणें व त्यास सर्वतोपरी मान देणें--हा विभूति पूजेचा थोडक्यांत सारांश आहे. ही त्यांची विभूति पूजेची कल्पन व आपली अवताराची कल्पना ह्या भिन्न आहेत काय? मुळींच नाहींत. ज्याला आपण अवतार असें हिंदुस्थानामध्यें ह्मणतो त्यालाच ते 'Hero' असें ह्मणतात. ते आपल्या राजाला आपला 'Hero' असें समजतात व त्याच्या आज्ञा शिरसावंद्य मानतात.

आपल्या पवित्र हिंदु धर्मग्रंथामध्यें देखील ही कल्पना स्पष्टपणें नमूद केलेली आहे. ती अशी:— "ना- विष्णु:पृथिवीपति" ह्मणजे जो जो पृथिवीपति किंवा राजा ह्मणून आहे तो विष्णुचाच अंश किंवा अवतार आहे. या प्रमाणें आपले पवित्र धर्मग्रंथ आपणास असें शिकवितात कीं आपले परम दयाळू बादशहा 'जॉर्ज दि फिफ्थ' हे इश्वराचे अंशभूत आहेत आणि ह्मणून ज्याप्रमाणें आपण ईश्वराचे ठिकाणीं श्रद्धा ठेवतों त्याचप्रमाणें आपण आपले दयाळु बादशहास पुज्य समजून त्याजवर निष्ठा ठेविली पाहिजे. यास्तव, मुलांनों, आपल्या दयाळु बादशहाशीं राजनिष्ठ राहणें ह्मणजे आपलें एक पवित्र धर्म कृत्यच आहे.

मुलांनों येथवर तुह्मांस मी जें कांहीं सांगितलें तें आपल्या धर्माच्या व पवित्र कर्तव्य कर्माच्या दृष्टीनें सांगितलें. आतां मी तुह्मांस आपल्या परम दयाळु बादशहाच्या चरित्रांतील कांहीं गोष्टी सांगणार आहे. त्या तुह्मी ऐकिल्या ह्मणजे आपल्या बादशहाशीं राजनिष्ठ रहाणें हें आपलें पवित्र धर्मकृत्य व कर्तव्यकर्म असून शिवाय तें एक आनंदाचें कृत्य आहे असें तुह्मांस वाटूं लागेल. त्या गोष्टी येणें प्रमाणें –

१ ली गोष्ट:— आपल्या परम दयाळु बादशहाची राहणी अत्यंत साधी आहे. ती इतकी साधी कीं त्यांच्या सत्तेकडे व वैभवाकडे पाहून ती तुह्मांस खरीसुद्धां वाटणार नाहीं. परंतु ज्यांनीं ज्यांनीं त्यांना सन १९०५ सालच्या भेटीच्या वेळीं व परवां ह्मणजे गेल्याच्या मागील शनिवारीं मुंबईच्या रस्त्यामध्यें त्यांच्या साध्या पांढऱ्या पोषाखामध्यें पाहिले असेल त्यांस माझ्या ह्मणण्याचा दुसरा पुरावा देण्याचें कारण नाहीं.

दुसरी गोष्ट: आपल्या परम दयाळू बादशहामध्यें दुसरा एक अमोलिक गुण आहे. तो इतर राजपुत्रांमध्यें दुर्मिळ तर खराच परंतु साधारण लोकांमध्यें सुद्धां दुर्मिळ आहे. तो गुण हा: ते अतिशय उद्योगी व मेहनती आहेत. ते आपल्या वयाच्या १३ व्या वर्षींच आरमारामध्यें उमेदवार ह्मणन शिरले व तेथें आपल्या उद्योगीपणानें व कष्टाळुपणानें ते आरमाराच्या मुख्य अधिकाराच्या हुद्या पावेतों चढले. याप्रमाणें एकंदर ३३ वर्षें त्यांनीं आरमारामध्यें नोकरी केली या अवधीमध्यें त्यांजपुढें कामाचा राजरस्ता खुला नसून तेथें त्यांनीं एखाद्या साधारण खलाशा प्रमाणें काम करावें व तसें त्यांनीं मोठ्या आनंदानें केलें एकवेळ यांचे जहाज जर्मनी मध्यें गेलें असतांना तेथें त्यांस पाहण्या कारितां बंदरावर लोकाची गर्दी जमली. परंतु ते कोणास ओळखूं आले नाहींत. याचें तरी कारण हेंच कीं ते एखाद्या साधारण खलाशाच्या पोशाखामध्यें असून साधारण खलाशा प्रमाणेंच अगदीं निकृष्टप्रतीचीं कामें सुद्धां करीत होते. या त्यांच्या अतीशय साधेपणामुळें व कर्तव्यनिष्ठेमुळेंच त्यांस इग्लंडमध्यें 'सेलर किंग' किंवा 'खलाशी राजा' असें विशेषण देतात. अशा प्रकारच्या कर्तव्यनिष्ट व कार्यक्षम बादशहाच्या अमलाखालीं असणें हें आमचें सुदैवच आहे. कारण अशा प्रकारचे बादशहा आपल्या प्रजेच्या अंत:करणांमध्यें संपत्तीचें व सुखाचें माहेरघर जो उद्योग त्याची प्रेरणा खास करतील. जो कोणी आपल्या दयाळू बादशहाच्या तसबिरीकडे पाहील त्यास त्यांच्या चेहऱ्यावर एकप्रकारचा विलक्षण धडधाकटपणा आढळून येईल. हा धडधाकटपणा त्यांच्या ३३ वर्षांच्या एकनिष्ठपणें केलेल्या कष्टांची साक्षच आहे ह्मणून त्यांच्या मुखाकडे पाहून त्यांच्या प्रजेपैकीं कोणांस बरें उद्योगाची स्फूर्ति होणार नाहीं? प्रत्येकास होईल असें अनुमान काढण्यास जागा आहे.

तथापि मुलांनों त्यांच्या चेहऱ्यावरील या धडधाकटपणा बरोबरच त्यांच्या दृष्टी मधून किती तरी सौम्य तेजाची ज्योत बाहेर पडून चमकताना आपले दृष्टीस पडते बरें! ही ज्योत त्यांच्या अंत:करणाचें प्रेम इतक्या स्पष्ट रीतीनें व्यक्त करीत आहे यांत नवल नाहीं. कां कीं आपल्या प्रथम चक्रवर्तिनी ज्या दयाळू व्हिक्टोरिया राणी साहेब त्यांचे हे नातु आहेत व सध्याच्या युगाचे शांततापक्षाचे जगांतील अग्रगण्य बादशहा जे दयाळू मातेव एडवर्ड त्यांचे हे चिरंजीव आहेत ह्मणून मनुष्याचें अंत:करण आपल्या प्रेमानें वेधून टाकण्यामध्यें यांचा हातखंडा आहे असें सांगतात त्यांत नवल नाहीं.

तसेंच, मुलांनों, आपले परमदयाळू बादशहा व त्यांच्या प्रियपत्नी मेरी राणी साहेब यांनां लहान मुलां संबंधानें अतीशय सहानुभूति आहे. गेल्या जून महिन्यामध्यें जेव्हां त्यांस लंडनमध्यें राज्याभिषेक झाला तेव्हां त्यांनीं लंडन मधील मुलांना एक मेजवानी खाना दिला. त्यावेळीं इतकीं मुलें गोळा झालीं होतीं कीं त्यांना मेजवानीचे ठिकाणीं आणावयास १०० स्पेशल गाड्या सोडाव्या लागल्या होत्या.

मुलांनों, आपल्या दयाळू बादशहाना तुमचे बद्दल वाटत असलेल्या सहानुभूतीचा

आणखी एक पुरावा मी देतों. तो हा कीं आज तुह्मापैकीं बहुतेकांना आपल्या दयाळू बादशहाच्या चित्रानें सुशोभित केलेलें पदक मिळणार आहे. असेंच पदक सर्व हिंदुस्थानभर बहुतेक विद्यार्थ्यांना मिळणार आहे. आजपर्यंत इतकीं पदकें कधींतरी देण्यांत आलीं होतीं काय? कधींहि नाहीं. व आज तीं देण्यांत येणार आहेत याचें कारण काय बरें? याचें कारण आपल्या दयाळू बादशहाना तुह्माबद्दल वाटत असणारी कळकळ हेंच होय. ह्मणून मुलांनों आपल्या परम दयाळू बादशहाची ही तुह्माला प्रेमाची देणगी आहे. व ती क्षणिक सुख देणाऱ्या मेजवानी पेक्षां अधिक योग्यतेची आहे. ह्मणून ही देणगी फार जपून ठेवा व ती अशा ठिकाणीं ठेवा कीं तिजकडे पाहून तुह्माला तुमच्या परिश्रमाच्या वेळीं वरचेवर उत्तेजन यावें, निराशेच्या प्रसंगीं तुह्मास धीर यावा व परिस्थितीशीं टक्कर देण्याची तुमची शक्ति वाढावी हा लाभ तुह्मास या पदकापासून होवो अशी मी इश्वरापाशीं मागणी मागतों.

मुलांनों अशा प्रकारच्या साध्या रहाणीच्या, कष्टप्रिय, कार्यक्षम व तुमच्यावर प्रेम करणाऱ्या बादशहावर प्रेम करणें कांहीं कठीण आहे काय ? मुळींच नाहीं. तुह्मी त्याना आपल्या राजनिष्ठ अंतःकरणामध्यें मोठ्या प्रेमाणें स्थळ द्याल अशी मला खात्री वाटते. मुलांनों, खात्री वाटते असें मी ह्मणतों याला कारणें आहेत. उत्तम ग्रह च्या अमलाखालीं रहाणें हें सुदैवाचें लक्षण मानतात. परंतु आपल्या प्रजेवर पुत्रवत प्रेम करणाऱ्या एकामागून एक अशा राजांच्या व राण्यांच्या अमलाखालीं रहाणें हें त्याहीपेक्षां अधिक सुदैवाचें समजलें पाहीजे तुह्मापैकीं बऱ्याच जणानीं मागील दोन दयाळू कारकीर्दींचा अनुभव घेतलेला आहे. त्यांच्याच वंशात जन्म घेतलेले हे सध्याचे गुणवान व दयाळू बादशहा त्यांच्या तक्तावर विराजमान आहेत. व ह्मणूनच सर्व देशभर त्याविषयीं इतकी अलौकिक सहानुभूति व अद्वितीय प्रेमभाव दाखविला जात आहे.

भाषण संपण्यापूर्वीं, मुलांनों, आपण सर्वजण प्रार्थना करूं या कीं आपल्या परम दयाळू बादशहांना व त्यांच्या प्रिय पत्नी मेरी राणीसाहेब यांना हिंदुस्थानांतील प्रवास अत्यंत सुखाचा होवो, ईश्वर त्यांचे सकल अरिष्टांपासून संरक्षण करो, त्यांस सुखरूपपणें त्यांच्या सुखमय अशा जन्मभूमीला परत जाण्यास समर्थ करो व आमचेवर राज्य करण्यास त्यांस दीर्घायुष्य देवो.

त्या नंतर मेजर ब्रेडन साहेबांनीं विद्यार्थ्यांचा तो अद्वितीय महोत्सव पाहून मोठ्या प्रेमळ वाणीनें आपले आनंदोद्गार व्यक्त केले. शाळागृह व खेळाचे मैदान ही इंग्लंडांमध्यें विद्यार्थ्यांचे शील बनवित असतात. माणसाचें शील हीच सर्व भावी राष्ट्राची इमारत आहे. येथील विद्यार्थ्यांचें सद्वर्तन त्यांची शीस्त आणि त्यांचा गुरूजना विषयीं आदरभाव पाहून त्यांस विशेष आनंद वाटला. नंतर मुलास पदकें वाटण्यांत येऊन पानसुपारी, अत्तर गुलाब वगैरे देण्यांत येऊन सभा बरखास्त झाली.

———:0:———

## *The real Coronation Durbar.*

The past week has been historic and unique in the anna's of India, and during this time this vast Continent has been devoting itself whole-heartedly to celebrating the Coronation Durbar What does this Coronation Durbar mean?

India's modern history presents certain mile stones that stand out in strong relief against her yearly background of work done and progress made.

We refer to the great Delhi Assemblage of 1877, then to the Delhi Durbar held under the auspices of Lord Curzon to celebrate the coronation of his late Majesty King Edward 7th, then to the advent of their Royal Highnesses the Prince and Princess of Wales, and finally to the coming of His Imperial Majesty King George 5th, and her Majesty Queen Mary.

This is the first time in the history of England that her Sovereign has visited any of his Dominions beyond the seas, and India should indeed be proud to think that she has been the first to be favoured in this manner.

We must then all fully recognise that His Majesty indeed has the welfare of India at heart, and that the sentiments expressed in his Proclamation are not mere empty words.

If his Majesty then has the welfare of India at heart it surely beloves us, who live in India, also to work for our country and to look to its interests

India has well been described as being in a transition stage, education is making great progress, and during this progress many new thoughts and new aspirations are bound to be born. Much of the political license that has been committed has been the outcome of political ignorance, fostered by ignorant men who can only see the immediate future before them. Before agitating one should have a clear idea of the grievance the agitation is directed to removing. Many of us are able to criticise, and all of us are open to criticism: a policy of destruction is an easy one to preach, but the policy of construction is indeed a difficult one to carry out. We venture to suggest that no one should allow himself to criticise unless and until he feels himself able also to construct. We do not call a Doctor in to tell us how very ill we are, we do not mind his informing us that we are ill, but unless he can suggest some remedy we do not feel that we have derived much benefit from his visit.

We shall not be far off the right road if we remain true to our Emperor, true to our Country, true to our Empire, and last but by no means least, true to ourselves. The first duty of each one of us is to bear true allegiance to our Sovereign, then we should look to our Country and work for its advancement in all things. Further we should all remember that we are members not merely of a caste, or, a Country, but of an Empire, and we must not forget the interests of this Empire, but be proud to be members of it.

Lastly let each remember that he must be true to himself, and therefore each should strive to make, and keep himself, a credit to Empire. Remember that a nation is made up of individuals, and if each individual is working, only for himself, that nation cannot be making progress: but if on the other hand each individual is working for the common good, then that nation is advancing on the shoulders of a people who know what it is to be true to themselves.

If then we can recognise and understand the hidden meaning of the Delhi Coronation Durbar, and know that this great event is a token of the future welfare of India, and the Empire, then the King Emperor's visit to this Country will have been more than a success, and will have results, not only in the immediate future, but for generations to come.

In conclusion then let us all fully recognise the King Emperor's visit as a token of his love for this Country and let us regard this visit as the beginning of a new era, which is to draw us closer together in ties of mutual friendship and regard. Let us hesitate to criticise, but always bear in mind that we all have faults, and turn our attention to removing our own defects rather then attempting to correct defects in others. An appreciation of the good in others is the only royal road to a good understanding, and without a good understanding between difrerent peoples we cannot hope for unity. Unity makes for strength and therefore let the prayer of every loyal man in India be, not merely for unity in India, but for unity in the whole Empire, let us try to be an United Empire serving an universally loved Emperor.

———

## राज्यरोहण समारंभ

### ( बादशाहा पांचवे जॉर्ज, यांचे दिल्ली येथील राज्यारोहणानिमित्त आकोलें येथील समारंभ. )

इंग्लंडचे राजे व हिंदुस्थानचे बादशाहा हे राज्यारोहणाचे निमित्तानें मुद्दाम हिंदुस्थानांत आल्यापासून सर्व हिंदुस्थान वासीयांना इतका आनंद झालेला आहे कीं दिवसा पताका, तोरणें मिरवणूकी, सभा व रात्रीं रोषनाई दारूकाम मेजवान्या वगैरे गोष्टींनीं जणूं काय ही भरतभूमी आपला आनंद पूर्णपणें व्यक्त करीत आहे असें वाटतें. दिल्लीस तक्तावर राजांचें राज्यारोहण होणें ही गोष्ट हिंदुस्थानचे लोकांस नवी नाहीं. ही फार प्राचीन काळांपासून असत आहे. परंतु सरासरी एक शतकपर्यंत या वहिवाटीस आळा बसल्यामुळें यापुढेंही ही कायमची बंद होणार अशी बरीच शंका होती. पण सुदैवानें आमचे बादशाहा आमचे लोकांत येऊन आमचे देशांतील अतिशय इतिहास प्रसिद्ध दिल्ली अथवा हास्तिनापूर येथें ता० १२-१२-११ रोजीं तक्तावर बसल्यामुळें पुनः सर्व हिंदुस्थानवासीयांना पूर्वीची आठवण झाल्याशिवाय राहणार नाहीं. व पुढेंही सदोदित ही रीत अखंड चालू राहील अशी सर्वांना खात्री वाटत आहे.

दिल्ली येथील बादशाहाचे राज्यरोहणानिमित्त सर्व हिंदुस्थानभर निरनिराळ्या ठिकाणीं उत्सव साजरे करण्यांत आले आमचे आकोलें शहरींही हा उत्सव फारच मोठ्या प्रमाणात होऊन सुदैवानें तो निर्विघ्नपणें पार पडला. या उत्सवामध्यें सरकारी ऑफिसर लोक, खाजगी धंदेवाईक मंडळी शेट सावकार शाळेंतील मुलें वगैरे सर्व नागरिक मंडळींनीं कोणत्याही तऱ्हेचा उच्च नीच भाव मनांत न आणतां सलोख्यानें मेहनत केल्यामुळें तो सर्वांगसुंदर असा झाला. आणि त्यांतल्यात्यांत दरबारचा भव्य मंडप तयार करण्याचे कामीं रा. बी. सी. डुबे ए. इं. रा. मंगलाप्रसाद तिवारी रा. पारगांवकर ना. त. व मे. महिबुब अली म. ओ. या चौघांनीं अविश्रांत मेहनत घेतली व त्यामुळे राज्यारोहण दरबारास फारच बहारीची शोभा आली. येथील राज्यारोहणोत्सव परमेश्वर कृपेनें निर्विघ्नपणें पार पडावा ह्मणून रविवारीं सकाळीं ९ वाजता सर्व धर्माच्या लोकांनीं आपापल्या देवळांमध्यें एकत्र जमून मनोभावानें परमेश्वराची प्रार्थना केली. हिंदु लोकांतर्फे येथील श्रीराम मंदिरांत पुराण होऊन कांहीं स्तुतिपर पदें झाल्यानंतर प्रसाद वाटण्यांत आला. ज्याप्रमाणें हिंदुरिवाजाप्रमाणें कोणत्याही समारंभाचे आरंभीं विघ्ननाशक गणपतीचें आवाहन करून त्याची प्रथम पूजा करतात त्याप्रमाणें या समरंभाचे प्रारंभीं सर्व लोकांकडून मनःपूर्वक परमेश्वर प्रार्थना झाल्यामुळें हा समारंभ निर्विघ्नपणें पार पडला. दुसरा दिवस ह्मणजे सोमवार हा केवळ बालगोपाल मंडळीचे आनंदोत्सवा करितांच राखून ठेविला होता. त्या दिवशीं सकाळीं सूर्योदयाचे पूर्वीपासूनच शाळेंतील मुलांमध्यें किती धांदल उडाली होती व त्यांची समारंभास जाण्याची किती उत्सकता व गडबड होती ही ज्या नागरिकांचे घरीं छोटेखानी विद्यार्थी होते त्यांस चांगलीच कळून आली असेल.

प्रातःकाळीं वर लिहिल्याप्रमाणें विद्यार्थी वर्गाच्या मानासिक स्थितीस नवीन वळण दिलें गेलें व सायंकाळीं शारिरिक खेळांस उत्तेजन दिलें गेलें-धांवणें क्रिकेटचा चेंडू फेकणें, दोर ओढणें वगैरे खेळ होऊन उमेदवार खेळांडूंचें योग्यतेनुरुप त्यास बक्षिसें दिलीं गेलीं त्याचप्रमाणें कुस्त्याही फार प्रेक्षणीय झाल्या व त्यांपैकीं एका कुस्तींत आकोल्याचे उमर नांवाचे पैलवानानें जळंदरचे एका दुपटाचे पैलवानास सपशेल चारीमेंढ चीत करून या शहराची चांगलीच आब राखली. हें सर्व खेळ येथील नवीन तरुण ऑफिसर मि. ग्रीनफील्ड आय. सी. एस. याच्या देखरेखीखालीं झाले असून ते फारच सुव्यवस्थितपणें पार पडले.

मंगळवारीं ह्मणजे तारिख १२ [illegible] तर प्रातःकाळपासून जिकडे तिकडे सडासंमार्जन वगैरे होऊन सर्व शहर फारच उल्हासित दिसत होतें सकाळीं प्रथम २० कैद्यांची मुक्तता केली व बाकीच्यास थोडी फार सूट देण्यांत आली. नंतर मिरवणूक साडेदाहा वाजता येथील टाउनहाल मधून निघावयाची ठरली होती त्याप्रमणें शहरांतील सर्व आमंत्रित बडीबडी मंडळी नेमलेले वेळेचे अगोदरच टाउनहालमध्यें जमून व्यवस्थितपणें आपापल्या सेक्शनमध्यें जाऊन बसली. व मिरवणुकीस बराबर साडेदाहा वाजतां सुरवात झाली. मिरवणुक फारच बहारीची व टोलेजंग असून सरासरी पाव मैल लांबीची होती. मिरवणूक तर फारच उत्तम होती परंतु शहरांतून दोन्ही बाजूंच्या ओसऱ्यांतून, ग्यालऱ्यांतुन, व गच्यावरून असलेल्या असंख्य युवयुवतीच्या मधून जात

असतांना तर ती फारच मनोरम वाटली. बादशहाचे व राणी मेरीचे फोटो पालखींत बसविले होते व येथील लोकप्रिय डे० कमिशनर साहेब पालखीचे मागोमाग घोड्यावर होते. शाळेंतील कांहीं निवडक मुले गार्ड ऑफ आनर्स झाले होते. शिवाय येथील व्हॉलंटीयर्सची निराळी तुकडी होती. ही मिरवणूक पाहून कवी कालिदासानें रघुवंशात केलेल्या मिरवणुकीचे वर्णनांत कांहीं अतिशयोक्ती आहे असें मुळींच वाटत नाहीं. याप्रमाणें सरासरी एक तास मिरणूक चालून साडे अकराचे सुमारास येथील राज्यारोहणानिमित्त उभारलेल्या ज्युबिली पार्क मधील भव्य मंडपांत सर्व मंडळी येऊन पोचली. व बरोबर बारा वाजतां कार्यक्रमास सुरवात झाली. पाहिल्यानें बादशहाचे प्राक्लेमेशन इंग्रजी मराठी व उर्दू भाषेंत वाचून दाखविण्यांत आले व त्या नंतर अकोला जिल्ह्यांतील पुढारी मंडळीस कांहीं सर्टिफिकेट देण्यांत आलीं. व मग हारतुरे पानसुपारी अत्तर गुलाब वगैरे होऊन राष्ट्रगीत ह्मणण्यास सुरवात झाली. प्रथम युरोपियन मंडळींनीं इंग्रजींत ह्मटल्यावर येथील हायस्कुलांतील विद्यार्थी मंडळीनीं सुरवात केली. पद्यें सुप्रसिद्ध आधुनिक मराठी कवी रे. टिळक यांनीं रचिली असून तीं फार सुस्वर आलापांत ह्मटली गेल्यामुळे सर्व सभा सारखी तल्लीन होऊन गेली होती. येथील हायस्कूलच्या मुलांनीं राज्यारोहणोत्सवांतील आपापलीं कामें फारच उत्तम तऱ्हेनें केल्याबद्दल व विशेषतः येथील विद्यार्थी मंडळीचा राजनिष्ठेच्या बाजूला बराच कल वळविल्याबद्दल मे० डेपुटी कमिशनर साहेब यांनीं येथील हायस्कुलचे हेड मास्तर रा० डांगे याचे मनापासून आभार मानले. रा० डांगे यांना हेड मास्तरची जबाबदारीची जागा मिळाल्यापासून त्यांनीं विद्यार्थी वर्गांत उत्तम शिस्त व सभ्य वागणूक याचे चांगलेंच वळण घालून दिलेलें दिसून आलें. या नंतर मुसलमान मुलांनींही सुस्वर पद्यें उर्दू भाषेंत ह्मटलीं व समारंभ आटोपला. हा समारंभ इतका सुव्यवस्थित व निर्विघ्न झाला आणि तो इतका मंगलदायक वाटला कीं राजा हा परमेश्वरी अंश आहे अशी जी हिंदु लोकांची समजूत आहे त्यांत कांहीं तरी तथ्य अहे असें अनुभवास आलें.

[illegible]ाच दिवशीं सायंकाळीं सर्व शहरभर रो[illegible]ाई झाली. सर्व सरकारी इमारती, सार्वजनिक वाडे व मंदिरे त्याचप्रमाणें नागरिकांचीं घरें व शहरांतील रस्ते दिव्यानीं लकलकीत दिसत होते. गांव व पेठ यांस जोडणारा पूल तर जपानी दिव्यांनीं इतका गजबजून गेला होता कीं लांबून तो जणूं पेटलाच आहे असें वाटे. या पुलाचें खालीं दक्षिण बाजूस सायंकाळीं दारूकाम सुरू झालें. या वेळीं शहरांतील सर्व आबाल वृद्ध मंडळी सुद्धां दारूकाम पाहण्यास येऊन सर्व रस्ते गच्च भरले होते. व अशा तऱ्हेचा दिपोत्सव आकोले शहरांत झालेला बहुतेक लोकांस आठवला नाहीं.

बुधवारी रात्रीं येथील लोकप्रिय डेप्युटी कमिशनर साहेब मे. फ्रीडन यांचे बंगल्यावर [illegible] नागरिक लोकांस साहेब बहादुरांनीं राज्यारोहणानिमित्त एक जंगी पार्टी दिली. या मेजवानीस शहरांतील सर्व जातीचे व सर्व धंद्यांचे लोक बोलाविले असून स्वतः साहेब बहादूर प्रत्येकाचे स्वागत करून त्यांचा योग्य समाचार घेत होते. एकंदर मेजवानीचा थाटही फार अप्रतिम असून व्यवस्था फारच उत्तम होती कोणत्याही तऱ्हेचा उच नीच दर्जा न ठेवतां सर्व मंडळी एकमेकांत निरनिराळ्या विषयावर गप्पा मारित होती फराळ वगैरे आटोपल्या नंतर सर्व पाहुण्यांचे मनोरंजनार्थ एका जपानी मनुष्यानें पीप पायावर फिरविण्याची व सायकल तारेवर चालविण्याचीं कामें फार चांगलीं केलीं. पुढें येथील नागरिकातर्फें ब्यारिस्टर होसाळी यांनीं साहेब बहादुरांचे आभार मानले व साहेब बहादुरांनींही सर्व नागरिकांचे समर्पक रीतीनें उलट आभार मानले. या मेजवानीस कित्येक हिंदु स्त्रियाही हजर होत्या.

ज्याप्रमाणें राज्यारोहणोत्सव निर्विघ्नपणें पार पडल्याबद्दल साहेब बहादुरांनीं नागरिकांस मेजवानी दिली त्याचप्रमाणें येथील नागरिकापैकी प्रसिद्ध, दारूचे मक्तेदार मि. बशीरुद्दिन साहेब यांनींही शुक्रवारीं सायंकाळा येथील टाउनहालमध्यें एक जंगी इव्हिनिंग पार्टी दिली. ही पार्टीही फार टोलेजंग व सुव्यवस्थित अशी झाली. या प्रसंगींही मे. डेप्युटी कमिशनर साहेब यानीं प्रत्येकाची मुलाखत घेतली व गाणे, फराळ वगैरे गोष्टींत सर्व मंडळींनी सायंकाळचे दोन तास मजेत घालवून हा समारंभ फारच उत्तम तऱ्हेनें साजरा केला. अशा प्रकारे येथील राज्यारोहणोत्सव फारच सुव्यवस्थित रीतीनें व निर्विघ्नपणें पार पडला याजबद्दल सर्व नागरिक लोक परमेश्वराचे आभार मानीत आहेत.

———:0:-:———

## अभिनंदन.

———:-:0:-;———

### [ आकोलें करांचा धन्यवाद. ]

मेजर फ्रीडन साहेब येथील नागरिकांच्या राज्यारोहणाच्या महोत्सवासंबंधानें इतकें आनंदित व सुप्रसन्न झाले कीं त्यांनीं खालील आशयाचा संदेश येथील नगरशेट रा० रा० रामचंद्र विष्णू महाजनी यांच्या द्वारा पाठविला आहे. ते ह्मणतात कीं:–

आकोल्याच्या नागरिकांचा मी फार आभारी आहे. त्यांनीं सर्व शहर फार नामी शृंगारलें होतें, सर्वच लोकसमूह मिरवणूकच्या रस्त्यावर व सभामंडपांत इतक्या उत्कृष्टपणें वागला कीं या पेक्षां दुसरा चांगला जनसमूह माझ्या पाहण्यांत आलेला नाहीं. सर्वांच्या वर्तनांत भारदस्तपणा स्पष्ट दिसून पडत होता. या जिल्ह्याच्या सदरच्या ठिकाणीं दरबारचा अठवडांच असा सुंदर गेला आणि येथील लोकांमधील वीरश्री व राजभक्ति व त्यांची राजमान्य वागणूक ही पाहिली ह्मणजे अशा जिल्ह्याचे डिपुटी कमिशनर असल्याबद्दल मला मोठाच अभिमान वाटतो.

——— : 0 : ———

## बहुमान.

आमच्या वऱ्हाड प्रांतांतील सरकारी व बिन सरकारी ज्या थोर गृहस्थांचा गौरव राज्याभिषेकाच्या सुमुहूर्तावर करण्यांत आला त्यांची नामावळी लोकांपढें मांडतांना आह्मास मोठा आनंद वाटतो.—

नाइट कमांडर आफ दी स्टार अफ इंडिया ( के. सी. एस. आय.)

हेजिनाल्ड हेनरी क्रॉडॉक चीफ कमिशनर सी. एस. आय.

फ्रांक जार्ज स्लाय कमिशनर, वऱ्हाड

कम्पानियन आफ दी इंडियन एम्पायर सी. आय. इ. )

नबाब महमद सलामुल्ला खान बहादूर, जहागिरदार, देऊळघाट बुलढाणा.

### खानबहादूर.

माणिकशा रतनजी दस्तूर डिस्ट्रीक्ट जज भंडारा.

महमद सरदर, डिपुटी सुपरिनटेंडंट यवतमाळ.

### खानसाहेब.

मिरझा आबासबेग, खतीब नायक काजी आकोला.

### रावबहादूर.

विठ्ठल पुरुषोत्तम पुराणिक, आनररी माजिस्ट्रेट, वणी.

### रायसाहेब

शेट गणेशदास साहू उमरावती.

### रावसाहेब.

पंडित शंकर बळवंत चिटणीस बी. एल. सबजज्ज, उमरावती.

पंडित बळवंत रामचंद्र अंगळ आडव्होकेट, पब्लिक प्रासिक्युटर, उमरावती.

### पोलीस पदक.

ईश्वरदीन कान्स्टेबल आकोला.

मध्यप्रांतातर्फें व्हाइसरायचे कायदे कौंसिलदार नामदार गंगाधर महादेव चिटणवीस व नामदार एम. बी. दादाभाई यांस अनुक्रमें के. सी. आय. इ. व सी. आय. इ हे किताब देण्यांत आले.

## नोटीस

गणपत गंगाराम ब्राह्मण राहणार असलगांव ता० जळगांव जि० बुलडाणा यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मुलचंद गंगाराम या नांवाची दुकानें जामोद, जळगांव, खेंडबु, लांडनपूर, व सोनाळ, या गांवीं आहेत. सदर्हू दुकानचा कारभार तुह्मी मुखत्यार या नात्यानें मी गार्डीयन लागेपर्यंत करीत होता. मी गार्डीयन लागल्यावरही तुमचा पगार वाढवून पूर्वीचेच कामावर तुह्मास ठेविलें परंतु तेव्हापासून तुह्मी दुकांनीं मुळींच राहत नाहीं. मे० डि० जज साहेब बहादूर अकोलें यांनीं मागितलेली आह्मांचो इस्टेटीची यादी तुह्मास तयार करण्यास सांगितलें असतां तीही तुह्मी तयार केली नाहींत. त्यामुळें मजला आणखी मुदत घ्यावी लागली. तुह्मास मी पूर्वीच नोकरी वरून कमी करीत होतो परंतु तुह्मी फार विनवणी केल्यामुळें तुह्मास नोकरीवर ठेविलें व तुमचे नांवचें जनरल मुखत्यार पत्रही केलें तरी तुमचें वर्तन आहे तसेंच आहे. तरी ज्या दिवसां पासून तुह्मी दुकानावर गैरहजर आहांत त्या दिवसांपासून तुह्मास नोकरीवरून कमी केलें आहे व तुमचें मुखत्यारपत्रही रद्द केलें आहे ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत तुह्मी जामोद येथें दुकानावर येऊन तुमचे हातचा जो कांहीं व्यवहार आहे तो आह्मांस किंवा आह्मी तेथें नसल्यास आमचे मुखत्यारास समजाऊन द्यावा व तुमचे नांवे जी बाकी निघत आहे तीही देऊन टाकावी. तसें न केल्यास रीतीप्रमाणें तजवीज करावी लागेल कळावें.

ता० १८।१२।११ इ०

सही

बनसीलाल निंबाजी द० खु०

नो. नं ६४२ गार्डीयन.

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं माझी भावजय नामे हयातबी मर्द शेख अहमद ही माझे मालकीचे घर ( वडिलार्जित ) लबाड लोकाच्या नादी लागून विकणार आहेसे दिसते सबब या जाहिरातीनें सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं माझे वडिलार्जीत घर नंबर २३२ कोणी माझ्या भावजयी पासून कोणत्याही तऱ्हेनें लिहून घेऊं नये घेतल्यास त्याबद्दलची जोखीम मजवर अगर माझ्या इस्टेटीवर नाहीं तर त्याची जबाबदारी व्यवहार करणाऱ्याचे जातीवर राहील कोणी फसूं नये सबब अगाऊ सूचना देत आहों कळावें ता० १२-१२-११ इ.

सही

शेख उस्मान वा। शेख सुभान

खलाशी राहणार आकोला

नि० खु० हातची रेघ

ना. नं. ६४३

## नोटीस.

नोटीस बेशमी रामभाऊ अमृतराव पाटील राहणार पळसी बु॥ ता० खामगांव

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी ता० १७-११-११ त्या रोजीं वऱ्हाडसमाचार छापखाना आकोला यातून जाहिर नोटीस दिली ती अगदीं खोटी दिली आहे. कारण मजजवळ जी जमीन आहे ती सर्व गांवकरी लोकांस माहीत आहे व ती जमीन आज १५-१६ वर्षें झालीं ही जमीन हिस्से वाटे होऊन माझे वाटणीस आली आहे तेव्हांपासून माझे हीस्याची जमीन माझे ताब्यांत आहे व त्यापैकीं कांहीं जमीन मी सावकाराचे कर्जाचे फेडींतही पट्ट्यानीं लावली होती तरी याप्रमाणें खोटी नोटीस देऊन माझे विषयीं लोकाचें मन कलुषीत करूं नये. पुन्हां अशी खोटी नोटीस दिल्यास रीतीप्रमाणें कोर्ट मार्फत योग्य तजवीज केली जाईल कळावें ता० १४-१२-११ इ.

सही

तोताराम राणोजी पाटील रा०

पळशी बुजरुख ता० खामगांव

नो. नं. ६४४

सुधासिन्धु सुधासिन्धु

सुख संचारक कंपनी मथुरा यांची तयार केलेलीं व सरकारांतून रजिस्टर झालेलीं औषधें, जीं वीस वर्षापासून लोकांत अनुभविलीं आहेत.

सुधासिन्धु

हें कफ, खोकला, दमा, थंडीचा ताप, पटकी, शूळ, संग्रहणी, अतिसार, पोटांत दुखणें, वांत्या, मळमळणें, हात पाय व कंबर दुखणें, मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, डांग्या खोकला, दूध ओकून टाकणें इत्यादींवर स्वादिष्ट व सुवासिक औषध आहे. किंमत प्रत्येक बाटलीस ०८ आणे.

दद्रुगज केसरी

गजकरणास समूळ नाहींसें करणारें हेंच फक्त एक पवित्र औषध आहे. कांहीं सुद्धां जळण अथवा आग होत नाहीं. यासच जर दारू अथवा लिंबाचे अर्कांत मिळविलें तर २ बाटल्या अर्क तयार होतो. किंमत प्रत्येक बाटलीस ०४ आणे १२ बाटल्या एकदम मागविल्यानें त्यांस एजंट समजून नोटिशी, हँडबिलें वगैरे फुकट पाठविलें जातात, व कमिशनही दिलें जातें. चालू सालचें पंचांगही फुकट मिळतें

मागविण्याचा पत्ताः—
पंडित क्षेत्रपाल शर्मामालक,
१९९ संचारक कंपनी, मथुरा

## विलक्षण नयन रुक्कुठार.

**विलक्षण नयन रुक्कुठार** – ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार– **खुपऱ्या**, लाली, **ठणका, पाणी गळणें, कंडू, भूरीं, फुल** इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणांनीं डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालण्या करितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ०६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालोपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल विशेष माहिती खालील पत्यावर,

जि एन. घारपुरे. पोष्ट- अलिबाग

## विहार आनन्दका सागर रंगीन तसवीरे सहित चारो भाग तथा पांचो अंग सचित्र कोख शास्त्र.

अमली हमसे मंगावो धोकेसे बचो स्त्री पुरुषोंके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पातिव्रता, व्यभिचारणी आदिको 'पहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार मय सहवास स्थान क्रया, शैय्यातिथ, कामस्थान सालासगरि, वतीसोआमूशण, वस्त्रतअर्दिवमधान पुत्रस्टीकर्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोंकी चिकित्सा औषधि, पशु भाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण सुद्धां विद्या आदि अमुल्य विषयका भेडार किंमत रु०

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडा

नो० नं० ७७ अलीगड

## जाहिरात

**व**र्षफल—प्रत्येक महिन्याचें फलासह लाभालाभ सुखदुःख कळवूं. फी. ३ रुपये वर्ग २ चे २ रुपये. खर्च ०= जन्मकाल, जन्म अथवा चालू नांव कळवावें.

**पत्ता—** भा० गो० पंडित,
रा० व पो० एरणखेड जि ०प. खानदेश

## जाहिर नोटीस.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं आकोले येथील जठार पेठेंतील माझा मयत भ्रतार सीतारामपंत मुजूमदार वकील यांनीं प्लॉट नंबर २० माधवराव मराठे वकील यांचे उत्तर बाजुचा घेऊन त्यावर माधवराव मराठे व माझा भ्रतार सीतारामपंत मुजुमदार यांनीं विहीर बांधलेली आहे व बंगल्याकरितां प्लीन्थ अगर जोतें बांधून तयार आहे. सदर्हु प्लॉट जोतें व अर्धी विहीर सुद्धां, तसेंच ताकोडे ता० आकोले येथील शेतें

| सर्वे नंबर | एकर गुठें | आकार |
|---|---|---|
| ३८ | १०८३९ | १६ रु० सालीम |
| ३९ | २०८७ | ३९ रु० सालीम |

अशी मिळकत आह्मास विकणें आहे तरी ती सालीम अगर स्वतंत्र रीतीनें विकत घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं आठ दिवसांचे आत येऊन मला कळवावें ह्मणजे पुढील व्यवस्था करण्यांत येईल. कळावें

ता० १९-१२-११ इ. सही

सरस्वतीबाई मयत भ्रतार सीतारामपंत मुजुमदार वकील हिचे
नो. नं. ९४९ हातची बांगडी असे

ठिक ठिकाणी एजंटस् पाहिजेत.

# सन लाइफ अशुअरन्स कंपनी ऑफ कानडा

[१८६९]

इंग्लिश सरकारची सक्त देखरेख सरकारी हुकुमाशिवाय भांडवल गुंतवता येत नाहीं.

**भांडवल तेरा कोटी रुपये.**

पॉलिसीचे नमूने फारच सुधारलेले आहेत.

पालिसी .... .... .... .... .... .... बिन अटीच्या.
पॉलिसी .... .... .... .. .... .... बिन तक्रारी.
पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन बुडणारी.

हिंदुस्थानचे मुख्य ऑफिस, हार्नबी रोड मुंबई. } रा. श्री मुधोळकर मध्यप्रांताच वऱ्हाडचे जनरल एजंट अकोला ' प्रांत वऱ्हाड

## Oriental Govrnment security LIFE ASSURANCE COMPANY Limited

Established in 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

**FUNDS Exceed 4 crores**

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act in treating the clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Se[illegible] and lodged with the Government Official Trustee of Bombay i[illegible] the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through [illegible] of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employir portion of their annual income or profits in effecting life policies, at onc create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live. and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner a man make up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For term please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Registered No. S.N4

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

४५ ] आकोला—सोमवार तारीख २५ माहे दिसेंबर सन १९११ ई० [ अंक ४९

## वर्गणीचें दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुप याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पाच हजार.वरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ } एजंट
नं १

## मुंबइ बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती कारितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६$\frac{३}{४}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } G. A. PHILLIPS.
आकोला २१-९-१० } एजंट
नो० नं० २

## चांदीचीं भांडीं.

### खरें सचोटीचें दुकान.

आमचें दुकानीं शुद्ध चिनई चांदीचीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं विक्रीस तयार असतात. माल काळजीपूर्वक

वक्तशीर व्ही. पी. नें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल जोखिमदार राहूं. एकवार अनुभव ध्यावा.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन.
३३१ आदितवारपेठ, नासिक

श्री राधावल्लभाजयाति

## वर्षफल।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि, जीवन, मरण, रोग, सन्तान तरक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल व्ही० पी० द्वारा २। रुपये में भेज देंगे. हमारे यहां जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते हैं अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मंगा लीजीये.

मिलने का पताः—
गोस्वामी राधामोहन शर्म्मा
चित्तीखाना आगरा.

### जाहिर नोटीस.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं मुक्काम आकोला, प्रांत वऱ्हाड, येथें आमचे वडील कै० कृष्णाजी दिनकर, एंजिनियर, यांनीं संपादन केलेलें व हल्लीं आमच्या मालकीचें घर, इमला व खुली जागा यासुद्धां, विकावयाचें आहे. हें घर आकोला येथें गांवांत जुम्मामशीदी नजीक आहे सदरील घराचे तीन चार सोयीवार पृथक् भाग होण्या सारखे आहेत. या पैकीं एक अगर अधिक भाग अथवा संबंध वाडा विकत घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणार यांजकडे खालीं दिलेल्या पत्त्यावर किंवा रा० रा० नारायण खंडेराव फडके वकील, मुक्काम आकोला, यांजकडे किंवा रा० रा० लक्ष्मण जयराम हातवळणे आगरवेशी जवळ मुकुंद बाळकृष्ण यांचा वाडा, मुक्काम आकोला, यांजकडे समक्ष अगर पत्रद्वारें कळवावें, ह्मणजे किंमती वगैरे बद्दल खुलासा केला जाईल. व लागेल ती इतर माहिती देण्यांत येईल.

सही
काळू कृष्ण सहस्त्रबुद्ध मुक्काम पुणें,
पेठ नारायण, घर नंबर ३४८
तारीख १७ माहे डिसेंबर सन १९११
नो० नं० ५४६

### जाहिर नोटीस

सर्वत्र साहू सावकार व अमाम्या लोकांना या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं लक्ष्मीनारायण उत्तमचंद दु० पातुडों यानांवाचे दुकानचा मी मालक असून तारीख ५-१२-११ रोजीं मी आपले दुकानची व्यवस्था करण्याकरितां १ हरलाल धनामल २ गोपुलाल मुखलाल व देविदास नारायणदास या त्रिवर्गांना एक लेख करून देऊन त्यांना व्यवस्थापक नेमिले. परंतु मागाहून तो लेख मला पसत न पडल्यामुळें लेख नोटिशीनें रद्द करून त्यांना व्यवस्थापकावरून दूर करून दुकान मी आपले ताब्यांत घेतले आहे. या आता लोकांचा दुकानाशीं कांहींएक संबंध नाहीं. कोणीही इसमांनीं माझे दुकानचे नांवानीं वरील इसमापैकीं कोणाशीं देखील कोणताच व्यवहार करूं नये. मला विचारल्याशिवाय व्यवहार झाल्यास तो व्यवहार मजला कबूल न होतां त्याबद्दल मी किंवा माझी इस्टेट मुळींच [illegible]

लक्ष्मीनारायण उत्तमचंद अगरवाल
दस्तूर खुद्द.
नो० नं० ५४७

### नोटीस

रा० रा० वामनराव सदाशिव सोनार राहणार गाडेगांव ता० आकोट

यांस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मजला मारोती चिमणाजी कृष्णपक्षी यांनीं तारीख १३-११-११ इ. रोजीं नोटीस दिली आहे त्यांत त्यांनीं मजला गाडेगांव येथील शेतें सर्वे नंबर ३८ पैकीं व ५४ पैकीं अशीं रुपये १२०० मध्यें खरेदी, तारीख १४-१-११ रोजीं दिली आहेत सदहु शेतावर तुमचे रुपये ३७५ चा व्याजासह गहाणाचा बोजा आहे असें त्यांनीं नोटिशींत लिहिले आहे. ही गोष्ट आजपर्यंत मला माहित नव्हती हल्लीं त्यांची नोटीस आल्यावरून समजते तरी तुह्मांस या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुमचे जवळ सदहू शेताबद्दल मारुती चिमणाजी यांनीं लिहुन दिलेलें गहाणखत तें मजला ८ दिवसाचे आंत दाखवावें व त्या गहाणखताचे मुद्दल रुपये व त्याचें योग्यव्याज असें घेऊन सदहू गहाणखताबद्दल मजला पावती द्यावी. किंवा तुह्मी सांगाल त्या ठिकाणी रुपये घेऊन येतो तरी नक्की रकम कळवावी व आपले रुपये तावडतोब घ्यावेत. तसें न कराल तर या पुढें होणारे व्याजाबद्दल व कोणतेही प्रकारच्या तुमच्या कोर्ट खर्चाबद्दल वगैरे मी जबाबदार नाहीं कळावे तारिख २०-११-११ इ.

साक्ष सही ( मारवाडींत )
हरीबक्स रामप्रताप मारवाडी
राहणार गाडेगांव पोष्ट तेल्हारे
नो० नंबर ५४८

### जाहिर नोटीस

सर्वत्र शेट सावकार व इतर लोक

यांसः—

व पुताबाई मर्द टिकाराम उन्हाळे पाटील राहणार टाकळीविरो ता. खामगांव जि० बुलडाणें हिसः—

मी खालीं सही करणार याजकडून या जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं पुताबाई मर्द टिकाराम पाटील ही माझी सख्खी भावजय आहे. माझा भाऊ व पुताबाईचा मरण्यास आज सुमारें ५।६ वर्षे झालीं त्यांची वडिलोपार्जीत जो इस्टेट आहे ती आपण लोकांस पट्ट्यानें देऊन [illegible]

किंवा पट्ट्यानें देऊं नये व कर्जही काढूं नये. काढलें असल्यास व दिलें असल्यास तें सर्व बातल असे आणि जो पर्यंत तुह्मी आमचे कुळांत आहात तोपर्यंत आह्मी तुह्माला अन्नवस्त्र देण्यास तयार आहो आणि ही नोटीस पावल्यापासून आंठ दिवसांचे आत आमची वडिलोपार्जीत जमीन आमचे ताब्यांत द्यावी आणि आमचे जवळून दरसालचे दरसाल अन्नवस्त्र घेत जा या उपर आपण न दिल्यास कोर्ट मार्फ जमीन आमचे ताब्यांत घेऊन तुह्माला व वस्त्र देऊं कळावें ता० १९।१२।११

सही
रावजी अमरसींग पाटील राहणार
टाकळीविरो जि० [illegible]
नो. नं. ५४९

### नोटीस.

नोटीस म्युनुसिपल कालनी नी बाळापूर प्रेस यांसः—

खालीं सही करणार नोटीस देतों कीं तमचे कडे संमत १९६३ साला न संमत १९६७ चे वर्षपावेचे भाव प्रत्येक गाडीस ८-॥ आणे प्रमाणेंने कांहीं रुपये जमा झालें असतील ते हीशोब करून आठ दीवसाचें आंत ते येथें आणून द्यावें तसें न कराल तर रीतीप्र काम करण्यांत येईल कळावें ता० १२-११ ई०

सही
मखलाल बनशीलालजी दस्तुर
नो० नं० ५५०

## नोटीस

रा० रा० मारुती चौमगाजी कृष्णपक्षी राहणार गाडेगांव तालुके आकोट

यास—

खालीं सही करणार यांजकडून नोटी-शीचें उत्तर देण्यांत येतें कीं तारिख १३-११-११ ची तुमची नोटीस पावली तुह्मी नोटीशींत लिहीलेला मजकूर सर्व खोटा आहे. तुह्मी मजला मौजे गदी गाडेगांव ता० आकोट येथील शेत स० नंबर ३८ पैकीं व स० नंबर ५४ पैकीं अशी २ दोन शेतें १२०० रुपयांस तारिख १४-१-११ इ रोजीं खरेदी दिलीं खरेदीखत लिहुन देऊन नोंदुन दिलें. याबद्दलचा सर्व भरणा मी खरेदीखतांत लिहिल्याप्रमाणें तुह्मांस आगाऊ रुपये ९०० व सबरजीष्ट्रर साहेब यांचे समक्ष रुपये ३०० असे रुपये १२०० दिले आहेत भरण्यापैकीं तुमचे मजला कांहीं देणें राहिलें नाहीं व तुह्मी नोटिशींत लिहीतां कीं सदर्हु शेतावर वामन सदाशीव सोनार राहणार गाडेगांव यांचा रुपये ३७५ चा व्याजासह गहाणाचा बोजा आहे तो तुह्मी देण्याचे कबुल केलें होते तें सर्व खोटे आहे. ज्यावेळीं तुह्मी मजला शेतें खरेदी दिलीं व शेताचें खरेदीखत करून दिलें त्यावेळीं वामनराव सोनार याचे गहाणख-ताबद्दल मुळींच सांगीतलें नाहीं. जर खरे-दीचें बोलणें झालें त्यावेळीं अगर खरेदी-खताचे वेळीं तुह्मी मजला वामन सोनार यांचे गहाणखताबद्दल सांगीतलें असतें तर मी तुह्मांस अगाऊ रोख रुपये ९०० दिले नसते कारण त्या रुपयांतून वामनराव सोनार याचे गहाणाबद्दल रुपये देऊन गहाणखत सोडुन घेतलें असतें व बाकीची बचत राहिली असती ती तुह्मास दिली असती परंतु मजला वामनराव सोनार याचे गहा-णाची गोष्ट न कळवितां मजला फसवुन मेजनवळून आगाऊ भरणा रुपये ९०० घेतला अशाबद्दल मजला तुमचेवर दगल-बाजी केल्याबद्दल उलट फीर्याद करावी लागेल व मजला सदर्हू वामनराव सोनार याचे गहाणाबद्दल जी रकम द्यावी लागेल ती तुह्मास व्याजासह पुणे भरून द्यावी लागेल कळावें तारीख २०-१२-११ इ. मुक्काम आकोला

सही

हरीबकस रामप्रताप मारवाडी

नो. नं. ५५१

## जाहिर नोटीस

सर्वत्र साहुसावकार व इतर लोक यांस—

खालीं सही करणार इजकडून या जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं मौजे सावरखेड ता० बाळापूर येथील शेत सर्वे नंबर ५१ चें शेत व तसेंच मौजे पातूर सेखबाबू ता० बाळापूर येथील घर धाब्याचें हीं माझें पूर्ण मालकीची असून तीं माझी सासू जनाबाई जवजे भगवंतराव काळे ही तिला कोणतेही प्र-कारचा हक्क नसतां, खरेदी, गहाण, पट्ट्यानें वगैरे देऊं पहात आहे तरी कोणीहि तिजपासून गहाण, खरेदी, पट्ट्यानें वगैरे घेऊं नये. व तिला कर्ज देऊं नये व कर्ज दिल्यास घेतल्यास माझी जिनगी त्या कर्जास जबाबदार होणार नाहीं. ही जाहिर नोटीस दिली. कळावें. १३।१२।१९.

सही

गोदुबाई जवजे नारायणराव काळे
रा० पळसी बुा ता० खामगांव
नि० तुळशीची माळ

नो० नं० ५५२

## जाहिर नोटीस.

मी खालीं सही करणार अशी नोटीस देतो कीं राधाबाई मर्द सखाराम व बनाबाई मर्द सखाराम थोरात रा० चिखलगांव ह्या उभयत माझ्या सुना असून ह्या व मी एकत्र आहों. आमची मौजे चिखलगांव ता० आकोला येथील स्थावर इस्टेट वडी-लोपार्जित आहे. शेत सर्वे नंबर २१९ पैकीं
२२०
२२१
२०२
२३१ पैकीं
हे नंबर कोणी या उभयतां जवळून गहाण-अगर खरेदी अगर पट्ट्यानें घेऊं नयेत गहाण खरेदी घेतल्यास त्याचा बोजा कायम राहणार नाहीं. व यांना कोणी कर्ज वगैरे देऊं नये. सदर्हू कर्ज अगर खरेदी गहाण दिल्यास आह्मी जबाबदार नाहीं. व वर लिहिलेली इस्टेट जबाबदार नाहीं, कळावे. ता० १७।१२।११
लिहिणार रामचंद्र जानकीराम शेगांवकर.

सही

सिताराम लक्ष्मण थोरात पाटील
निशाणी हातची रेघ.

नो० नं० ५५३

## जाहिर नोटीस

सर्वत्र आसामी लोकांस कळविण्यांत येते कीं रतनलाल दयालाल छतरपुरी ता. २६-१०-११ इ० रोजीं मरण पावले. आतां त्या स्थानी मालकी मयताची स्त्री प्यारीबाई जवजे रतनलाल छतरपुरी इची आहे. दयालाल मोहनलाल अ० पा० मोहनलाल नंदकीसोर छतरपुरी या नांवाचें दस्त-ऐवज माझ्या दुकानांतून झालें असें सम-जतें आसामी लोकांस कळविण्यांत येते कीं वरील नांवाचें स्टँप व रतनलाल दयालाल या नांवाचें स्टँप व जो रक्कम देण्याकरिता येईल त्या आसामीनीं मोहन-लाल यांस देऊं नये दयालाल मोहनलाल अ० पा मोहनलाल नंदकिसोर या नांवाचें स्टँप झाले आहेत. नोटीस पावल्यापासून त्या दस्तऐवजाचे निकाल होईपर्यंत व्याज घेतलें जाणार नाहीं. प्यारीबाई जवजे रत-नलाल या नांवाचे वर्ग झाले आहे. व शेत वाहणारे लोकांना कळविण्यांत येते कीं एकंदर शेताची मालकी माझी आहे आतां त्या आसामीनीं शेताचा सारा मज-जवळ किंवा माझ्या तर्फे कलमुखत्यार रामचरण कल्याणदास छतरपुरी यास वसूल देऊन पावती घेण्याची व शेत लावण्याची व शेताचा वायदा घेण्याचा अधिकार त्यास दिला आहे नोटीस पावल्यापासून जो स्टँप मोहनलालजवळून कमी रकम देऊन घेतील तर वहिवाटीचे हिशोबानीं ती नोटिशीचे तारखेपासून रक्कम मजला घेतली जाईल. कळावें ता० १२-१२-११

सही

प्यारीबाई जवजे रतनलाल छतरपुरी
इचे हातची बांगडी असे

नो० नं० ५५४

# वर्तमानसार.

### कापसाची लागवड

शेतकी खात्याकडून यासंबंधानें शक्य ते प्रयत्न होत आहेत. परंतु चांगल्या जा-तीचा व लांब धाग्याचा कापूस जो पिकतो, त्याला बाजारांत चांगलीशी मागणी नाही व त्याला किंमतही यावी तशी येत नाहीं; आणि यामुळें शेतकरी लोकांचे लक्ष लांब धाग्याचा कापूस पिकविण्याकडे लागत नाहीं असें मि० कॉव्हेन्ट्री यांचें ह्मणणें आहे. चांगल्या जातीचा व लांब धाग्याचा कापूस जर आपण तयार केला तर त्याचा तावडतोब उठाव होईल आणि बा-जारांत त्याला भावही बरा येईल अशी शेत-कऱ्यांना खात्री व अनुभव आल्यावांचून शेतकरी लोक या कामीं मन घालणार नाहींत व असें करण्यास त्यांना सल्ला देणेंहा शेतकी खात्याला कठीण जाईल हें उघड आहे.

मि. एम. एच. देहदाष्टी यांना शिराज हून पुढील तार आली आहे:—"राशियन व ब्रिटीश सैनिकांची गर्दी झाल्याकारणानें, उलामांच्या हुकुमावरून आह्मी त्यांच्या (ब्रिटिश व राशियन लोकांच्या) मालास बहिष्कार घालीत आहों. तेव्हां यापुढें माल पाठवूं नका. इतर व्यापारी मंडळीस सदर्हूप्रमाणें कळवावें."

श्री. महाराज गायकवाड यांचें नांव लंडन येथील एका घटस्फोटाच्या खटल्यात जोडीदार प्रतिवादी या नात्यानें रुजू कर-ण्यांत आल्याची खबर रूटरनें प्रसिद्ध केली आहे. ही खबर अशी आहे कीं स्टेथम नावाच्या एका इसमानें आपल्या स्त्रीवर घटस्फोटाची फिर्याद मांडली आहे, व त्या स्त्रीच्या जोडीस जोडीदार प्रतिवादी या नात्यानें श्री. महाराज गायकवाड याचे नांव दाखल करण्यांत यावें अशी मागणी केला आहे. श्री. महाराजांवर समन्स का-ढण्याबद्दल कोर्टाकडे अर्ज करण्यांत आला होता. पण श्री. महाराज गायकवाड हे एक राज्यकर्ते असल्यानें त्यांजवर समन्स काढतां येत नाहीं असें श्री. गायकवाड सरकारच्या कायदेपंडितांकडून प्रतिपादण्यांत आलें. खटला जास्टिस बारग्रेव्ह डीन यांजपुढें निघाला आहे, पण समन्स काढतां येतो कीं नाहीं याबद्दलचा निर्णय देणें तहकूब ठेवण्यांत आले आहे. हा निकाल श्री. गायकवाड याच्याविरुद्ध झाला, तरीही खटला पुढें चालविण्याची श्री. गायकवाड महाराज यांच्या सालिसिटरांची इच्छा आहे. कारण त्यांच्यापाशीं असा सबळ पुरावा आहे कीं फिर्यादानें श्री. महाराजांपासून ३० हजार पौंड (साडेचार लाख रुपये) जबरीनें काढण्याकरितांच ही युक्ति योजि-ली आहे. श्री महाराज आपल्या कायदे-पंडितांच्या सल्लाप्रमाणें चालणार आहेत.

कोल्हापूर येथील प्रख्यात डाक्टर रा. रघुनाथराव खेडकर हे बर्लिन युनिव्हर्सि-टीची एम्. डी ची परिक्षा पास झाले.

सामाजिक परिषद—राष्ट्रीय सभेबरोबर कलकत्ता येथें भरणाऱ्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेसाठीं येथील आर्यन सोशल युनियन या संस्थेनें ना. सर एन. जी. चंदावर-कर. मि. हरि सिताराम दीक्षित, डॉ. टांडेकर, मेसर्स नानालाल परभुराय व रणछोडलाल भोगीलाल वगैरे गृहस्थांस प्रातिनिधि निवडलें आहे.

ता. १६ रोजीं कलकत्ता येथें जंगी सभा भरली त्या सभेंत बाबू बिपिनचंद्रपाल यांचें भाषण झालें. ते ह्मणाले आता परिस्थिती बदलली असल्यामुळें राष्ट्रीयपक्षानें सरकारशीं फटकून राहण्याचें धोरण आतां सपशेल सोडून द्यावें. लॉर्ड हार्डिंज यांचे आभार मानून मि. पाल ह्मणाले कीं, गेलीं सात वर्षें जो राज्यव्यवस्थाविषयक अधिकार संपादन करण्याची राष्ट्रीय पक्षाची खटपट होती तो अधिकार व्हाइसरॉय साहेबांनीं त्याला दिला आहे. यापुढें कार्य-कारी कौन्सिलावर स्थानिक कौन्सिलाची हुकमत रहाणार आहे हा राजेसाहेबांनीं आपल्याला खरोखरच मॅग्नाचार्टा दिला त्या-बद्दल बादशहांचें सर्वांनीं कृतज्ञतापूर्वक अभि-नंदन केलें पाहिजे असे बाबू बिपिनचंद्रपाल ह्मणाले.

### श्री गुलाबराव महाराज.

हे प्रख्यात साधु सांप्रत वऱ्हाडांत देऊर-वाडा, तालुका एलिचपूर, वऱ्हाड येथें असून तेथें त्यांचे कात्यायनीचें व्रत चालू आहे. ह्या व्रताची सांगता पौष शुद्ध ५ सोमवारीं ता० २५।१२।११ रोजीं होणार असून त्या दिवशीं भक्तभावीकांस महाराज मोठ्या आन-दानें बोलावीत आहेत. महाराजांचे वैराग्य भक्ति व ज्ञान अगाध असून ज्याला ज्याला आवड व सवड असेल त्यानें त्यानें सदर प्रसंगाकरितां अवश्य जाऊन सत्संगाचा—सोहळा भोगावा. देऊरवाडा हें पोस्टाचें ठिकाण असून उमरावतीहून १९ कोसांवर आहे. व चांदूर बाजाराहून ६ कोस आहे. महाराज पत्रांत प्रेमानें लिहितातः—

श्रीकृष्णो रमणो भवेदिति धिया
कात्यायनीस्त्वर्चनम्
आरब्धं बलहीनयापि हि मया
स्वंद्धाक्षरांगोत्थया।
अत्रागत्य महाराज भगवतः पाद-
प्रसादोत्सवाः
गोविंदोस्तु पतिस्तवेति वचनः—
स्तुन्वन्तु नो मंगलम् ॥ १ ॥

जाव्हा, लुसिआना, बार्बेडोज येथें उंसाची लागवड करण्यांत आणि साखर तयार करण्याच्या कामांत आधुनिक शास्त्रीय माहितीचा व ज्ञानाचा पूर्ण फायदा घेण्यांत येतो हें प्रसिद्धच आहे. हिंदुस्थानांतील ऊंस फार हलक्या जातीचा असून त्याचें उत्पन्नही फार कमी येतें. जाव्हा, मॉरिशस वगैरे प्रांतांत प्रत्येक एकरामागें सरासरी ३० ४० टन ऊंस तयार होतो आणि तो ऊंसही उत्तम जातीचा असतो. परंतु हिंदुस्थानांत याच्या अगदीं उलट स्थिती आहे. इकडील उंसाच्या मळ्यांत दर एकरामागें १५ टन ऊंस उत्पन्न होत नाहीं व त्याची जातही हलकी असल्यामुळें रसही कमी उतरतो. आतां साखर तयार करण्याच्या कारखान्याकडे व पद्धतीकडे लक्ष दिलें असतां त्या बाजूनेंही आह्मी फार मागसलों आहों असें दिसून येतें. आमचे रस काढण्याचे चरक ओबडधोबड असल्यामुळें बराचसा रस वांया जातो आणि रस आटवितांनाहीं आमच्या चुकीच्या पद्धतीमुळें पुष्कळसें नुकसान होतें आणि साखर स्वच्छ करतांनाही अशाच प्रकारची तूट येते. या सर्व गोष्टींत परदेशीय धंदेवाले फार पुढें गेले आहेत आणि ह्मणून त्यांची भरभराट होत आहे. तेव्हां इकडील साखरेच्या धंद्यास व ऊंसाच्या लागवडीस शास्त्रीय व यांत्रिक शोधाची आणि ज्ञानाची पूर्ण मदत मिळेल अशी जर सरकारनें कांहीं सोय केली तर तीमुळें आमच्या साखरेच्या धंद्यास चांगली मदत मिळेल असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

बांदीकुईचे ट्राफिक सुपरिंटेंडेंट यांनीं अशी तार पाठविली आहे की, फुलेराहून बांदीकुईकडे जाणारी एक स्पेशल माल गाडी सागानेर स्टेशनावर डेड एंडवर जाऊन आदळली. त्यामुळें एंजिन व चार डबे एकावर एक जाऊन पडले व तीन डबे रुळावरून घसरले. या अपघातांत एका फायरमनास इजा झाली व एक खलाशी ठार झाला. टपाल व उतारू यांस एका गाडींतून उतरून दुसऱ्या गाडींत नेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. बुधवारीं दुपारीं दोन वाजतां रस्ता मोकळा होईल असा अदमास दिसतो.

बंगालची विभागणी रद्द झाल्याची बातमी बाबू अंबिकाचरण मुजूमदार व बाबू आनंदचंद्रराय यास समजतांच 'आतां मला सुखानें मरण येईल असें उभयतां प्रख्यात गृहस्थांनीं उद्गार काढले असें ह्मणतात.

काल रोजीं ( ता. १९ ) त्रिनिदादहून सुमारें ५०० हिंदी लोक परत आले. यांनीं आपल्याबरोबर एकंदर १ लाख सात हजार रुपये आणले आहेत. सर्वांत मोठ्या अशा व्यक्तिविषयक रकमा पुढील प्रमाणें आहेत:-- एका इसमाजवळ ९८०० रुपये आहेत; दुसऱ्या जवळ ९१०० रुपये आहेत; तिसऱ्या जवळ ४२०० रुपये आहेत व चवथ्या जवळ ४००० रुपये आहेत.

---

# वऱ्हाडसमाचार

पौष वद्य ९ शके १८३२ दुंदुभिनाम संवत्सरे

## रहस्य

दिल्लीचा तो मंगल राज्याभिषेक पाहून आलेली मंडळी जे आनंदाचे उद्गार काढतात आणि श्रीमंत चक्रवर्ती जार्ज साहेब व त्यांच्या सौभाग्यवती मेरी साहेब यांच्या प्रेमळ भावाविषयीं जे प्रमाचे उद्गार काढतात ते खरोखरच चिरस्मरणीय आहेत इतकेंच नव्हे तर या नवीन प्रेमामध्य तसेंच समसमान भावामध्यें आणि ब्रिटिश प्रजा जनांचे हक्क सर्वत्र सारखे ठेवण्याच्या उत्कट इच्छेमध्यें आमच्या सर्व भावी कल्याण संपदा प्रतिष्ठित झाल्या आहेत आणि आमच्या इंडियन राष्ट्राला सोन्याचे दिवस समीप येत चालले आहेत अशी मनाची तंतोतंत खात्री होते. आमच्या लोकाच्या महत्वाकांक्षा फार दूरवर पोंहोचल्या आहेत, त्याचे अंतिम हेतू बादशाही प्रेमाच्या प्रकाशांत फार सुंदरपणें प्रकाशत आहेत आणि किंबहुना कांहीं दैवी क्लुप्तिनें इंडिया इंग्लंड बनला आहे ह्मणा किंवा इंग्लंड इंडिया बनला आहे ह्मणा, अशा आशयाचा एक विलक्षण अननुभूत असा आत्मभाव इंडियन मनामध्यें संचरला आहे.

सर्वच महिना आनंदाच्या महोत्सवांत चालला आहे हें येवढें विस्तीर्ण खंड पण येथें असें एकही स्थळ आढळणार नाहीं कीं जेथून जाहीर सभांतील आनंदाच्या गर्जनांनीं आकाश दुमदमून गेलें नाहीं. एकही गृह असें सांपडणार नाहीं कीं तें नानाविध रंगांनीं आपला अत्यंत रमणीय असा देखावा उठावित नव्हते आणि असा एकही मनुष्य सांपडणार नाहीं कीं ज्याच्या पर्यंत या नवीन राज्याभिषेकाच्या आनंदाची लाट पोंहोचली नाहीं. सर्वत्र एका प्रेमाच्या मनोविकाराचें साम्राज्य स्थापित झाल्या सारखें वाटतें येवढा आनंददायी प्रसंग निव्वळ माणसाच्या कल्पनेनें येणारा नाहीं या प्रसंगामध्यें कांहीं तरी विशिष्ट हेतू आहे आणि तो हेतू ह्मणजे इंडिया व इंग्लंड या दोन भूमींनीं जें बनलेलें राज्य आहे त्या राज्यांतील प्रजाजनांच्या एकी करणाचा हा पहिला पाया होय. जेथें अंतःकरण अंतःकरणाला मिळतें तेथें भूमी द्रव्य जात धर्म इत्यादि भेदक गोष्टी अगदीं लयास जातात किंबहुना या अंतःकरणांच्या एक भूत प्रवाहाला वरील भिन्न भिन्न भेद दर्शक गोष्टींनीं विलक्षण शोभा येते आणि एक अप्रतिम अमृत रसच बनत जातो.

चांगल्या गोष्टींना किंमतही चांगली द्यावी लागते हें सर्व श्रुतच आहे. मंगल समारंभ दिपोत्सव आतषबाजी मोठ मोठे धर्मादाय इत्यादिकांनिमित्त जो लक्षावधी व कोट्यावधी रुपये आमच्या या गरीब देशानें खर्च केला आहे तो कांहींहि सफळ झाल्याशिवाय राहणार नाहीं. अमल्या आनंदाच्या गोष्टींमध्येंच राष्ट्राच्या भावी वैभवाची मूळ बीजें असतात हें विसरतां कामा नये. या महिन्यातील आनंदाचे प्रसंग हे केवळ चैनी खातरचे होते असा जर ग्रह झाला तर आह्मी असें ह्मणूं कीं राज्याभिषेकाचें वैफल्य या पेक्षां दुसऱ्या कोण त्याच तऱ्हेनें होणार नाहीं. कोट्यवधी रुपये पाण्याप्रमाणें खर्च केले ही कांहीं राष्ट्राची अदूर दृष्टी नव्हे. जर कोट्यावधी रुपये लोकसमूह मद्यपानादि व्यसनांसाठीं खर्च करतो, जर कोट्यावधी रुपये लढायांतील लक्षावधी मनुष्यांच्या हानीसाठीं खर्च होतात तर त्यांपेक्षां राज्याभिषेकाच्या आनंदोत्सवाकडे होणारा हा खर्च ईश्वराला कितितरी रुचेल बरें! हें या खर्चानें आमचें राष्ट्र प्रजा व राजा यांच्यामध्यें ज्या आनंद ग्रंथी बांधत आहे त्या चिरकाल आमच्या आशा आमची सुखें व आमच्या महत्वकांक्षा उत्तरोत्तर वृद्धिंगत करतील आणि आमचें राष्ट्र ब्रिटिश राज्याच्या वैभवाला व सुधारणेला शोभेलसें प्रधान पद पावेल.

मनुष्य प्राणी कल्पनेच्या साम्राज्यामध्यें भ्रमण करीत असतो आणि ह्या राज्याभिषेकाचे खरें कल्पना साम्राज्य निराळेंच आहे. राजापुढें सर्वजण गुढगे टेकून वंदन करतात या लौकिकी गोष्टीचा खरा अर्थ असा आहे कीं मनुष्य [illegible] कल्पनेपुढें आपलें [illegible] करीत असतो. [illegible] अत्यंत उच्च व उदार कल्पनाचें मूर्तरूप होय. आणि याच तात्विक दृष्टीनें राज्याच्या सिंहासनाला विष्णुपदाची उपमा देत असतात. अशा सागल्याच उदात्त कल्पनेनें सर्व इंडियन राष्ट्र ओतप्रोत भरून गेलें आहे. आणि त्याच कल्पनेला मूर्तिमंत रूप या महोत्सवामध्यें आलें. आंनदोत्सव हे कांहीं कोणी सांगून होणारें नसतात किंवा दुसऱ्याच्या सांगण्यानें कोणी करितही नसतात मनाच्या प्रसन्नतेच्या ह्या गोष्टी आहेत आणि दिल्लीच्या समारंभाचे वेळीं ज्यांच्या नेत्रांचें साफल्य झालें ते असाच उद्गार काढतात कीं इतका प्रेमळ राजा व इतकी प्रेमळ प्रजा हीं क्वचितच दृष्टीस पडतील. जेथें प्रेमाचें राज्य सुरू होतें तेथें राजनिष्ठा वगैरे हे मनोभाव अगदीं लघु वाटतात या प्रेममय राज्याला या राज्याभिषेकानें सुरुवात झाली आहे. असा इंडियन राष्ट्राचाच काय पण इंग्लिश लोकांचाही पक्का समज झालेला आहे. दोन बंधूंना जसें एकाचें दुसऱ्यावांचून चालणार नाहीं असें वाटतें आणि दोघांच्या मैत्रीमध्यें आणि सलोख्यामध्येंच खरा धन दौलत आहे असा भ्रातृभाव इंडियन व इंग्लिश या दोघांमध्यें श्रीमंत जॉर्ज सरकार यांनीं प्रेरित केला आहे. हीच प्रेरणा उत्तरोत्तर बलवत्तर व जोमदार होत जावी असा ईश्वरी संकेत दिसतो. आणि या संकेताची हीं पूर्व प्रमाद चिन्हें इंडियन दृष्टीपुढें सदोदित तेजोमय राहतील.

---

## पतपेढी

मध्यप्रांत व वऱ्हाड यांमधील पतपेढीचा वार्षिक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. यामध्यें १९११ मार्च अखेरचा इतिहास दिला असून पत पेढीच्या खात्याचे रजिस्ट्रार रा. रा. एन. एस. क्रास्थवेट यांनीं फार उपयुक्त अशा सूचना दिल्या असून पतपेढ्यांचें भावी धोरण हीं सांगितलें आहे. प्रथमतः १९०४ सालीं हा सहकारी पतपेढीचा कायदा हिंदुस्थान सरकारनें पास केला आणि तेव्हांपासून निरनिराळीं स्थानिक सरकारें आपआपल्या प्रांतापुरती पत पेढ्यांची स्थापना करीत चालले आहेत. गेल्या सात वर्षांच्या काळाच्या मानानें पतपेढ्यांचा फैलाव जसा सर्व राष्ट्रभर व्हावयाला पाहिजे तसा झालेला नाहीं ही गोष्ट आमच्या दृष्टीनें अपवादक नाहीं. सरकारी गोष्टी अमलांत येण्याला नेहमींच विलंब लागत असतो. आणि एकदा सर्व गोष्टी स्थिरस्थावरतेनें प्रचलित झाल्या ह्मणजे सरकारी संस्था चांगल्या जोरानें चालतात आणि त्यांना चिरस्थायी रूपही प्राप्त होतें. तसाच प्रकार या पतपेढ्या संबंधाचा आहे.

मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून हल्लीं ज्या पतपेढ्या आहेत त्यांच्या प्रसारा करितां व त्यांच्या देखरेखी करितां हल्लीं एक स्वतंत्र अधिकारी असून सरकारी हेतू या संस्थाचा प्रसार गांवोगांव करण्याचा [illegible] तर ही पतपेढीची देणगी होय. मर्यादित लघु उत्पनाच्या शेतकरी लोकांस व इतर हुन्नरवाल्या लोकांस आपआपले उद्योग धंदे भरभराटीनें चालवितां येण्याला शिकविण्याची सरकारापाशीं हीच एक पतपेढीची विद्या आहे. लोकांनीं मितव्ययी व्हावें त्यांनीं स्वतःच्या हिमतीवर उद्योग धंदे चालवावे आणि त्यांना सहकारी तत्वाची चांगली ओळख पटावी ह्मणून ही पत पेढीची योजना काढण्यांत आली आहे. पतपेढी उत्तरोत्तर लोकप्रिय होत चालली आहे. लोकांना तिची नुकतीच गोडी लागली आहे, आणि सरकारही आपल्या अधिकाऱ्या मार्फत जाहीर सभांच्या द्वारानें आणि शालागृहांमधून पतपेढीची गर्जना एकसारखी लोकांच्या कानावर घालीत आहे. आतां आह्माला अशी बळकट आशा वाटते की राजाश्रयानें आणि लोकांच्या संमतीनें पतपेढीची संस्था गांवोगांव प्रचलित होऊन आपल्या या देशाला डोकें वर काढण्याचें वळण लोकरच लागेल.

पतपेढ्यांच्या आपल्या देशाच्या वस्तुस्थिति प्रमाणें तीन वर्ग [illegible] हा या देशाचा मुख्य [illegible] असल्याकारणानें शेतकऱ्यांच्यासाठीं [illegible] आहेत. ह्या पेढी [illegible] तात. कृषीकर्माशिवाय [illegible] लोकांमध्यें जो पतपेढी स्थापण्यांत तिला औद्योगिकपेढी असें नांव दे[illegible] पतपेढीचा तिसरा वर्ग ह्मणजे प्रांत किंवा औद्योगिक पेढ्यांना [illegible]

[illegible] समाचार [illegible] केले.

पुरवठा करण्यासाठीं जी पेढी काढतात ती होय. ती मध्यवर्ती किंवा केंद्रस्थ पतपेढी ह्मणजे ग्रामपेढ्यांचें किंवा औद्योगिक पेढ्यांचें भांडार गृहच होय.

मध्यप्रांतात हुसंगाबाद, बालाघाट, जबलपूर, चांदा, बैतूल व सागर ह्या सहा जिल्ह्यांमध्यें मिळून गेल्या जून अखेर ३२४ ग्रामपतपेढ्या असून त्यांचे ७,२९ सभासद आहेत. आणि वऱ्हाडातील आकोला जिल्ह्यांत ह्या पेढ्या १९ असून त्यांचे ४८७ सभासद आहेत. १९१०-११ सालापेक्षां ही संख्या दुपटीपेक्षां अधिक वाढली असून ह्या पतपेढ्यांना भांडवल पुरविणाऱ्या १२ मध्यवर्ती पेढ्या स्थापन झाल्या आहेत व त्यांच्यापाशीं भांडवल सरासरी १॥ लाखाचें आहे. औद्योगिक पतपेढ्या रायपूर, बालाघाट, हाता, बैद्या, हर्दा, बऱ्हाणपूर, नागपूर व बदनूर अशा आठ आहेत. आणि त्यांचें भांडवल ७९९३४ रुपये आहे. विद्यमान असलेल्या पतपेढ्यांची उत्तरोत्तर भरभराट आहे आणि त्यांच्यामध्यें एक प्रकारचा नवीन जीव येत चालला आहे असें दिसतें.

---

## ग्रामजोशी

महाराष्ट्रांत मध्यप्रांतात व तसेंच वऱ्हाडांतही ग्रामजोशी हा हिंदु समाजाचें मुख्य प्रधान अंग आहे. समाजाचें कर्मकांड चालविण्याचे सर्व अग्राधिकार ग्रामजोश्याकडे असतात आणि पूर्वील पद्धतीप्रमाणें ग्रामजोशी अर्थातच ब्राह्मण वर्गातला असतो. ब्राह्मण हा शिरोभागी आहे आणि त्यामध्यें ग्रामजोशी हा प्रमुख असतो. ग्रामजोश्याचा अधिकार फार मोठा आहे. त्याच्या हातीं समाजाच्या चलनवलनाची सर्व सुत्रें असतात. ह्या मोठ्या अधिकाराला सतपात्र असेच जोपर्यंत ग्रामजोशी असतात तोपर्यंत जोश्याचे अधिकार समाजावर चालतात. पण जोशी जर विद्येपासून पराङ्मुख असला, त्याला समाजाचीं कर्मकांडें निट चालवितां येत नाहींशीं झाली आणि तो जर आपल्या नित्य कर्मानें विशेष वृत्तीचा बनत चालला तर त्या जोश्याला गावकरी लोक पुसत नाहींसे होतात, ब्राह्मणाचें वर्चस्व आपोआपच कमी होत जातें व किंबहुना ब्राह्मण आपल्या लग्नकार्यादि समारंभांना नको असेंही वाटूं लागतें. तमाम अशा जोश्यावर बिथरत चालला ह्मणजे जोशाही आपला अधिकार कायद्यानें रजावूं पाहतो. जोशीवृत्तिसंबंधानें अलिकडे बरेच खटले न्याय कोर्टांतून चालत असतात आणि पुष्कळसे ठराव ग्रामजोश्याचें वर्चस्व चालूं करण्याला अनुकूल असे झालेले आहेत जोसपणाच्या वृत्तीला स्थावर जिनगी संस्था समजण्यांत येते अणि या कायद्याच्या दृष्टिनें जोशीपणाचा अंमल अझुनही समाजावर चालूं आहे.

पण आलेकडे अलिकडे हा जोशी [illegible] अंमल समाज झुगारून देऊं पहात समाजांतील पुष्कळ लोकांना जोशी वाटतो. अशा समजुतिला जोश्याची [illegible]सो किंवा समाजाची चूक असो [illegible] समज उत्तरोत्तर दृढ होत चाललेला आहे. जोशी आपली भिक्षावृत्ति कायद्याच्या दंडानें गाजवू पहातो व लोकही तितक्याच दृष्टीनें तो दंड मोडून तोडून टाकण्याच्या उद्योगांत निमग्न आहेत. अलिकडचे ब्राह्मणच आपल्या पवित्र कर्तव्याला विसरले आहेत आणि त्या बरोबर जोशीही अधोगतिला पोंहचला आहे यांत कांहीं नवल नाहीं. वर्तमानकालचे स्थित्यंतरच ही गोष्ट अगदीं प्रसिद्ध पण व्यक्त करीत आहे, व मराठी मंडळी ब्रह्मद्वेष्टी होऊं लागली आहे कांहीं ब्राह्मणामध्यें इतकें विद्येचें तेज, पवित्र वर्तन व समाजाला उन्नतिला नेण्याची कर्तुत्व शक्ति हीं अगदीं लुप्तप्राय झालेली आहेत.

सत्यशोधकसारख्या अलिकडे पुष्कळ संस्था निघाल्या आहेत त्यांचा मुख्य हेतू हा कीं ब्राह्मणाच्या हातून धर्म कार्य करून घ्यावयाचें नाहीं. ते आपआपल्या जतींत त्याच लोकांना वेदोक्त संस्कार शिकवून ब्रह्मकर्म त्यांच्या हातून करून घेतात. यावरून मुळें जोश्यांची वृत्ती अगदींच बसत चालली आहे पाणि अशा परि स्थितीतल्या लोकांवर जोश्याचा कायद्याच्या बाजूनें अंमल चालवितां येत नाहीं. थोड्या महिन्या पूर्वीं आमच्या स्थानिक हायकोर्टानें असा एक निर्णय दिला आहे कीं ज्या लोकांना ब्राह्मणाच्या हातून धर्म कार्य चालवावयाचें नाहीं व ज्यांना ब्राह्मण ग्रामजोशी नको अशा मतांच्या लोकांस जरी आपण हिंदू समजतो तरी धर्माच्या दृष्टिनें ग्रामजोश्याच्या अधिकार चालण्या इतके ते हिंदु राहिलेले नाहींत. अशा लोकांचा धर्म पंथच निराळा समजला पाहिजे. आणि त्यांच्या विरुद्ध ग्रामजोश्याला कांहीं एक दाद देतां येणार नाहीं. उत्तरोत्तर लोकांस मतस्वातंत्र्य पाहिजे तसेंच कर्म स्वातंत्र्यही पाहिजे. ब्राह्मणा कडून करविलें तरच तें धर्म कर्म यथासांग होतें अशी आतां लोकांची समजूत राहिलेली नाहीं. आणि तेवढ्या पुरता धर्माच्या बाजूनें समाज विस्खलित होत चालला आहे असें वाटतें. तरी स्वातंत्र्याची खरी चाड असणा ऱ्या लोकांस वरील हायकोर्टाचा ठराव प्रगमनशील लोकांना चांगला आवडेल असेंच आह्मास वाटतें. हल्लींचा काळ कायद्याच्या लढाईचा दिसतें खरा पण सर्व कायद्याचा ओघ विचारस्वातंत्र्य व कर्म स्वातंत्र्य देण्याकडे आहे. तेव्हां ग्रामजोश्यांनींच काय पण समाजांतील सर्व अग्रणी ज्ञातींनीं आपला अधिकार संभाळतां येईल अशी विद्या संपादन केली पाहिजे, आणि त्या बरोबरच समाजाला हस्तगत करण्याइतकें सतुच्छील कायम ठेविलें पाहिजे.

---

## सन्मान

( अग्रणी लोकांना मानपत्र )

गेल्या दरबाराच्या वेळीं आमच्या जिल्ह्यांतील ३० सद्गृहस्थांचा विशेष सन्मान करण्यांत आला. हे गृहस्थ निरनिराळ्या धंद्यातले आहेत आणि त्यांचा खानगी पेशाही भिन्नभिन्न आहे. जे गृहस्थ आपला उद्योग धंदा संभाळून सार्वजनिक कामाला मदत करितात. तीच मंडळी समाजाला व सरकाराला विशेष आवडतात अशा लोकांच्या सार्वजनिक कामावर सरकारी डोळा न्याहाळून फिरत असतो व जे त्या दृष्टीच्या पंक्तीत येतात त्यांचा गौरव करण्यास सरकार नेहमीं उद्युक्त असतें. सार्वजनिक कार्याकडे ज्यांनीं आपला काल धन बुद्धि खर्चली आहे अशांचा नाम निर्देश करण्यालाही आह्माला विशेष आनंद वाटतो. नाम निर्देशानें व्यक्तिविषयीं आदर भाव उत्पन्न होतोच पण त्या शिवाय त्यांच्या उदाहरणानें दुसऱ्यास सत्कार्य करण्याविषयीं उत्तेजन येतें. चांगल्याचा चांगुलपणा व्यक्तिशः सांगण्यात विशेष मौज असते खरी पण तों चांगुलपणा सर्वांसच सारखा प्रिय होणारा नसल्यामुळें तो खुलासेवार सांगण्याच्या भानगडींत आह्मी पडत नाहीं. तथापी इतके सांगणें जरूर आहे कीं कोणी म्युनिसिपालटीला मदत केली, कोणी डिस्ट्रीक्ट बोर्डाच्या कामाला जोर आणला, कोणाची दृष्टी फॉरेस्ट खात्याला साह्य देण्याकडे गेली, कोणी सार्वजनिक शाळागृहाला किंवा दवाखान्याला पैशानें मदत दिली, कोणी पतपेढ्या उभारण्याला लोकमत अनुकूल केलें, कोणी ऑनररी म्याजिस्ट्रेटी चांगली बजावली, कोणी विद्या दानाच्या कामाला चांगला हातभार लावला, कोणी शाळाखात्याच्या शिस्तीला वळण उत्तम दिलें इत्यादि नानाविध रितींनीं सर्वांनीं कांहींना कांहीं तरी विशेष सत्कृती केलेली आहे. या सत्कृतिचा गौरव करावा ह्मणून स्थानिक सरकाराकडून सोनेरी मानपत्रें आलीं आणि तीं येथील दरबारामध्यें जाहिर रितीनें त्या त्या गृहस्थास लोकांच्या दृष्टी पुढें आणून अर्पण करण्यांत आलीं या सद्गृहस्थांची नामावळी अशी:—

१ रावबहादुर दत्तात्र विष्णू भागवत.
२ रावबहादुर यशवंत वामन दिघे वकील वाशीम.

रा० रा०
लक्ष्मणराव दहिहांडेकर कारंजा.
प्रयागजी लीलाधर कारंजा
मिरजा अब्बासबेग आकोला
विष्णु मोरेश्वर महाजनी
रामचंद्र विष्णु महाजनी
हरकचंद गुलाबचंद तेल्हार.
त्रिंबक अवधूत पातूर.
विष्णु गणेश गायगांव.
बळीराम त्रिंबक तहशिलदार वाशीम.
भगवंत नागोराव पारडी.
कालुराम जेलर.
आमदू मिया पोपात.
देविसिंग मंगरूळपीर.
शेट बालकिसन दास वाशीम.
महमद हतम कारंजा.
उमर हजी करीम आकोला.
श्रीकृष्ण अमृत आडगांव
नारायण रामचंद्र देशपांडे बाळापुर
रामचंद्र मार्तंड गुप्ते
मोरेश्वर बाळकृष्ण परांजपे.
लक्ष्मण गोविंद ओक.
भाऊ शिवराम केळी वेळी
सूर्यभान मानजी केळी वेळी.
शंकर नारायण डांगे हेडमास्तर हायस्कुल आकोला.
भगवान जयदेव कारले.
शामराव रावजी खानझोडे.
हीरालाल पनचंद बाळापूर.
देवराव भगवंत पातूर.

---

## वऱ्हाडवृत्त.

मध्यांत वऱ्हाडांत मोर्शी तालुक्यातील शेंदुर्जने, मलकापूर, जामठी, गणेशपूर, पुसला, आष्टनेर आणि उमरावती व साहूर या गांवीं प्लेग आहे.

**कलाली मक्ते:—** १९१२।१३ चे कलाली मक्ते गांजा व अफू यांचे हराज प्रथमतः बुलडाण्याला १६ जानेवारीला सुरूं होऊन नंतर उमरावतीला २१ जानेवारीला सुरूं होतील. त्यानंतर ३० जानेवारीला यवतमाळ येथें सुरूं होऊन ९ फेब्रुवारीला आकोल्यास होतील. प्रत्येक जिल्ह्याच्या सदराला चार दिवस हराज चालतात.

**अपकारी उत्पन्न:—** १९०८।९ सालापासून अपकारी उत्पन्न ७०॥ लक्षापासून गेल्या साली ८०९१२६६ पर्यंत वाढलें आहे.

दिल्ली दरबारच्या सुप्रसंगा निमित्त नामदार चिफ कमिशनर साहेबानें हत्याराच्या कायद्याच्या १३, १४, १५, १६ या कलमांच्या शर्ती व लायसन्साच्या अटी आमच्या प्रांतांतील खालील सद्गृहस्थांच्या संबंधानें काढून टाकण्यांत आल्या आहेत.

### उमरावतीजिल्हा

रा. रा. मिर तुराबअली जाहागिरदार, उमरावती

### यवतमाळ जिल्हा

दत्तात्रय कृष्ण जाहागीरदार, पारवा

### आकोला जिल्हा

नारायणराव बापुराव देशमूख, खेरांग
नारायण रामचंद्र देशपांडे, बाळापुर
उत्तमराव यशवंतराव नाईक, राजुरा

### बूलडाणा जिल्हा

विष्णुसा गापालसा लाड, मेहेकर
मानिकराव वळवंतराव देशमुख, काटरगांव
सिताराम रूपचंद पाटील पिंपळगांव काळे.

राज्याभिषेकाचे महोत्सव— ठिकठिकाणाहून कसकसे उत्सव साजरे करण्यांत आले या विषयीं पत्र व्यवहार येत आहेत पत्र पाठविणारांचे आह्मी आभार मानतो पण स्थल संकोचाच्या मुळें व वेळेच्या मुळें ते छापतां येत नाहींत.

मुर्तीजापूर— या स्टेशनाला चक्रवर्ती बादशहा व राणी ह्यांची स्वारी जातांना थोड्या वेळ थांबणार असल्या विषयीं कर्णोपकर्णी ऐकूं आल्या संबंधानें तो दिवस साजरा करण्या विषयीं लोकांचे विचार आतांपासूनच चालले आहेत.

रजेवरून आल्यावर मि. एम. नरसिंगराव ए.-- असि. कान ऑफ फॉरेस्ट यांस यवतमाळ डिविजनमध्यें नेमलें आहे.

रा. रा. वासुदेव गोविंद मंडपे, मुनसफ मध्यप्रांत, यांस वऱ्हाडांत मोर्शी येथें नेमलें.

रा. रा. महादेव गोपाळ शिरसाळकर, एल. एल. बी. यांस आफि. मुनसफ फर्थ ग्रेड करून आकोला येथें नेमलें.

---

सुखसंचारक कंपनी मथुरा यांची तयार केलेलीं व सरकारांतून रजिस्टर झालेलीं औषधें, जीं वीस वर्षांपासून लोकांत अनुभविलीं आहेत.

## सुधासिन्धु

हें कफ, खोकला, दमा, थंडीचा ताप, पटकी, शूळ, संग्रहणी, अतिसार, पोटांत दुखणें, वांत्या, मळमळणें, हात पाय व कंबर दुखणें, मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, डांग्या खोकला, दूध ओकून टाकणें इत्यादींवर स्वादिष्ट व सुवासिक औषध आहे. किंमत प्रत्येक बाटलीस ०८ आणे.

## दद्रुगजकेसरी

गजकरणास समूळ नाहींसें करणारें हेंच फक्त एक पवित्र औषध आहे. कांहीं सुद्धां जळण अथवा आग होत नाहीं. यासच जर दारू अथवा लिंबाचे अर्कांत मिळविलें तर २ बाटल्या अर्क तयार होतो. किंमत प्रत्येक बाटलीस ०४ आणे १२ बाटल्या एकदम मागविल्यानें त्यांस एजंट समजून नोटिशी, हँडबिलें वगैरे फुकट पाठविलें जातात, व कमिशनही दिलें जातें. चालू सालचें पंचांगही फुकट मिळतें.

मागविण्याचा पत्ताः—
पंडित क्षेत्रपाल शर्मा मालक,
१३९ सुखसंचारक कंपनी, मथुरा

## दिल्ली दरबार.

मानपत्राचें उत्तर देतांना "हिंदुस्थानचीं एक सारखी प्रगती होत जावी ही आपली उत्कट इच्छा आहे." असें बादशहानीं ह्मटलें. हिंदुस्थानांत शेंकडा ८० ऐशीं लोक शेतकीवर निर्वाह करीतात. तेव्हां त्यांच्या मध्यें अगोदर प्रगती झाली पाहिजे. त्यांची प्रगती होण्यास शेती सुधारली पाहिजे. शेती सुधारण्यास सुधारलेल्या आउतांचा जास्त जास्त प्रसार झाला पाहिजे हें उघड आहे. आणि ही सुधारलेली शेतकीची आऊतें ह्मणजे लोखंडी नांगर, कडबा कापण्याचीं यंत्रें, मोटेचीं चाकें, वगैरे तयार करण्याचें काम आह्मी करीत आहों. सबब हीं यंत्रें आमच्या कडून मागवा. क्याटलाग मागवा.

किर्लोस्करबंधु.
पोष्ट किर्लोस्करवाडी (सं० औंध)
जिल्हा सातारा ).

नो० नं० ५६३

ठिक ठिकाणी एर्जटस् पाहिजेत.

## सन लाइफ अशुअरन्स कंपनी ऑफ कानडा

[ १८६५ ]

इंग्लिश सरकारची सक्त देखरेख सरकारी हुकुमाशिवाय भांडवल गुंतवता येत नाहीं.

**भांडवल तेरा कोटी रुपये.**

पॉलिसीचे नमूने फारच सुधारलेले आहेत.

पालिसी .... .... .... .... .... .... बिन अटीच्या.
पॉलिसी .... .... ... ... .... .... बिन तक्रारी.
पॉलिसी .... .... ... .... .... .... बिन बुडणारी.

हिंदुस्थानचे मुख्य ऑफिस, हार्नबी रोड मुंबई. } व्य. श्री मुधोळकर मध्यप्रांताचे वऱ्हाडचे जनरल एजंट अकोला ' प्रांत वऱ्हाड

## Oriental Govrnment security LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

## FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act in treating the clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner a man make up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For term please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on poliction

M. DESOUZA.
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

## विलक्षण नयन रुक्कुठार.

विलक्षण नयन रुक्कुठार - ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार—खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, फूल, भूरी, फुल इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशाविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणांनीं डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेंच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालण्या करितां कांचेची नळी फुकट मिळेल. एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

व्ही. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ८६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी न मिळेल ... मराठी ... नरी ... शेद ...

... एन. घारपुरे. पोष्ट- अंजिनाग

विहार आनन्दका सागर रंगीन तसवीरे सहित चारो भाग तथा पांचो अंग सचित्र कोख शास्त्र.

असली हमसे मंगावो धोकेसे बचो स्त्री पुरुषोंके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पतिव्रता, व्यभिचारणी आदिको पहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार मय सहवास स्थान क्रया, शैय्यातिथ, कामस्थान सालामगरि, वर्तासोआभूषण, बद्धतर्ओदिवमथान पुत्रस्टीकर्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोंकी चिकित्सा औषधि, पशु भाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण सुद्धां विद्या आदि अमुल्य विषयका भेद र किंमत रु०

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडा
नो० नं० ७७ अलीगड

## जाहिरात

वर्षफल—प्रत्येक महिन्याचें फलासह लाभालाभ सुखदुःख कळवूं. फी. ३ रुपये वर्ग २ चे २ रुपये. खर्च ०= जन्मकाल, जन्म अथवा चालू नांव कळवावें.

पत्ता— भा० गो० पंडित,
रा० व पो० लोणखेड जि ०प. खानदेश

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

## नोटीस

रा० रा० गोपुलाल सुखलाल अगरवाले राहणार मलेगांव २ हरलाल धनामल अगरवाले रा० बार्शिटाकळी ३ देवीदास नारायणदास अगरवाले रा० पातुर्डा यांस:—

मी खालीं सही करणार यांजकडून कळवितो कीं तुह्मी मजपासून ता० ५।१२।११ रोजीं तामगांव मुक्कामीं येऊन माझे दुकानचे संबंधानें व इतर इस्टेटी संबंधानें पंधरा रुपयांचे स्टँपावर व्यवस्थापत्रक लिहून घेतलें ते दिवशीं सायंकाळीं रजिष्टर करून घेतलें. परंतु ते दिवशी सायंकाळी घरीं आल्यावर मी आपलें मनानें विचार केला असतां तो लेख मला पसंत पडला नाहीं वास्तव या नोटीशीनें कळवितो कीं झालेला लेख तो रद्द असे. त्या लेखाचे आधारें तुह्मांस माझे दुकानची व इतर इस्टेटीची व्यवस्था पाहण्याची जरूर नाहीं व आपण आतां माझ्यासंबंधाचा कोणताही व्यवहार करूं नये. मी स्वत मालक असून मीच माझे दुकानचे व इतर इस्टेटीचे काम चालवीन तुह्मास दिलेला लेख रद्द असे. माझ्या शिवाय कोणताही व्यवहार केल्यास तो रद्द समजून रीतीप्रमाणें तजविज केली जाईल कळावें. ता० १३।१२।११.

सही

लक्ष्मीनारायण उत्तमचंद अगरवाले राहणार पातुर्डे दस्तुर खुद.

नो० नं० ५५५

## नोटीस.

सर्वत्र लोकांस या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं मुळचंद गंगाराम दुकान जामोद ह्या दुकानावर गणपत गंगाराम असलगांवकर हे मुकत्यार होते. त्याचें मुकत्यारपत्र रद्द करून त्यांस आह्मी नोकरीहून कमी केले आहे तरी आमचे दुकाना संबंधी कोणताही व्यवहार कोणी त्याशीं करूं नये केल्यास त्याची जबाबदारी आमचेवर नाहीं कळावें.

सही

बनसीलाल निंबाजी दस्तुर खुद. गार्डीयन.

नो० नं० ५५६

## नोटीस

बेशमी भीमी मर्द गुलाबसींग रजपूत रा० अनुराबाद तालुके मलकापूर जिल्हा बुलडाणा इस:—

खालीं सही करणार अशी नोटीस देते कीं तारीख ४ माहे डिसेंबर सन १९११ रोज सोमवार या दिवशीं तुह्मी वऱ्हाड-समाचारमध्यें जी जाहीर नोटीस नं० ५२१ ची दिलेली आहे ती सर्वथैव खोटी आहे. व त्या नोटीशीपासून माझे अब्रूची नुकसानी झालेली आहे. कारण नोटीशींत मी घर निघालेली आहे असा मजकूर आहे परंतु मी आपले नवऱ्याचे घरींच राहतें असें असतां तुह्मी ही नोटीस खोटी दिलेली आहे. त्या प्रमाणें इस्टेट तुह्मी स्वतःची नसून ती दोघींची समाईक आहे कारण ती इस्टेट वडिलोपार्जित असून त्या बद्दल कांहीं खानगी मांझेच नवऱ्यानें स्वसंपादन केलेली आहे. असें असतां उलट तुह्मी विनाकारण त्रास देण्याचे हेतूनें ही नोटीस दिलेली आहे तसच ही इस्टेट कोणासही दोघींची मुलें सज्ञान होईपर्यंत गहाण, खरेदी, बक्षीस वगैरे देतां येणार नाहीं कारण त्या इस्टेटीची मालकी तुझे व माझे मुलाची समाईक आहे त्याप्रमाणें कांहीं जंगम स्थावरची तूं अफरातफर केलेली आहे. त्यामुळें माझें नुकसान झालेलें आहे. तरी या सर्व गोष्टीचा खराखरा मजकूर काय आहे तो मजला ८ दिवसांचे आंत कळवावा या प्रमाणें न केल्यास तुजवर कायद्या प्रमाणें तजवीज केली जाईल. व या नोटीशीचा खर्च भरून घेतला जाईल कळावें. तारीख २० माहे डिसेंबर सन १९११.

सही

चुन्नी मर्द गेंदुसींग रजपूत राहणार गाडेगांवखुर्द ता० जळगांव पोष्ट-पींपळगांव काळे नीशाणी हातची रांगोळी दस्तुर कडतु बाळाजी.

नो० नं० ५५७

## नोटीस

नोटीस बेशमी-- रीखमदास सवाईराम त० मुलगा शांतीदास रीखमदास दुकान खामगांव यांस:-

नोटीस देणार खालीं सही करणार यांजकडुन तुमचे पासून बाळापूर दुकानचे धर्मादाय बद्दल प्रत्येक गाडीस ८—॥ आणा प्रमाणें संमत १९६३ पासून संमत १९६५ अखेर तीन वर्षाचे जे कांहीं पैसे जमा असतील ते हिशेब करून आमचें दुकानीं आठ दिवसांचे आंत आणून देणें तसें न केल्यास रीतीप्रमाणें तजवीज करूं. कळावें तारीख १३-१२-११ इ०

सही

सुकलाल बनशीलालजी द० खु०

नो० नं० ५५८

## नोटीस.

नोटीस बेशमी— सरुबाई जवजे बळीरामजी देशमुख राहणार कामरगांव ता० मुर्तिजापूर जि० आकोला ईस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं पूर्वी ता० १४-११-०४ इ. रोजीं माझे बापानीं तुह्मास मौजे मंगरूळ ता० मुर्तिजापूर येथील शेताबदल नोटीस दिली होती तेव्हांपासून बरेंच दिवस हाल चाल केली नाहीं व हल्लीं माझा बाप जयरामजी मयत होऊन कसबे कामरगांव येथील सर्वे नंबर १०३-१६२ एकरगुंठे २२८३०-२१८२६ आकार रु० १८०--१६० यांचें खातें माझें नांवानीं झालें तुह्मी माझ्या सख्या चुलत भावजई आहांत परंतु निपुत्रिक असल्यानें वडिलोपार्जित इस्टेट कायद्या प्रमाणें ह्मणुनच कोणाला गाहाण, खरेदी, बक्षीस वगैरे देतां येत नसून तुह्मी तसें करण्याचा इरादा केल्याबद्दल मला समजलें. व त्याप्रमाणें वरील गांवची हवेली ही त्याप्रमाणें करणार. करितां आतां पुढें तुमचा भरंवसा राहिला नाहीं तर हल्लीं ज्या हवेलींत राहतां ती नोटीस पावल्यापासून आठ ८ दिवसांचे आंत खालीं करून द्यावी व शेतें कोणत्याही तऱ्हेनें कोणाला देऊं नयेत. व कोणी माझ्या संमती शिवाय घेऊं नये घेतल्यास तें रद्द समजलें जाईल. कळावें. तारीख २० माहे डिसेंबर सन १९११ इ.

सही

अमृतराव वल्लद जयरामजी देशमुख रा० कामरगांव हल्लीं राहणार मंगरूळ कांबाचे ता० मुर्तिजापूर यानें खुद हातची नि० असे.

नो० नं० ५५९

## नोटीस

नोटीस बेशमी केशव तुकाराम ब्राह्मण राहणार तळेगांव तालुके आकोट जिल्हा आकोला पोष्ट तेल्हारा यांस.—

मी खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तुह्मांस कुलमुकत्यारपत्रानें कोर्टाचे कामाकरितां नोकर ठेविलें होतें परंतु तुह्मी कोर्टाचें काम बरोबर न करितां उलट आमचे विरुद्ध वागत असून व अजमास ५।६ महिन्या पासून तुह्मी पळूनजाऊन कागदपत्र हिशब वगैरे समजुन न देतां पळून गेले आहां असें करणें योग्य नाहीं. तुह्मांस या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं तुह्मांस कुलमुकत्यारपत्र ता० २ माहे जुलई सन १९१० इ चे रद्द केलें असून व नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत आमचे जे कांहीं कागदपत्र असतील ते आणून देऊन शिवाय हिशेब समजून द्यावा. करितां नोटीसीनें कळविलें आहे कळावें, तारीख १४।१२।१९११ इ०

सही

जानकी वल्लद भीकाजी तेली राहणार टाकळी वतपाळी याच्या हातची निशानी असे.

दस्तुर मारोती कानजी तेली दस्तूर खुःद.

नो० नं० ५६०

## नोटीस

१ सेख सजन वल्लद सेख फकीरा बकर कसाई राहणार नेरी ता० जामनेर जिल्हा पूर्व खानदेश.

२ इस्मायल वल्लद सेख बकरकसाई राहणार धुळे.

३ बक्षुमीया वल्लद मोलन साहेब काजी राहणार नशिराबाद.

मी खालीं सही करणार या नोटिशीनें कळवितों कीं सेखसजन यानें आपली मुलगी मुन्नाबी इचें लग्न माझे मुलाशीं ह्मणजे सेख मन्नुशी सरासरी ४॥ वर्षांपूर्वी ठरून त्याप्रमाणें आपले मुसलमानीं रिवाजाप्रमाणें पंचा समक्ष खुशीखाय मंगनी चढवा आणि ईदी वगैरे निक्याच्या अगोदरील सर्व जरूरी गोष्टी होऊन निका पुरा पक्का झाला होता. त्यावेळेस आमचे संबंधी व आमचे घराण्या संबंधी सर्व हकीकत आह्मी खुल्या दिल्यानें तुह्मास अगोदर जाऊन सांगितली होती. वरील गोष्टी झाल्या नंतर आह्मी तुह्मास निका उरकून घेण्याविषयीं अनेकवेळां सूचना केल्या असतां तुह्मी कबूल केलें नाहीं व त्याप्रमाणें निकाही उरकून टाकला नाहीं आह्मी स्वतः तुमचेकडे १५ दिवसां या कामा करितां आलो असतां तुह्मी आपली मुलगी इस्मायल वल्लद सेख याचे मुलास ह्मणजे ममुद यास देण्याचे कबूल केलें आहे. व माझे जात कुळीस बाईट नांवें ठेविली आहेत या गोष्टीमुळें माझे अब्रूची व पैशाची फार नुकसान झाली आहे. मुसलमानी रिवाजाप्रमाणें मुन्नाबीचा ममुदशीं नात्यामुळें निकाही होऊं शकत नाहीं. तर ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत आपल्या मुलीचा निका माझे मुलाशीं लावून टाकावा तसें न केल्यास माझ्या अब्रू नुकसानीबद्दल तुमचेवर मी फिर्याद करीन व वर लिहिलेल्या खुशीखाय वगैरे प्रकर्णांत मला २२५ रु० खर्च झाला आहे तोही भरून घेईन या नोटिशीप्रमाणें आमचे धर्माचे काजी बक्षूमीया यांसही असें कळवितों कीं तुह्मी मदहू मुन्नाबी इचे निक्याचे बाबतींत मला विचारल्या शिवाय पडूं नये तसें केल्यास तुह्मावरही मला फिर्याद करावी लागेल. कळावें ता० २०-१२-११ इ.

सही

प्यारमद वल्लद गुलमद बकरकसाई राहणार पिंपळगांव काळे ता० जळगांव सही उर्दूत.

नो० नं० ५६१

## नोटीस

रा० रा० हरसिंग मानासिंग महाले पाटील राहणार रानेदे तालुका आकोला यांस:—

खालीं सह्या करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं तुह्मी आपली चार शेतें आह्मास बटाईनें १३२१ सालासाठीं दिलीं. तुमच्या विश्वासावर व भलेपणावर भरंवसा ठेऊन आह्मी आमच्या गावच्या वेंझ्याचा ९ खंडी ७ मण कपाशी तुमच्या घरांत साठविली; पण तुह्मी विश्वासघातानें आह्मी खळ्यावर आहों असें पाहून दोन गाड्या कपाशी आमच्या पश्चात चोरून आकोल्यास नेली. आह्मी हिशोब मागतो तर तुह्मी धुडकाऊन देतां. आमच्या गरीबांच्या शिवीश्राप घेण्यांत तुमचें कल्याण नाहीं तुह्मी कपाशीचा हिशोब देईपर्यंत आह्मी तुह्माला खळ्यावरची जवारी नेऊं देणार नाहीं. जवारी नेण्यासाठीं याल तर आह्मी तुह्मावर फौजदारी करूं. चार पंचासमक्ष तुह्मी सर्व निकाल करीपर्यंत जवारीसाठीं येण्याची तुह्माला मनाई आहे. कपाशीची नुकसानी तुह्माकडून कोर्टखर्च व इतर नुकसानी या सुद्धां कोर्ट मार्फत भरून घेऊं कळावें. तारीख २२ दिसेंबर सन १९११ ई०

सही

१ मारुती रामजी महार निशाणी नंबर

२ तान्या महार नि० नंबर. २

राहणार रानेदे तालुका आ[illegible]

नो० नं० ५६२